लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
11	मनपा अंतर्गत हैदरबाग व सिडको दवाखान्याच्या लॅबसाठी मायक्रोस्कोप खरेदी करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC - 12	आरोग्य विभाग		9 अ	6	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	--	---	--

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)
महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः

1. दरकराराची मुदत संपुनही दरकरारावर खरेदी करणे बाबत.
2. साहित्याची मागणी आरपीडी ने पाठविणे बाबत.
3. एकुण रकमेच्या 80% रक्कम साहित्य प्राप्त झाल्यावर व 20% साहित्याची तपासणी झाल्यावर न देता एक रक्कमी प्रदान करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अतंर्गत आरोग्य विभागाचे लेखा परीक्षणात असे दिसुन आले की, हैदरबाग दवाखाना व वैद्यकीय अधिकारी सिडको दवाखाना यांचे लॅबसाठी प्रत्येकी 2 मायक्रोस्कोपची मागणी केली असुन त्यानुसार केंद्र शासन दर करारानुसार त्यांचे अधिकृत पुरवठादार श्री एन के. जैन इस्टुमेंट प्रा.लि. अंबाला हरयाना यांचे इनव्हाईस देयक क्रं.745 दि.23.12.2011 अन्वये दोन मायक्रोस्कोप प्रती नग रू.17915/- प्रमाणे दोन नगर खरेदी केले असुन त्या प्रित्यर्थ रक्कम रू.40532/- अदा केले आहे. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) केंद्र शासन दर करार गव्हर्नमेंट ऑफ इंडीया डायरेक्टरेट जनरल ऑफ सप्लाइज अँन्ड डिसपोजल्स नवी दिल्ली यांचे सोबत मनपाचा औषधी व यंत्रसामुग्री खरेदीचा दर करार झाला असुन सदर दर कराराचा कालावधी दि.1.11.2010 ते 31.10.2011 असा असतांना दर कराराची मुदत संपली असतांना सदर पुरवठादाराकडून दोन मायक्रोस्कोप कसे खरेदी करण्यात आले खुलासा करावा दर कराराची मुदतवाढ दिली असल्याचे दिसुन आले नाही व पुरवठा आदेश दि.1.11.2011 रोजी दर कराराची मुदत संपल्यानंतर देण्यात आले.

2) वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्य विभाग शासन निर्णय क्रं.डीपीआर-1088/1515/सीआर-230/88/एमडीडी/4 ब/दि.31 ऑगस्ट 1990 मधील परीच्छेद 32 नुसार एकुण रक्कमेच्या 80 टक्के रक्कम माल प्राप्त झाल्यावर ताबडतोब व उर्वरीत 20 टक्के रक्कम मालाची तपासणी केल्यानंतर करणे आवश्यक असतांना अशा प्रकारे कार्यवाही न करता एक रकमी प्रदान केले आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

3) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग शासन निर्णय क्रं.डीपीआर/1092/133/4(ब)/दि.10 एप्रील 1992 मधील परीच्छेद 5 अन्वये मालाची मागणी पुरवठा आदेश आरपीडीने पाठवणि आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याचे दिसुन येत नाही. याबाबत खुलासा करावा.

4) शासन दर करारातील अटीनुसार मागणी केलेंडर साहित्याची 98 टक्के रक्कम तपासणी झाल्यानंतर व 2 टक्के रक्कम प्रात्यक्षीक झाल्यावर अदा करणे असे नमुद असतांना धनादेश क्रं.255432 दि.31.3.2012 अन्वये रू.40532/- इतकी रक्कम सुरवातीसच का प्रदान करण्यात आली. याबाबत खुलासा करावा.

5) सदर साहित्याची प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा दर्जा व गुणवत्ता संबंधी प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे दिसुन आले नाही. याबाबत खुलासा करावा.

6) वरील खरेदी देयकातून आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) 2% आयकराची रक्कम रु. 810/- वसुल केली नाही. याबाबत खुलासा करावा.

वरील प्रमाणे अ.क्र. 1 ते 6 बाबींची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे सदर बाबत लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 92 दिनांक /08/2013 अन्वये खुलासा मागवुनही खुलासा सादर करण्यात आला नाही त्यामुळे सदर आक्षेप कायम करण्यात येतो.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
92	/ 08/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
12	उपअभियंता (विद्युत) रीक्त पदावर सरळ भरतीने नियुक्ती करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC – 02	आस्थापना विभाग		9 अ	7	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	--	---	--

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः

1. स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देणे बाबत.
2. मजुंर पदाच्या आकृतीबंधास मा. संचालनालयाची मान्यता घेणे बाबत.
3. मनपाचे आस्थापनेवरील सहा महिन्यापेक्षा जादा कालावधीसाठी रीक्त असलेले पदे परंतु मनपाला आवश्यक असणारी पदे भरण्यापुर्वी मा. संचालक न.प्र. प्रशासन याची मान्यता न घेणे बाबत.

सविस्तर परीच्छेद ः-

मनपा, नांदेड सर्व साधारण सभा ठराव क्रं.25 नांवाशमनपा दि.24.5.2012 अन्वये आस्थापनेवर विद्युत विभागासाठी उपअभियंता या अभिनामाचे एक पद मंजुर असुन सदर पदावर कार्यरत असलेले श्री वामन राठोड हे मृत्यु पावल्याने सदर रिक्त पदावर सरळ सेवा भरतीने नेमणुक करण्यात आली.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महानगरपालिका हया सार्वजनिक संस्था असल्याने सदर संस्थेमध्ये भरती करतांना मनपा ने मोठया प्रमाणावर जाहीर प्रसीध्दी दिली पाहीजे किंवा सेवायोजना/निवड

मंडळ कार्यालयाकडून पात्र उमेदवारांची यादी मागविली पाहिजे. पूर्ण अर्हता धारण करणा-या प्रत्येक नागरीकाचा मनपाच्या कोणत्याही विभागात नियुक्ती मिळवण्यासाठी मनपाकडून विचार झाला पाहीजे व सर्व पात्र उमेदवारांना मनपामध्ये नियुक्तीसाठी अर्ज करण्याची संधी मिळणेसाठी मनपाने पद नियुक्तीची जाहीर प्रसीध्दी केली पाहीजे. परंतु मनपाने अशी जाहीर प्रसीध्दी न करता मुंबई प्रांतीक अधिनियम 1949 चे कलम 54 मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करून दै.प्रजावाणी व दै.पुण्यनगरी या स्थानिक वर्तमान पत्रात दि.22.2.2012 रोजी प्रसीध्दी देऊन उमेदवाराचे लेखी परीक्षेसाठी अर्ज मागविले आहे. राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीर प्रसीध्दी का देण्यात आली नाही. या बाबत खुलासा करावा.

2) सदर स्थानिक वर्तमान पत्रामध्ये जाहीर प्रसीध्दी दिल्याने सदर पदासाठी केवळ दोनच उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाले.

1) श्री सिध्दीकी मेराज मोहीयोद्यीन, मुसलीम/खुला
2) श्री ढवळे सतीश निवृत्ती, महार/(अनु.जाती)

वरील दोन उमेदवारांचे अर्ज प्राप्त होऊन दोन्ही उमेदवारास लेखी परीक्षेस बोलावणेत आले व लेखी परीक्षेत वरील दोन उमेदवारा पैकी श्री ढवळे सतीश निवृत्ती यांना लेखी परीक्षेत 39 व तोंडी परीक्षेत 07 असे एकूण 46 आणि श्री सिध्दीकी यांचे पेक्षा जास्त असल्याने श्री ढवळे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. पुरेसी प्रसीध्दी न दिल्याने सदर पदासाठी उमेदवार उपलब्ध न झाल्याने परत जाहीरात देण्यात आली नाही. पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने अमेदवाराच्या निवडीबाबत स्पर्धात्मक निवड मनपास करता आली नाही. खुलासा करावा.

3) सदर जाहीरातीमध्ये नमुद अटी शर्तीनुसार पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य तसेच तीन वर्षाचा अनुभव नमुद केला आहे. परंतु पुरेशी प्रसीध्दी न दिल्याने पदव्युत्तर पदवी असलेले उमेदवार उपलब्ध झाले नाही. जर पुरेशी प्रसीध्दी केली असती तर जादा उमेदवार उपलब्ध होऊन स्पर्धात्मक निवड करता आली असती. या बाबत खुलासा करावा.

4) महराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगर अधिनियम 1965 चे कलम 76 (1) व (2) नुसार मनपाने मंजुर पदाच्या आकृतीबंधास मा.संचालनालयाकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. अशी मान्यता घेण्यात आली नाही. खुलासा करावा.

5) निवड समितीतील खालील प्रतिनिधी उमेदवार निवडीचे वेळी गैरहजर होते.

1) उपआयुक्त (बिएसयुपी)

2) का.अ. तथा अनु.जाती प्रतिनिधी

3) विशेष समाज कल्याण अधिकारी

4) सहाय्यक आयुक्त

वरील प्रतिनिधी निवड करतांना हजर नसतांना उमेदवाराची निवड कशी करण्यात आली याबाबत खुलासा करावा.

6) सबंधीत उमेदवाराचे सेवा पुस्तक लेखा परीक्षणास दर्शविले नाही.त्यामुळे नियुक्ती नोंदी तपासता आल्या नाहीत.

7) मनपाचे आस्थापनेवरील सहा महीन्या पेक्षा जास्त कालवधीसाठी रिक्त असलेली परंतु मनपाला आवश्यक असणारी पदे भरण्यापूर्वी संचालक नगर परिषद प्रशासन यांचे मान्यतेची आवश्यकता असते (गा.नि.नप.प्रशासन संचालनालय, मुंबई क्रं.नप्रस-2003/प्र.क्रं.250/04/4/दि.1.8.2006 नुसार) आधी मान्यता घेतली नाही. खुलासा करावा.

महाराष्ट्र स्थानीक निधी लेखा अधिनियम 1930 मधील कलम-6 अन्वये लेखापरीक्षणासाठी मागविलेला खुलासा सादर करणे बाबत. लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 29 दि. 18/06/2013 अन्वये माहिती मगवुनही खुलासा सादर केला नाही. याबाबत खुलासा करावा. व अनुपालन सादर करावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
21	18/06/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
13	वाचनालयासाठी पुस्तके खरेदीबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
	लायब्ररी विभाग		9 अ	6	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	--	305141/-	

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः मनपा नांदेड अतंर्गत वाचनालय विभागाने सन 2011 -12 मध्ये वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करणेसाठी जाहिर निवीदा न मागविणे बिलातुन आयकर कपात न करणे, बिलावर पुस्तके सुस्थीत प्राप्त झालेबाबत प्रमाणपत्र न देणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

नांदेड महानगरपालिका अंतर्गत राम मनोहर लोहीया वाचनालयासने वाचनालयासाठी सन 2011 - 12 मध्ये वाचनालयासाठी खालील प्रमाणे रू.3,10,000/- ची सप्धात्मक पुस्तके खरेदी केली आहेत.

1)	अमीत प्रकाशन, पुणे	1,95,199/-	मराठी भाषेची पुस्तके
2)	ओम सन्स बुक डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली	99,860/-	इंग्रजी पुस्तके
3)	किताबवाला दिल्ली	10,090/-	उर्दु पुस्तके
		3,05,149/-	

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. शासन निर्णय क्रं.उद्योग व उर्जा विभाग आणि कामगार विभाग भारूस –1088/251 (2512) उद्योग-6 दि.2.1.92 अन्वये एका प्रकरणी अथवा वार्षीक गरज रू.50,000/- पेक्षा अधिक असेल तर जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे. खरेदीचे स्पर्धात्मक, तुलनात्मक व

वाजवी दर उपलब्ध व्हावे यासाठी जास्तीत जास्त प्रसिध्दी देणे आवश्यक असुन एक स्थानिक व एक राज्य स्तरावरील वृत्तपत्र यात निवीदा सुचना प्रसिध्द करणे आवश्यक असतांना अशी निवीदा प्रसिध्द केली नाही व ग्रंथपाल यांनी अमीत प्रकाशन, पुणे, ओम सन्स बुक डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली व किताबवाला, दिल्ली येथून सरळ खरेदी केली आहे. त्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. तरी वरील प्रमाणे जाहीर निवीदा का मागविल्या नाहीत याबबात खुलासा करावा.

2. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं. भारूस 1088 / (2512) उद्योग -6 दि .2 .1 .92 मधील नियम 8.1 नुसार साहित्य खरेदी संबंधी समिती स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु अशी समिती स्थापन करण्यात आली नाही. खुलासा करावा.

3. ओम सन्स डिस्ट्रीब्युटर्स, दिल्ली यांनी रू.1,10,735/- चे पुस्तक खरेदीवर पुस्तकाच्या किमतीच्या 10% सुट दिली आहे. व अमीत प्रकाशन यांनी रू. 24,0003/- च्या पुस्तक खरेदीवर 20% सुट दिली असुन किताबवाला, दिल्ली यांनी रू. 10,000 /- च्या खरेदीवर सुट दिली नाही. सदर पुरवठादाराशी वाटाघाटी केल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

4. पुरवठा खरेदीबाबत संबंधीत पुरवठादारास पुरवठा आदेश दिल्याचे संचिकेत आढळुन आले नाही. सरळ सरळ तोंडी व्यवहारान्वये पुस्तके खरेदी केले आहे. त्यामुळे किती पुस्तके मागणी केली किती पुरवठा केली. याची तपासणी करता आली नाही.

5. पुस्तक खरेदीचे बिलावर प्राप्त पुस्तके चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले नाही. त्यामुळे प्राप्त पुस्तके संस्थितीत प्राप्त झाली याबाबत खात्री पटत नाही.

6. रु. 305149/- च्या रकमेवर आयकर नियमाप्रमाणे आयकर कपात केला नाही, तरी आयकर रक्कम नियमाप्रमाणे भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त अ.क्र. 1 ते6 बाबींचा खुलासा सादर करावा.

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्र. 57 दिनांक 18/07/2013 नुसार वाचनालय विभागास निदर्शनास आणुन देण्यात आल्या. याबाबत सदर बाबींचा समर्पक खुलासा न आल्याने सदर आक्षेप अंतीम करण्यात येत असुन रक्कम रुपये 305141/- लेखा परीक्षणात तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
57	18/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः NJK – 5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
14	वाहनासाठी सुटेभाग खरेदी बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
14	वाहन विभाग		9 अ	9	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	6125/-	164872/-	--

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः मनपाने वाहन भाडे तत्वावर देताना निवीदा न मागविता भाडे तत्वावर घेण वाहने कंत्राटव्दारामार्फत वाहने भाडयाने न घेणे भाडयाचे वाहनाचे लाँगबुक लेखा परीक्षणास सादर न करणे, देयकातुन आयकर, सरचार्ज कपान करणे इ.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा नांदेडचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात वाहन विभागाचे लेखा परीक्षण करतांना असे दिसुन आले की, वाहन विभागाने सोबतच्या विवरणात दर्शविल्याप्रमाणे वाहनाच्या दुरूस्ती व सुटेभाग खरेदीवर रू.1,70,997/- खर्च केला आहे. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 93 (ड) (ब) अन्वये तसेच शासन परीपत्रक क्रं.उद्योग व कामगार विभाग क्रं.भारूच/1088/2912/उद्योग-6/दि.2.1.1992 अन्वये दरपत्रके

मागवुन खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने अ.क्रं.1 व 9 वगळता सेंट्रल ॲटोमोबाईल्स या एकाच पुरवठादाराकडून खरेदी केली आहे. त्यामुळे मनपाला स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. खुलासा करावा.

2) मनपाचे वर्कशॉप नसल्याने बाहेरून दुरूस्ती करण्यात येत असल्याचे समजते. सदर विभागात फिटरचे पद असुन श्री सरोदे व चौधरी हे कार्यरत आहेत. त्यांचेकडून कोणती कामे करून घेण्यात येतात याचा खुलासा करावा.

3) मनपाला दरवर्षी वाहनाच्या सुटे भागावार मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. शासनाशी सुटे भाग खरेदीचा दर करार का करण्यात आला नाही. खुलासा करावा व वारंवार एकाच पुरवठा दाराकडुन सुटे खेरदी करणेबाबत खुलासा करावा.

4) विवरणात दर्शविलेल्या साहित्याच्या नोंदी इतिहास पुस्तीकेत घेण्यात आल्या आहेत. परंतु रू.500/- आतील सुटेभाग खरेदीच्या नोंद इतिहास पुस्तीकेत घेण्यात येत नाहीत. तसेच ज्या बिलान्वये सुटेभाग खरेदी केले त्या बिलाचा क्रमांक व दिनांक नमुद करण्यात येत नाही. त्यामुळे घेतलेली नोंद कोणत्या बिलान्वये खरेदी केलेल्या साहित्याची आहे. याची खात्री पटत नाही. तसचे ज्या वाहनासाठी सुटे भाग खरेदी केले त्याच वाहनास सदर सुटे भाग बसविले बाबत खात्री पटविण्यात आली नाही.

5) अ.क्रं.9 अन्वये केलेली खरेदी सदर वाहनचालकाचा अहवाल दि.31.5.2011 चा असतांना खरेदी मात्र दि.30.9.2010, 27.12.2010 व 3.2.2011 रोजी केलेली दिसते मागणी अहवालाच्या अगोदरच खरेदी कशी केली खुलासा करावा.

6) अ.क्रं.6 अन्वये इतिहास पुस्तीकेत सुटेभाग खरेदीच्या नोंदी घेण्यात आल्या नाहीत, मेकॅनीकचा रिपोर्ट नाही. उपअभियंता (यांत्रिकी) यांचा अहवाल नाही. वाहन ज्या अधिका-याच्या अधिपत्याखाली आहे. त्याचा अहवाल नाही.

7) अ.क्रं.13 अन्वये सुटेभाग 25975 ची खरेदी केली आहे वाहन चालकाचा अहवाल नाही. डिलेव्हरी चलनमध्ये रिअर सायलेन्सर असेमली-1 व रिअर मिटर 1 असे अ.क्रं. 5300 व 825 रू.5300 + 225 = 6125 संबंधीताकडून वसुल करून मनपा निधीत भरणा करावा.

8) अ.क्रं.7 अन्वये 17060 चे सुटेभाग खरेदी केले असुन दोन टायर खरेदी केले आहे. सदर वाहनासाठी यापूर्वी कधी टायर खरेदी केलेंडर होते. त्या टायरची धावसंख्या किती होती इत्यादी बाबी संचिकेत नमुद नाहीत. तरी दर्शवून खात्री पटवावी.

9) जुने साहित्य, जुने टायरची मनपा लेखा संहीता 1971 चे नियम 149 चे नियमानुसार न.न. 118 मध्ये वाटप केलेल्या साहित्यापैकी निरूपयोगी साहित्य परत प्राप्त झाल्यावर त्याची वस्तुनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवलेली नाही. तरी वरील प्रमाणे अ.क्र. 1 ते 9 बाबींची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त अनियमीतते अर्धसमासपत्र क्र. 59 दिनांक 18/07/13 नुसार वाहन विभागास निदर्शनास आणुन देण्यात आल्या याबाबत सदर बाबींचा समर्पक खुलासा न आल्याने सदर आक्षेप अंतीम करण्यात येत असुन रक्कम रु. 6125/- वसुल करण्यात यावे.

तात्पुरती आमान्य - 164872/-

वसुली रक्कम - 6125/-

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
59	17/07/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- F-NJK – 5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
15	मनपा शाळेतील 1 ली ते 8 वी खुले तसेच 9 वी 10 वी च्या विद्यार्थ्यांना (मुले व मुली) मनपा निधीतुन गणेवश वाटपाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	शिक्षण विभाग

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC – 26	शिक्षण विभाग		9 अ	7	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
344400/-	---		--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- 1. शा.नि. 02/01/1992 नुसार मनपाने त्याचे स्तरावर वार्षीक खरेदी 50000/- च्या वरील असल्याने केंद्रीय पध्दतीने निवीदा मागवुन दर निश्चीत न करणे.

2. कापडाची शिलाई दरपत्रके मागवुन न करणे.
3. गणवेश वाटप 1 जुनपर्यंत किंवा शैक्षणीक वर्षाच्या पहिल्या दिवशी न करणे व शासनाचे उद्यीष्ठ साध्य न होणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अतंर्गत शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना असे दिसुन आले की, मनपाने त्यांचे अंतर्गत एकुण 14 शाळाना सन 2011-12 साठी 1ली ते 8वी खुले व 9वी 10वी च्या विद्यार्थ्यांना पुर्व व माध्यमीक शिक्षण महिला व बालकल्याण विभागामार्फत एकुण 861 विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी दोन गणवेश प्रती गणवेश रक्कम रु. 200/- प्रमाणे दोन गणवेशाची रक्कम 400/- प्रमाणे एकुण रक्कम रु. 344400/- अनुदान वाटप करण्यात आले आहे.

अ.क्र.	शाळेचे नाव	विद्यार्थी संख्या X रक्कम	एकुण रक्कम
1	मनपा प्रा.शा., वजीराबाद	70 X 400	28000
2	मनपा प्रा.शा., गणेश नगर	2 X 400	800

3	मनपा प्रा.शा., विष्णु नगर	47 X 400	18800
4	मनपा प्रा.शा., जंगमवाडी	164 X 400	65600
5	मनपा प्रा.शा., लेबर कॉलनी	75 X 400	30000
6	मनपा प्रा.शा., ब्रम्हपुरी	34 X 400	13600
7	मनपा प्रा.शा., खयुम प्लॉट	249 X 400	99600
8	मनपा प्रा.शा., किल्ला	12 X 400	4800
9	मनपा प्रा.शा., आंबेडकर नगर	1 X 400	400
10	मनपा प्रा.शा., भिमसंदेश	11 X 400	4400
11	मनपा प्रा.शा., हैदरबाग	62 X 400	24800
12	मनपा प्रा.शा., महेबुबीया	72 X 400	28800
13	मनपा प्रा.शा., इस्लामपुरा	56 X 400	22400
14	मनपा प्रा.शा., सिडको	6 X 400	2400
	एकुण	861 X 400	344400

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. मनपाने त्यांचे अंतर्गत शाळांना अनुदान वाटप केलेले असुन गणवेश खरेदी त्यांचे स्तरावर करणे बाबत कळविले असुन संबधीत शाळेने त्यांचे स्तरावर परीपत्रके मागवुन गणवेश कापड खरेदी व गणवेश शिलाई करुन गणवेश विद्यार्थ्यांना वाटप केले आहे. शासन निर्णय क्रमांक भाखस 1088/2512/उदयोग - 6 मंत्रालय, मुंबई दिनांक 2 जानेवारी, 1992 (7.3) (फ) नुसार मनपाने त्यांचे स्तरावर वार्षीक खरेदी रु 50000/- च्या वरील असल्याने दरपत्रकाव्दारे खरेदी करणे बंधनकारक आहे, तथापी अशी खरेदी दरपत्रक न मागविता खरेदी केल्याचे दिसुन येते मनपाने त्यांचे स्तरावर निवीदा मागवुन खरेदी केली असती तर मनपास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असता. परंतु सबंधीत शाळांनी त्यांचे स्तरावर गणवेश कापड खरेदी केल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा मनपास झाला नाही तरी अशी कार्यवाही मनपा शिक्षण विभागाने का केली नाही याबाबत खुलासा करावा.
2. मनपाने गणवेशाचा दर 200/- प्रती गणवेश ठरविणेत आला सदर दर कशाचे आधारावर ठरविणेत आला मनपाने केंद्रीय पध्दतीने निवीदा मागवुन दर निश्चीत करणे आवश्यक होते अशी कार्यवाही का करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा.

3. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. गणवेश/2003/प्ररा-6 दि. 15/10/2003 परी-40 नुसार गणवेश कापडाची शिलाई

करुन गणवेश वाटप 1 जुनपर्यंत किंवा शैक्षणीक वर्षाच्या पहिल्या दिवशी करणे आवश्यक आहे परंतु विद्यार्थांना ज्या वर्षासाठी गणवेश वाटप करावयाचे होते त्या वर्षात गणवेश वाटप करण्यात आले नसुन पुढील वर्षी गणवेश वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे गणवेशाचा पुर्ण शैक्षणीक वर्षासाठी वापर झाला नाही व सदर योजनांचा विद्यार्थ्यांना पुरेसा फायदा मिळत नसल्यामुळे शासनाचा हेतु साध्य झाला नाही. यामुळे एकतर गणवेशाचे विद्यार्थ्यांचे मापे बदलुन गणवेश योग्य बसत नाही. तसेच शासनाचे उदिष्ट सफल होत नाही. याबाबत खुलासा करावा.

4. शासन निर्णय गणवेश /2004/प्र.क्र. 5/परास/न.रा.7 दि. 27 फेब्रुवारी, 2008 अन्वये जिल्हा विकास यंत्रणा अंतर्गत मधील बचत गटानांच गणवेशाच्या शिलाईचे काम देण्यात यावे असे नमुद असताना सबंधीत शाळांनी खाजगी टेलरकडुन वेगवेगळया दराने गणवेश शिलाई करुन घेतली. मनपाने गणवेश शिलाई बाबत शासन निर्णय दि. 02/01/1992 नुसार दरपत्रके मागवुन त्याचे स्तरावर गणवेश शिलाई करुन घेती असती तर मनपास स्पर्धात्मक दाराचा फायदा झाला असता. याबाबत खुलासा करावा.

5. अंतर्गत शाळाचे गणवेश खरेदीचे लेखा परीक्षण करता असे दिसुन आले की, शाळांनी गणवेश कापड खरेदी केल्यानंतर कापडाची नोंद साठा नोंदवहीत नोंद घेतली नाही तसेच बिलावर कापड चांगल्या स्थितीत प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले नाही. त्यांमुळे गणवेशासाठी खरेदी केलेले कापड चागंल्या दर्जाचे होते याची खात्री पटली नाही. खुलासा करावा.

6. गणवेश वाटप नोंदवहीत गणवेश यादीवर सबंधीत शाळांच्या शिक्षण समीतीची स्वाक्षरी घेतली नाही त्यामुळे गणवेश वाटप केल्याची खात्री पटत नाही.

7. गणवेश वाटप यादीवर मुख्याध्यापकाची सही, शिक्षण समीतीची स्वाक्षरी विद्यार्थ्यांचे जातीचा प्रवर्ग व काही ठिकानी विद्यार्थ्यांच्या स्वाक्ष-या नसल्याने योग्य लाभार्थ्यांस गणवेश देण्यात आल्याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त अ.क्र. 1 ते 7 बाबीचा खुलासा कराव व अनुपालन त्वरीत लेखापरीक्षणास सादर करावे तोपावेता रकम रु. 344400/- ले.प. आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वरील बाबत लेखा परीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्रमांक 177 दिनांक 07/10/2013 अन्वये खुलासा मागवुनही समर्पक खुलासा लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
177	17/10/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
16	संगणकाव्दारे वसुल केलेल्या जन्म मृत्यु प्रमाणपत्र फी वसुलीच्या संगणकीकृत पावत्या लेखा परीक्षणास सादर करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12			9 अ	1	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- जन्म मृत्यु प्रमाणपत्र फी वसुलीच्या संगणकीय पावत्या लेखा परीक्षणास सादर केल्या नाहीत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अतंर्गत आरोग्य विभागाचे लेखा सन 2011ञ12 चे लेखा परीक्षणात जन्म मृत्यु प्रमाणपत्र फी च्या जमा रकमांची तपासणी करीत असता माहे मे-2011 मध्ये एकुण रु. 33820/- व माहे मार्च -2012 मध्ये 80220/- रक्कम अशी एकुण रक्कम 74040/- संगणकीय पावत्यान्वये जमा केली असुन चलनान्वये मनपा खाती भरणा केली आहे परंतु सदर महिन्यातील संगणकीय पावत्या / प्रिंट लेखा परीक्षणपथकाचे अर्धसमास पत्र क्र. 91 दिनांक 31/07/2013 अन्वये लेखापरीक्षणास सादर करणे बाबत कळवुनही लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनाकापर्यंत सादर केल्या नाहीत त्यामुळे सगंणकीय पावत्यान्वये जमा झालेली रक्कम ही जमा केलेल्या रकमेइतकीच असल्याची खात्री पटत नाही.

तरी सदर संगणकीय पावत्या लेखा परीक्षणास न दर्शविल्याने सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
91	31/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
17	कोंडवाडा व्यवस्थापनावर केलेल्या खर्चाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12	कोडवाडा विभाग आरोग्य विभाग		9 अ	5	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- 1. निवीदा न मागविता मजुर मानधनावर बचत गटाकडुंन कामावर लावणे बाबत.
2. एकाच कुंटुबातील मजुर कामाव लावणे बाबत.
3. मजुरांचे हजेरीरजीस्टर व जनावंराची नोंदवही न ठेवणे बाबत.
4. बचत गटाकडुन करारनामा न घेणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अंतर्गत कोंडवाडा विभागाचे सन व्यवस्थापनावर केलेल्या खर्चाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षण करीत असताना असे दिसुन आले की, मनपा अंतर्गत गोकुळनगर व सीडको येथील कोंडवाडयासाठी रस्त्यावर फिरणा-या मोकाट जनावराना पकडुन कोंडवाडयात टाकणेसाठी कोंडवाडा विभागाने प्रतीदिन प्रती मजुर 150/- या प्रमाणे एकूण 10 मजुर घेण्यात आले असुन त्यांना सन 2011-12 मध्ये कोंडवाडा व्यवस्थापन मजुरीवर रू.46500 + 74250 = 120750/- असा खर्च नोंदविला आहे.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) दि.13.9.2011 ते 13.10.2011 पर्यंत एकूण 10 मजुर प्रतीदिन रू.150/- प्रमाणे रात्री 10.00 ते सकाळी 5.00 या वेळेसाठी मजुरीवर 150 X 10 X 31 = 46500/- चा धनादेश क्रं.211405 दि.25.10.2011 अन्वये रक्कम अदा केली आहे.

2) मनपा/50/दि.2.12.2011 अन्वये दि.14.10.2011 ते 27.11.2011 पर्यंत मजुरी प्रित्यर्थ रू.74250/- चा खर्च दर्शविला आहे. सदर कालावधीत मनपाने श्री दत्तकृपा महीला बचत गट आसदवन यांचे मार्फत 11 मजुर मानधनावर घेतले असुन त्या प्रित्यर्थ 150 X 11 X 31 = 74250/- रक्कम अदा केली आहे. सदर मजुर बचत गटामार्फत मानधनावर घेणेसाठी कमीत कमी तीन निविदा मागविणे आवश्यक होते. मात्र निविदा न मागविता श्री दत्तकृपा महीला बचत गटामार्फत मजुर मानधनावर घेणबाबत खुलासा करावा.

3) वरील अ.क्रं. 1 ते 10 व 1 ते 11 मजुरांचे हजेरी रजीस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे मजुरांनी प्रतीदिन किती मोकाट जनावरे पकडून आनले. याबाबत खात्री करता आली नाही. तरी संबंधीत मजुरांनी सदर कालावधीत किती दिवस मोकाट जनावरे पकडण्याचे काम केले, किती मोकाट जनावरे कोंडवाडयात आनली याची तपासणी करता आली नाही. तरी जनावरांची नोंदवही व मजुरांचे हजेरी रजीस्टर न ठेवणे बाबत खुलासा करावा व मजुरांनी सदर कालावधीत मोकाट जनावरे कोंडवाडयात आनन्याचे काम केल्याबाबत खात्री पटवावी.

4) वरील बचटगट श्री दत्तकृपा महीला बचतगट यांचेकडून करारनामा करून घेण्यात आला नाही. त्यात अटी व शर्ती नमुद करणे आवश्यक आहे.
परंतु करारनामा न घेतलयाने काय अटी व शर्ती होत्या याची तपासणी करता आली नाही. याबाबत खुलासा करावा.

5) सदर कामासाठी खालील प्रमाणे मजुर लावण्यात आले सदर मजुर बहुतांशी एकाच कुटुबांतील असल्याचे दिसून येते. सदर मजुरांचे ओळखपत्र घेणे आवश्यक असतांना असे ओळखपत्र घेण्यात आले नाही. त्यामुळे मजुराबाबत खात्री करता आली नाही. खुलासा करावा.

1) श्री गिरडे उध्दव डिगबंर
2) श्री गिरडे नेहरू दशरथ
3) श्री गिरडे संतोष बाजीराव
4) श्री गिरडे सुनील उध्दराव
5) श्री गिरडे वैजनाथ पंडित
6) श्री तेलगे बाबुराव गोविंदराव
7) श्री तेलगे पूंडलीक संभाजीराव
8) श्री पवार संजय संभाजीराव
9) श्री पवार जगदीश रामजी

उपरोक्त प्रमाणे बहुतांश एकाच कुटुंबातील मजुर मानधनावर घेण्यात आले. तसेच अ.क. 9 अन्वये श्री पवार जगदीश रामजी यांना मानधनावर घेतले असतांना मजुरी

श्री पवार जगन रामजी यांना अदा केल्याचे दिसुन येते. तरी याबाबत खुलासा करावा.

वरील अनियमितते बाबत लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र. 107 दिनांक 03/08/2013 अन्वये देवुनही अनुपालन प्राप्त न झाल्याने सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येतो.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
107	07/08/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
18	सन 2011-12 मध्ये दिलेले वैद्यकीय अग्रीम व दवाखान्यासाठी साहित्य खरेदीची अभिलेखे लेखा परीक्षणास सादर करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सार्वजनीक आरोग्य

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12	लेखाशाखा		9 अ	1	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
39000/-	80000/-	---	80000/-

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- सन 2011-12 मध्ये दिलेल्या वैद्यकीय अग्रीम व दवाखान्यासाठी साहित्य खरेदी चे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न करणे.

सविस्तर परीच्छेद :-

महानगरपालिकेतंर्गत आरोग्य विभागाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात यादीप्रमाणे खालील वैद्यकीय अधिकारी यांना अग्रीम प्रत्येकी 40000/- व दवाखान्यासाठी साहित्य खरेदी प्रित्यार्थ 39000/- रु. खर्च केला असुन सदर खर्चाचे अभिलेखे तसेच दिलेल्या अग्रीमाचे समायोजन देयके लेखा परीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र. 81 दि. 31/07/2013 अन्वये मागणी करुनही लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत सादर केले नाही.

महाराष्ट्र स्थानीक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (2) नुसार विभागाने सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतानासदरचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलले नसल्याने साहित्य खरेदीवरील खर्चाची रक्कम रु. 39000/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येते तसेच वैद्यकीय अधिका-यांना दिलेला अग्रीम रु. 40000+40000= 80000/- वसुल

झाला नसल्यास सबंधीताकडुन वसुल करुन मनपा निधीत भरणा करावे व आनुपालन लेखा परीक्षणास कराणमिमांसेसह खुलासा करावा.

अ.क्र.	दिनांक	वैद्यकीय अधिकार-याचे नाव	अग्रीमाची रक्कम
1.	26.7.2011	श्रीमती डॉ.प्रांजली पंकज जोशी	40000/- अग्रीम
2.	26.7.2011	डॉ.मुजाफर अमीनाबेग	40000/- अग्रीम
3.	19.9.2011	डॉ.सुरेशसींग बिसेन	39000/- दवाखान्यासाठी साहित्य खरेदी
एकुण			119000/-

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
81	31/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
19	वेतनातुन कपात केलेल्या रकमाचे विवरण पत्र सादर करण्याबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-07	लेखाशाखा		9 अ	1	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- वेतनातुन कपात केलेल्या रकमा सबंधीत खाती भरणा केल्याबाबत माहिती लेखा परीक्षणास सादर केली नाही.

सविस्तर परीच्छेद :-

लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 24 दिनांक 18/06/2013 अन्वये वेतन देयकातुन केलेल्या खालील रक्कमाचे विहीत नमुन्यात विवरणपत्र सादर करणेबाबत सुचीत करण्यात आले होते.

1. व्यवसाय कर.
2. भनिनि सर्वसाधारण
3. गटविमा योजना.
4. आयकर.
5. अशंदायी भनिनि.

1. वरील माहिती लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत लेखा परीक्षणास सादर केली नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (2) नुसार लेखा विभागाने सदरची माहिती लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतांना सदरची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

त्यामुळे अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनातुन कपात केलेल्या रक्कम सबंधीत खाती भरणा केल्याची तपासणी करता आली नाही.

सदर माहिती/अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न करणे बाबत सबंधीताचा खुलासा दयावा व सदर रक्कम शासन खाती विहीत वेळेत भरणा केल्याची खात्री पटवावी व अनुपालन लेखा परीक्षणास दर्शवावे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
24	18/06/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
20	क्रिडा व सांस्कृतीक कार्य विभागाचे खर्चाचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन न देणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	क्रिडा व सांस्कृतीक कार्य विभाग

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
			9 अ	4	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
439812/-	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- नांदेड वाघाळा महानगरपालिकेतील क्रिडा व सांस्कृतीक कार्य विभागाचे खर्चाचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न केल्याने केलेल्या खर्चाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

सविस्तर परीच्छेद :-

महानगरपालिकेतील क्रिडा व सांस्कृतीक विभागाने सन 2011-12 या वित्तीय वर्षामध्ये क्रिडा व सांस्कृतीक विभागातंर्गत केलेल्या खर्चाचे सोबतच्या यादी प्रमाणे लेखा परीक्षणासाठी लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 101 दिनांक 06/08/2013 अन्वये सोबत जोडलेल्या अभिलेख्यांची मागणी केली असता सदर अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाही.

महाराष्ट्र स्थानीक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (2) नुसार विभागाने सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतांना विभागाने सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नसल्याने वरील रक्कम रु. 439812/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न देण्याबाबत कारणमिमांसेसह खुलासा करावा.

क्रिडा व सांस्कृतीक कार्य

अ.क्र.	खर्चाचा तपशील	खर्चीत रक्कम
1.	क्रिडा साहित्य खरेदी	9812/-
2.	जलतरणीका आधुनीकीकरण (स्टीमबाथ, सोनाबाथ, झेकोसींग बाथ)	200000/-
3.	मनपा क्रिडा प्रबोधीनी स्पर्धा व इतर स्पर्धा शालेय स्पर्धा आयोजन	230000/-
एकूण		**439812/-**

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
101	6/8/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
21	सार्वजनीक आरोग्य व सोयीय अतंर्गत साफसफाई पशुवैदकीय दवाखाना व कोंडवाडा आणी उद्याने यांचे अभिलेखे परीक्षणास सादर करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सार्वजनीक आरोग्य

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC - 12			9 अ	4	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
2190913/-	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- नांदेड मनपातील सार्वजनीक आरोग्य व सोयी अंतर्गत साफ सफाई पुशवैद्यकीय दवाखाना व कोंडवाडा आणी उद्योग याचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न केल्याने खर्चाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

सविस्तर परीच्छेद :-

महानगरपालिकेतील सार्वजनीक आरोग्य व सोयी अंतर्गत केलेल्या खर्चाचे अभिलेखे सोबतच्या यादील दर्शविल्याप्रमाणे लेखा परीक्षणासाठी सादर करणे बाबत. लेखापरीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 100 दिनांक 06/08/2013 अन्वये अभिलेख्याची मागणी केली असता सदर अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाही.

महाराष्ट्र स्थानीक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (2) नुसार विभागाने सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असतांना विभागाने सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेले नसल्याने सदर खर्चाची रक्कम रु. ---------- लेखा परीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. लेखा परीक्षणास सदर अभिलेखे उपलब्ध करुन न देण्याबाबत कारणमिमांसेसह खुलासा करावा.

अ.क्रं.		शिर्ष	खर्च रक्कम	तरतुद
1		**दवाखाने व रूग्णालये**	0	0
		आर. सी. एस फेस कार्यक्रम	167254	337254
		दवाखाने व रुग्णालय	508497	0
2		**कोंडवाडे**	0	0
	1	जनावरासाठी चारा	157252	200000
3		**सार्वजनीक उद्याने**	0	0
	1	उद्यानासाठी मुलांचे खेळणी खरेदी, कारंजे, ट्री गार्ड खरेदी	48400	500000
	2	रोपवाटीका नुतणीकरण व रस्त्याच्या बाजुला झाडे लावणे, ठिबक व तुषार	437370	1500000
	3	उद्यानाची देखभाल व दुरूस्ती	179763	500000
	4	विसावा उद्यान नुतणीकरण	904787	1000000
	5	सामाजीक वनीकरण/पर्यावरण अहवाल व वृक्षगणना व जनजागृती	22500	1000
	6	शहरातील विविध भागात नवीन उद्याने तयार करणे	273587	7500000
एकुण रक्कम			**2699410**	**11538254**

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
100	6/8/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
22	अतीक्रमणे व अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी आलेल्या खर्चाचे वसुलीचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-23 MC-31	अनाधिकृत बाधंकाम अतीक्रमण विभाग		9 अ	2	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
1695372/-	--	---	--

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)
महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः

अतीक्रमण व अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी आलेल्या खर्च रक्कम रु. 1695372/- चे जमेचे अभिलेखे, संचीका लेखा परीक्षणास सादर केल्या नाहीत.

सविस्तर परिच्छेद :-

मनपाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक 178/दिनांक 10/10/2013 अन्वये अतीक्रमण व अनाधिकृत बाधंकामे व अतीक्रमण पाडणे याबाबतच्या वसुलीचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

सदर विभागाने रस्त्यावरील अतीक्रमण, टप-या, शेड वगैरे अतीक्रमणाच्या वसुली पावत्या लेखा परीक्षणास सादर केल्या असुन अनाधिकृत बांधकाम पाडणे बाबत वसुल

केलेल्या रकमेच्या पावत्या चलान व कोणत्या इमारतीचे अनाधिकृत बांधकाम पाडले इत्यादी अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाही.

2. वरील अनाधिकृत बाधकामे / अतीक्रमण पाडणे बाबत मनापाच्या जमाखर्चाच्या 2011-12 च्या वार्षीक विवरणापत्रात एकुण रक्कम रु. 1695372/- जमा झाल्याचे दिसुन येते. सदर अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न केल्याने सदर जमा रकमेची पडताळणी करता आली नाही तरी सदरील अभिलेखे लेखा परीक्षणास सादर का केले नाही याबाबत खुलासा करावा.

नसता रक्कम रु 1695372/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
178	10/10/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
23	वाहनावरील खर्चाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
14	वाहन विभाग		9 अ	7	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	---	375502	--

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः मनपाने वाहन भाडे तत्वावर देताना निवीदा न मागविता भाडे तत्वावर घेण वाहने कंत्राटव्दारामार्फत वाहने भाडयाने न घेणे भाडयाचे वाहनाचे लाँगबुक लेखा परीक्षणास सादर न करणे, देयकातुन आयकर, सरचार्ज कपान करणे इ.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा नांदेड ने सन 2011-12 मध्ये सोबतच्या विवरणाप्रमाणे वाहने भाडे तत्वावर घेतली असुन वाहनावर भाडयापोटी रक्कम रु. 375502/- खर्च केला आहे.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

---

1. न.प.प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रं.नप्रस/वाहन/धोरण/2005/प्र.क्र.05/09/दि.10 मे, 2005 मधील परी क्रं.20 (क) नुसार वाहनाचे दरासाठी अटी व शर्ती नमुद करून निवीदा मागावण्यात याव्यात व जास्तीत

जास्त प्रसिध्दी घ्यावी. बाजार भावाशी तुलना करून निवीदाधारक निवडावा असे नमुद असतांना मनपाने वाहन भाडे तत्वावर घेतांना निवीदा न मागविता वाहन भाडे तत्वावर घेतले आहे. याबाबत खुलासा करावा.

2. स्थानिक पातळीवर इतर सेवा पुरविण्यासाठी इंधनवर चालणारे वाहन आवश्यक असल्यास व स्वतःची वाहने असलेला कंत्राटदार उपलब्ध होत नसल्यास अशा प्रकारची वाहने खरेदी करून ती सेवा पुरविण्याकरीता नेमण्यात आलेल्या कंत्राटदार यांचे मार्फत चालविणे आवश्यक राहील असा कंत्राटदार नेमण्यात आला असुन बरीचशी वाहने कंत्राटदारा मार्फत न पुरविता वाहन मालकाचे वाहन भाडयाने घेतले आहे. सदर वाहन भाडे तत्वावर घेतना खालील अटी व शर्तीची पूर्तता केली नाही.

अ) वाहन भाडे दर निश्चीती दि.31.3.2009 पर्यंत करण्याचे अटीवर केली आहे. मनपा पत्र क्रं.यांत्रिकी/वि/2133/दि.30.5.2008 अन्वये ठरविलेले दर हे अद्याप पर्यंत त्याच दराने अस्थितत्वात आहेत. सदर दर निश्चीती कराराची सेवाकरार मुदत संपुनही नवीन सेवाकरार निश्चीत करण्यात आला नाही. सेवाकरार नवीन सेवाकरार निश्चीत करण्यात आला नाही सेवाकरार 1 ते 3 वर्षासाठी असताना 2009 पासुन मनपाने कामाचे मुल्यमापन करून कराराचे नुतनीकरण केले नाही. खुलासा करावा.

ब) वाहन दि.1.1.2006 रोजीचे व त्यानंतर खरेदी केलेले असाव. परंतु वाहन मालकाने वाहनाचे कागदपत्र करारासोबत जोडलेले नाही. त्यामुळे पुरविलेली वाहने दि.1.1.2006 रोजीचे व त्यानंतर खरेदी केलेले होते याची तपासणी करता आली नाही.

ख) वाहन टॅक्सी परमीट व वाहनाचे कागदपत्र सोबत जोडले नाही. त्यामुळे वाहन चांगल्या स्थितीत असल्याची खात्री पटत नाही.

3. ज्या अधिका-यास का.कामासाठी वाहने भाडेतत्वावर दिलेली आहेत. त्यांनी प्रवास दैनंदिनी ठेवणे आवश्यक आहे. अशी दैनंदिनी ठेवली नाही.

4. मनपा पत्र क्रं.यांत्रिकी/223/दि.28.9.2011 अन्वये वाहन वापराची मर्यादा प्रत्येक महीन्यात 1200 कि.मी. एवढी असुन जास्तीचा रन मान्य नाही. पंरतु भाडयाचे वाहनाचे लॉगबुक लेखा परीक्षणास न दर्शविल्याने 1200 कि.मी. दरमहा वापर केला असल्याची खात्री पटत नाही.

5. वाहनाचे लॉगबुक दररोज प्रत्यक्ष भेटी दिलेल्या स्थळाची नोंद करणे आवश्यक असतांना अशा नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

6. प्रत्येक महीन्यात वाहनाचे लॉगबुक, देयक प्रमाणीत करणे आवश्यक असुन प्रत्येक महीन्याचे देयकासह संबंधीत अधिका-र्याचा मान्य प्रवास दैनंदिनीची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. देयकासोबत प्रवास दैनंदिनी जोडण्यात येत नाही. खुलासा करावा.

7. भाडयाचे वाहनाची रक्कमेची अदाई करतांना देयकातून 2 % आयकर प 3 % सरचार्ज कपात केला आहे. सदर कपाती बाबत आदेश दर्शविण्यात यावे व देयकातून कपात केलेली रक्कम शासन खाती भरणा केल्याचे दर्शवावे.

वरील अ.क्र. 1 ते 7 बाबीची पुर्तता करावी व अनुपालन दर्शवावे तो पावेता रक्कम रु. 375502/- लेखा परीक्षणास तात्पुरती अमान्य करण्यात येते.

उपरोक्त अनियमीतते बाबत अर्धसमास पत्र क्र. 60 दि. 18/07/2013 नुसार वाहन विभागास निदर्शनास आणुन देण्यात आल्या, याबाबत सदर बाबींचा खुलासा प्राप्त न झाल्याने सदर आक्षेप अंतीम करण्यात येत आहे.

तात्पुरती आमान्य रु. 375502/-

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
60	17/07/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- F-NJK – 5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
24	मनपाच्या शाळांना डयुल डेस्क खरेदीसाठी अनुदान वाटपा बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
	शिक्षण विभाग		9 अ	8	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	---	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

1. **शा. निर्णय 02/01/1992 नुसार मनपाने त्यांचे स्तरावर वार्षीक खरेदी रु. 50000/- च्या वरील असल्याने दरपत्रके मागवुन खेरदी न करणे.**
2. **फेब्रीकेशनच्या वस्तु कारागृहाकडुन खरेदी न करणे.**
3. **ज्यादा दराने साहित्य खरेदी करणे.**
4. **फर्नीचरचा टिकावुपणा ध्यानात न घेणे.**
5. **डयुल डेस्कचा दर 2950/- कशाचे आधारावर ठरविला ते खुलासा करणे.**
6. **सबंधीत शाळाची फर्नीचरची मागणी शिवाय खरेदी करणे.**
7. **साठा नोंदवही न ठेवणे.**
8. **साहित्याच्या दर्जा व गुणवतेबाबत सक्षम अधिका-याने प्रमाणीत न करणे.**

मनपा अंतर्गत शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण करीत असताना असे दिसुन आले की, मनपा अंतर्गत एकुण 15 शाळा कार्यरत असुन सदर शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पुरेशा प्रमाणात फर्निचर उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना वर्गाअभ्यास करताना बसण्यासाठी मनपा सर्व साधारण सभा ठराव क्र. 05 दि. 16/06/11 अन्वये प्रशासकिय मान्यता व आर्थीक मान्यता देण्यात आली दिनांक 16/11/11 च्या मंजुर टिपणीनुसार मा. आयुक्त व मा. मुलेप यांचेशी दि. 14/11/11 रोजी झालेल्या चर्चेनुसार इयत्ताची गरज व उपलब्ध निधीची मर्यादा लक्षात घेवुन तुर्त प्रत्येक शाळेस खालील प्रमाणे अनुदान करण्यात आले.

अ.क्र.	प्रा. शाळेचे नाव	दिलेली रक्कम
1	प्रा.शा. वजीराबाद	50000/-
2	प्रा.शा. गणेश नगर	50000/-
3	प्रा.शा. विष्णुनगर	50000/-
4	प्रा.शा. जंगमवाडी	50000/-
5	प्रा.शा. लेबर कॉलनी	50000/-
6	प्रा.शा. ब्रम्हपुरी	50000/-
7	प्रा.शा. खय्यूम प्लॉट	50000/-
8	प्रा.शा. किल्ला	50000/-
9	प्रा.शा. आंबेडकर नगर	50000/-
10	प्रा.शा. भिमसंदेश कॉलनी	50000/-
11	प्रा.शा. हैदरबाग	50000/-
12	प्रा.शा. महेबुबीया कॉलनी	50000/-
13	प्रा.शा. इस्लामपुरा	50000/-
14	प्रा.शा. सिडको	29500/-
एकुण		679500/-

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. मनपाने त्यांचे अंतर्गत शाळांना वरीलप्रमाणे अनुदान वाटप केले असुन शाळा निहाय दर्शविण्यात आलेली रक्कम त्या त्या शाळेच्या समीतीच्या नावे धनादेश निर्गमीत करण्यात आले असुन सदर डयुल डेस्कची खरेदी शालेय व्यवस्थापन समीतीने विहित पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करावी असे आदेशीत केले आहे.

शासन निर्णय क्रमांक उर्जा व कामगार विभाग भाखस-1088/2592/उदयोग-6 मंत्रालय, मुंबई दिनांक 2 जानेवारी, 1992 (8.3) फ नुसार मनपाने त्यांचे स्तरावर

वार्षीक खरेदी रु. 50000/- च्या वरील असल्याने दरपत्रकाव्दारे खरेदी करणे बंधनकारक आहे. तथापी अशी खरेदी दरपत्रके न मागविता परस्पर शाळेस अनुदान वाटप केले आहे. मनपाने त्यांचे स्तरावर दरपत्रके मागवुन वरील रक्कम रुपये 679500/- ची फर्नीचर एकत्रीत खरेदी केली असती तर मनपास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असता परंतु संबधीत शांळानी त्यांचे स्तरावर डयुल डेस्क खरेदी केल्याने मनपास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही तरी मनपाने आपल्या स्तरावर खेरदी करुन सबंधीत शाळांना फर्नीचर वाटप का केले नाही याबाबत खुलासा करावा.

2. शासन निर्णय क्रमांक उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई क्र. भाखस-2002/2975/उदयोग-6/ दिनांक 7 मार्च, 2002 अन्वये फेब्रीकेशनच्या वस्तु कारागृहाकडुनच खरेदी बंधनकारक असतांना कारागृहाकडुन खरेदी का करण्यात आली नाही. खुलासा करावा.

3. डयुलडेक्स खरेदी करतांना स्पेसीकिकेशन दरान्वये खरेदी न करता कमी दर्जाचे साहित्य जादा दराने खरेदी केले आहे खुलासा करावा.

4. दराची बाजार दराशी पडताळणी करण्यात आली नाही व कमी दर्जाचे साहित्य जादा दराने खरेदी केल्याचे दिसते फर्नीचर खरेदी करताना टिकाऊपणा ध्यानात घेण्यात आल्याचे दिसत नाही.

5. डयुलडेक्सचा प्रती दर 2950/- कशाचे आधारे लावण्यात आला, खरेदी प्रक्रिया करण्याअगोदरच दर कसा ठरविला याबाबत खुलासा करावा.

6. शासन निर्णय 1992 मधील तरतुदीचा विचार न करता संबधीत शाळानी पुरवठादारास रकमेचे प्रदान नियमबाहयरीत्या करण्यात आले आहे.

7. सबंधीत शाळांची मनपा शिक्षण विभागास फर्नीचरची मागणी केलेचे दिसन आले नाही. त्यामुळे मागणी शिवाय डयुलडेस्क खरेदीसाठी अनुदान कसे वाटप करण्यात आले खुलासा करावा.
8. वरील 15 शाळा मध्ये पुर्वी किती फर्नीचर/डयुलडेक्स होते. त्यातील किती वापरात व किती निरुपयोगी याविषयी सबंधीत शाळाची माहिती उपलब्ध करुन न दिल्याने सबंधीत शाळाना खरोखरच डयुलडेस्कची आवश्यकता होती याची खात्री करता आली नाही.

9. फर्नीचर पुरविलेल्या शाळेची नियंत्रण नोंदवही व साठा नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविण्यात आली नाही. नोंदवही ठेवली नसेल तर याच योजनेखाली लाभ दिलेल्या शाळांना दुबार लाभ न देणेबाबत नियंत्रण कसे ठेवले खुलासा करावा.

10. डयुलडेस्कची साठा नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहित. याबाबत सबंधीत शाळानी साठा नोंदवही दाखवुन खात्री पटवावी.

11. साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत सबंधीत सक्षम अधिका-याने खरेदीपुर्वी प्रमाणपत्र दिलेले नसल्याने गणवत्ता पुर्ण व दर्जेदार मालाचा पुरवठा झाले बाबत खात्री करता आली नाही. खुलासा करावा.

12. खालील शाळांचे डयुलडेस्क खरेदीची संचीक तपासली असता खालील उणीवा निदर्शनास आल्या.

1. **मनपा प्रा.शा. हैदरबाग उर्दु शाळा :-** यांनी तीन दरपत्रके मागवुन कमी दर असलेल्या जनसेवा ॲग्रो इंडस्ट्रीज कडुन रु. 2950/- प्रमाणे 16 डयुलडेस्क खरेदी प्रित्यर्थ पुरवठादारास रु. 47200/- अदा केले आहे. उर्वरीत रक्कम रु. 2700/- सबंधीत शाळेने अद्यापर्यंत मनपास परत केली नाही. याबाबत खुलासा करावा व रक्कम वसुल केल्याचे दर्शवावे.

- सदर शाळेने साहित्याची नोंदसाठा नोंदवहित घेण्यात आली नाही.
- खरेदी बिलावर साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र नाही.

1. **मनपा प्रा.शा. किल्ला :-**

- सदर शाळेने डयूलडेस्क तीन दरपत्रके मागवुन कमी दर असलेल्या जनसेवा ॲग्रो इंडस्ट्रीज, नांदेड यांचेकडुन 2950 X 16 = 47200/- + वाहतुक भाडे रु.300/- अशी 47500/- अदाई केली आहे. उर्वरीत रक्कम रु. 2500/- मनपास परत केली नाही खुलासा करावा व वसुल करुन दर्शवावे.
- जनसेवा ॲग्रो इंडस्ट्रीज, नांदेड हे डयुलडेस्कचे मॅन्युफॅक्चर करीत असल्याबाबत बिलावर नमुद नाही.
- दरपत्रकावर पुरवठादाराची स्वाक्षरी नाही.
- बिलावर दिनांक नमुद नसल्याने डयुलडेस्कचा पुरवठा कधी केला याची खात्री पटत नाही. डिलेव्हरी चालान पहावयास मिळाले नाही.

2. मनपा प्रा.शा. विष्णुनगर :-

- सदर शाळेचे मे. स्मिता इडस्ट्रीज, नांदेड यांचेकडुन बिल क्र. 29 दि. 26/10/12 अन्वये 2330 x 19= 44270/- + वॅट 12.50% 5529/- अशी एकुण रु. 49799/- पुरवठादारास अदाई केली आहे. निवीदा मागविल्या नाहित, पुरवठा आदेश नाहित बिलावर सदर साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र नमुद नाही त्यामुळे प्राप्त साहित्य चागंल्या स्थितीत प्राप्त झाल्याबाबत खात्री पटत नाही.
- सदर साहित्यांचा साठा नोंदवहित नोंद घेण्यात आली नाही.

3. मनपा प्रा.शा. भिमसंदेश :-

- सदर शाळेने डयुलडेस्क खरेदी संचीका लेखा परीक्षणास मागणी करुनही सादर केली नाही. त्यामुळे सदर शाळेस डयुलडेस्क खरेदी केल्याची खात्री पटत नाही. तरी सबंधीत शाळेकडुन रक्कम रु 50000/- वसुल करुन मनपा निधीत भरणा करावी व अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

4. मनपा प्रा.शा.गणेशनगर :-

- प्राप्त दरपत्रकातील दराचा तुलनात्मक तक्ता तयार केला नाही त्यामुळे कमी दराच्या पुरवठादाराकडुन खरेदी केलेबाबत खात्री पटत नाही.
- डयुल डेस्कची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली नाही.

5. मनपा प्रा.शा. सिडको :-

- डयुल डेस्क बिल न. 30 दि. 28/10/12 अन्वये रु. 28831/- ची खरेदी करण्यात आली आहे. उर्वरीत रु. 669/- मनपास परत करण्यात आले नाही.

6. मनपा प्रा.शा. आंबेडकर नगर :-

- सदर शाळेने रु. 49896/- ची डयुल डेस्कची खरेदी केली आहे उर्वरीत रक्कम रु 104/- मनपास परत केली नाही परत करुन अनुपालन दर्शवावे.

7. मनपा प्रा.शा. ब्रम्हपुरी :-

- सदर शाळेने रु. 47200/- ची डयुलडेस्क खरेदी केली आहे उर्वरीत रक्कम रु. 800/- मनपासन परत केली नाही. परत करुन अनुपालन दर्शवावे.

वरील प्रमाणे अ.क्र. 1 ते12 बाबींचा खुलासा करुन अनुपालन लेखापरीक्षणास त्वरीत सादर करावे.

वरील बाबी सबंधी लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास अन्वये कळवुनही ले.प. कालावधीत उत्तर प्राप्त न झाल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
183	10/10/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- F-NJK – 5601
DAT STP F-610

परिच्छेद क्रं.	शिर्षक
25	वाहन लिलावा बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
14	मोटार व्हेइकल विभाग	यांत्रिकी विभाग	9 अ	11	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	---	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- नांदेड महानगरपालिकेत वाहन वि भागाने सन 2011-12 मध्ये खाली नमुद केलेल्या वाहनाचा लिलाव करणेसाठी जिल्हा स्तरावर असणा-या दैनीक वर्तमानपत्रात जाहिरात न देणे, उपप्रादेशिक परीवहन अधिकारी, नांदेड यांचेकडुन वाहन लिलाव करणे बाबत प्रमाणपत्र प्रात्प न करुन घेणे, तसेच ठेकेदाराने वाहन वेळेत घेवुन न गेल्यामुळे जागेचे भाडे वसुल बाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

नांदेड महानगरपालिकेत वाहन विभागचे सन 2011-12 मध्ये खाली नमुद केलेल्या वाहनांचा लिलाव केलेल्या संचीकेची तपासणी केली असता नियमानुसार कोणतीही कार्यवाही न करता वाहनाचा लिलाव केलेला दिसुन आल्याने लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र.क्र. 64 दिनांक 19/07/2013 अन्वये माहिती/उत्तरे मागीतली होती. याबाबत सबंधीत विभागने उत्तर सादर न केल्याने लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येतात.

अ.	वाहन क्रमांक	वाहनाचा प्रकार	मॉडेल	आरटीओ यांनी केलेले	प्राप्त जास्त दर

क्रं.				मुल्यनिर्धारीत	
1	2	3	4	5	6
1.	MH-26-A 2000	इस्टीम कार	1996	14 ते 15000	25209
2.	MH-26-6200	1.38 कार	1997	14 ते 15000	28200
3.	MH-26-6300	1.38 कार	1998	14 ते 15000	16000
4.	MH-26-6400	1.38 कार	1998	14 ते 15000	15000
5.	MH-26-4707	1.38 कार	1997	--	--
6.	MH-26-B-7107	मिनीडोर	2000	8 ते 9 हजार	22000
7.	MH-26-6704	बजाज ॲटो	1991	4 ते 5000	15000
8.	MWP-6682	मिनी फायर जिप	1976	7 ते 8000	7000
9.	MH-Q 3190	टिप्पर	1979	9000 ते 1 लाख	157000
10.	MTB-2145	टिप्पर	1974	9000 ते 1 लाख	154000
11.	C.C. मिक्स 1	मिक्सर	1974	--	56500
12.	C.C. मिक्स 2	मिक्सर	1974	--	65300
13.	MZZ-886	MSM जिप	1986	10 ते 12000	40000
14.	MZZ-530	MSM जिप	1983	6 ते 7000	35000
15.	MH-26-B 7412	मिनीडोर	1983	4 ते 5000	24000
16.	MH-26-5300	ॲम्बेसेडर कार	1992	14 ते 15000	25000
17.	MH-26-B 4507	टाटा 709 टँकर	1996	1 लक्ष ते 1 लक्ष 20 हजार	150000
18.	MH-26-B 7160	मिनीडोर	1998	3 ते 4000	16000
19.	स्क्रॅप (भंगार)	1 टन	--	26-11 प्रती कि.ग्रॅ.	--
20	जुने टायर्स	100 नग	--	प्रती टायर्स	--

वरील अ.क्रं. 1 ते 18 वाहनाची तपासणी करणेबाबत उपप्रादेशीक परीवहन कार्यालय, नांदेड यांना मनपा/यांवि/257/दि.24.10.2011 अन्वये कळविले असुन आजच्या बाजार भावा प्रमाणे किमंतीचे अहवाल अहवाल सादर करणेबाबत कळविले असुन मोटार वाहन निरीक्षक प्रादेशीक परीवहन, नांदेड यांनी वरील प्रमाणे वाहनाचे मुल्य निर्धारीत दर कळविले असुन त्यानुसार यांत्रिकी विभागाने पत्र क्रं.यांवि/368/दि.17.2.2012 अन्वये दै.प्रजावाणी या वर्तमापत्रात दि.18.2.2012 ते 3.3.2012 पर्यंत निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) सदरचे वाहनाची लिलावाद्वारे विक्री ही नप्रस/निवीदामागवणि/05/ प्र.क्र./151/05/9/दि.29 डिसेंबर, 2005 अन्वये रक्कम रू.5,00,000/- पेक्षा कमी असल्याचे जिल्हा स्तरावर व 5 लाखाचे वरील रक्कमेचे राज्यस्तरीय दैनीक

वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देऊन लिलाव करणे आवश्यक होते. परंतु मनपाने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये (दै.प्रजावाणी) जाहीरात दिल्याचे संचिकेवरून दिसुन येते. त्यामुळे जास्त प्रसिध्दी न दिल्याने जास्तीत जास्त ठेकेदाराकडून स्पर्धा होऊन मनपास स्पर्धात्मक लाभ मिळाल्याचे दिसुन येत नाही. याबाबत समर्थनीय खुलासा करण्यात यावा.

2) वाहनाचा लिलाव करण्यापूर्वी वित्तीय अधिकारी नियमपुस्तीका 1978 मधील भाग पहीला उपविभाग (2) अ.क्र.19 अन्वये व महाराष्ट्र आकस्मीक नियम 1965 मधील नियम क्र.69 नुसार वाहनाचे किमान किलोमीटर धावसंख्या किंवा वाहनाचे किमान 10 वर्ष आयुष्यमान गृहीत धरून यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर वाहनाचा लिलाव करावा अशी तरतुद असतांना याबाबत कुठल्याही तरतुदीचे पालन केलेंडर असल्याचे दिसुन येत नाही. उदा.अ.क्र.6 वरील वाहने तसेच प्रस्तावामध्ये एकाही वाहनाची धावसंख्या नमुद करण्यात आलेली नाही.

3) वाहन लिलाव कनणेपूर्वी उपप्रादेशीक परीवहन अधिकारी यांचेकडून वाहन दुरूस्ती करून यापुढे उपयोगात आणणे आर्थिक दृष्टया किफायतशीर राहणार नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र प्राप्त करूनच लिलाव करणे आवश्यक होते परंतु. असे प्रमाणपत्र न करता प्रादेशीक परीवहन कार्यालय, नांदेड यांना कालबाहय वाहनचाचा लिलाव करणेबाबत कळविले आहे.

3.

4) अ.क्रं.8 ते 14 वाहनाची नोंदणी उपप्रादेशीक परीवहन कार्यालयाकडे केल्याचे दिसुन येत नाही. सदरचे वाहन हे कधी खरेदी करण्यात आलेले आहे. याबाबतचे अनुषंगीक कागदपत्रे लेखा परीक्षणात उपलब्ध करनू देण्यात आले नाही व सदर वाहनाची नोंदणी का करण्यात आली नाही. याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

5) अ.क्र.5,11, व 12 चे आरटीओ चे दर घेतल्याचे लेखा परीक्षणास दर्शविले नाही. खुलासा करावा.

6)

ज्या वाहनाचा लिलाव झालेला आहे. त्या व्यक्तीनी सदरचे वाहन मनपाकडे विहीत रक्कम भरून विहीत मुदतीत घेऊन गेल्याचे संचीकेवरून दिसून येत नाही. तरी सदरची वाहने ही कधी घेऊन गेले तीन दिवसाचे आत ताब्यात न घेतल्यास प्रती दिन रू.100/- प्रमाण संबंधीताकडून डॅमरेज जागाभाडे वसुल केले किंवा कसे याबाबतची खात्री पटविण्यात आली नाही.

7) जुनी वाहने घेण्यासाठी एकुन 7 लोकांनी निवीदा फॉर्म नेले असुन अनामत रू.1000/- प्रमाणे 7 हजार भरणा केले आहे. त्यामुळे अनामत भरलेल्या व्यक्तीनांच वाहन दिले बाबत खात्री पटवावी.

8) वाहन खरेदीदाराने वाहनाचे हस्तातंरणे टॅक्स, विमा ईत्यादी स्वतः करावयाचे असुन सदर बाकी खरेदीदाराने केलेबाबत खात्री पटवावी.

9) जुने भंगारासाठी एकुण 8 व्यक्तीनी निवीदा फॉर्म भरले असुन जुने टायरसाठी एकाच व्यक्तीनी निवीदा फॉर्म भरल्याचे दिसुन येते. जुने भंगार प्रती कि.ग्र. 26.11 प्रमाण 1 टन विक्री केल्याचे दिसुन येते. जुन भंगार विक्रीचे शासनाचे दरानुसार विक्री का करण्यात आली नाही. याबाबत खुलासा करावा व 1 टन भंगार विक्रीची रक्कम भरणा करणेबाबत दर्शविण्यात यावे.

10) जुने टायर 100 नग 20 प्रती टायर प्रमाणे विक्री केले आहे. जुने टायर कोणत्या वाहनाचे होते त्यावाहनाचे लॉगबुक, इतीहास पुस्तीका, लेखा परीक्षणास दर्शविले नाही तसेच सबंधीत टायरची धावसंख्या 60000/- पर्यंत झाली किंवा केस किती किलो मिटर पर्यंत सदर टायर चालले याची संचीके अभावी तपासणी केली नाही, तरी टायरची धावसंख्या दर्शवुन खात्री पटवावी.

11) जुने भंगार व जुने टायरची मनपा लेखा संहीता 1971 चे नियम 149 चे नियम नुसार न.न. 116 मध्ये वाटप केलेल्या साहित्यापैकी निरुपयोगी साहित्य परत प्राप्त झाल्यावर त्याची वस्तुनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेऊन वर्षातून एकदा भांडारमध्ये प्राप्त निरूपयोगी साहित्याची लिलावाने विक्री करून प्राप्त रक्कम मनपा निधीत जमा करणे आवश्यक आहे. मनपा भांडारात अशी नोंदवही ठेवल्याचे दर्शविले नाही.

वरील अ.क्र. 1 ते 11 बाबींचा खुलासा करावा व अनुपालन सादर करावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
64	19/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DATNJK – 5601

75	उत्तर नांदेड पाणीपुरवठा व्यवस्थापन कंत्राटदार श्री एम.टी. फड, परभणी यांनी शासकिय विमा व कामगार कल्याण उपकर शासनाकडे न भरणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजना

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
06	जेएनएनयुआरएम	केंद्र शासन	9 ब	2	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
---	5886474/-	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः-

शासकिय विमा व कामागार कल्याण उपकर ची रक्क्म शासनाकडे न भरणेबाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मधील जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजने अंतर्गत उत्तर नांदेड पाणीपुरवठा वाहतुक व वितरण व्यवस्थेचे संचिका, मोजमाप पुस्तीका, देयकांचे लेखा परीक्षण करताना उत्तर नांदेड पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी अंदाजपत्रकिय रक्कम रु. 294323734/- एवढी मंजुर आहे. सदर काम दि. 30/04/2010 रोजी पुर्ण करणेत आलेले असुन 25 वे अंतीम देयकसुध्दा संबधीतास अदा केलेले आहे, परंतु देयकात/मोजमाप पुस्तीकेत शासकिय विमा व कामगार कल्याण उपकराची रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा केलेली दिसुन आली नाही.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई परिपत्रक क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र. 166/98 नावि-24 दि. 03/11/2003 नुसार शासनाचा महसुल वाढविण्याच्या दृष्टीने शासकिय विमा निधीकडे कंत्राटी कामाचा कंत्राटदाराने विमा संचालयानालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे विमा उतरविणे सक्तीचे आहे. परंतु कामाची तपासणी करताना कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविलेला दिसुन आला. अन्य विमा कंपनीचा विमा स्विकारले जाणार नाही. असे स्पष्ट निदेश असतानाही शासकिय विमा उतरविलेला नाही तरी उक्त शासन निर्णयान्वये अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% दराने रक्कम रु. 2943237/- एवढी रक्कम कंत्राटदाराकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

2. कामगार कायदा 1966 चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए/2009/प्र.क्र. 108/कामगार -7 अ, दि. 17/06/2010 नुसार कायद्याच्या व्याख्येत बसणा-या कामासाठी मजुरीने मजुर लावलेल्या मालकास अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% रक्कम कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक आहे. सदर रक्कम कपात न केल्यामुळे व अशा तरतुदीकडे लक्ष न दिल्यामुळे शासनाचे रक्कम रुपये 2943237/- चे आर्थीक नुकसान झालेले आहे. तरी संबधीताकडुन सदर रक्कम वसुल करुन शासन खाती भरणा करावेत.

सदर बाबीसंबधी संबधीत विभागास अर्धसमास पत्र क्र. 197 दि. 11/10/2013 नुसार निदर्शनास आणुन देण्यात आले. सदर विभागाने दिलेले उत्तर संयुक्तीक नसल्याने लेखा परिक्षणाचे उपरोक्त अभिप्राय कायम ठेवण्यात येतात.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
197	11/10/2013	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DAT - UEMF-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
76	उत्तर नांदेड पाणीपुरवठा वाहतुक व वितरण व्यवस्थेसाठी एम.एस. पाईप्स व डी.आय. पाईप्सच्या खरेदीवरील उत्पादन शुल्क / केंद्रीय अबकारी कर भरल्याचे अभिलेखे उपलब्ध करुन न देणेबाबत. देयक क्र. 25 व अंतीम टोकन क्रमांक 6222 दि. 31/03/2011

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान योजना

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
06	जेएनएनयुआरएम	केंद्र शासन	9 ब	1	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
---	40721906/-	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः-

एम.एस. पाईप्स व डी.आय. पाईप्स खरेदीवरील उत्पादन शुक्ल (Excise duty) अंतीम देयकातुन कमी / कपात न करणे.

सविस्तर परिच्छेद ः-

नांदेड वाघाळा महानगरपालिकेस महानगरपलिका हद्दीत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुरुत्थान योजनेअंतर्गत केंद्रशासनाकडुन उत्तर नांदेडसाठी 90.81 कोटी केंद्र शासन मंजुरी व सनियंत्रण मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यान्वये पाणीपुरवठा व वाहतुक वितरण व्यवस्थेसाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात आली.

1	निविदा किंमत	294323734/-
	निविदा सुचना	8025/दि. 08/09/2006
3	प्राप्त निविदा	एकुण 4
4	सर्वात कमी दराची निविदा	श्री. एम.टी. फड, परभणी
5	निविदा दर	19.89 (अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त)
6	कमी केलेला दर (वाटाघाटीनंतर)	19.50 (अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त)
7	स्थायी समिती ठराव क्र.	178/1.12.2006
8	करारनामा	22/12/2006
9	कार्यादेश क्र.	1259/22/12/2006
10	कामाची मुदत	18 महिने
	बँक गॅरंटी क्र.	272/2006 किंमत 7040000/-
12	मोजमाप पुस्तीका क्र.	292/51,281,192,271,278,183,291,189,256,254,284,219
13	कामपुर्ण दिनांक	30/04/2010

उत्तर नांदेड पाणीपुरवठा वाहतुक व वितरण व्यवस्था उत्तर नांदेडचे कामासाठी एम.ए. पाईप्स व डी.आय. पाईप्सचा खालीलप्रमाणे पुरवठा केल्याचे 25 वे अंतीम देयकावरुन दिसुन येते.

अ.क्र.	विवरण	BOQ परिमाण QTY	प्रत्यक्षात झालेला परिमाण QTY	कमी/जास्त परिमाण	BOQ दर रु.	BOQ रक्कम	प्रत्यक्षात रक्कम	कमी/जास्त रक्कम रु.
1	Manufacturing Providing, Suppling M.S. Pipes 900 mm dia	1940	1840	(-) 100	7311	14183340	13452240	731100
2	Providing D.I. Pipe grade Kg.							
	300 MM	8136	9374.5	(+) 1238.5	1821	14815656	17070964.5	2255308.5
	350 MM	4254	3253.5	(-) 1000.5	2283	9711882	7427740.5	2284141.5
	400 MM	5359	5358	- 0.5	2760	14790840	14789460	1380
	450 MM	4007	4005.28	- 1.72	3334	13359338	13353603.52	5734.48
	500 MM	6194	6194	---	3863	23927422	23927422	--
	600 MM	3481	3479	- 2	5121	17826201	17815959	10242
	150 MM	41552	42619	(+) 1067	842	34986784	35885198	898414

	200 MM	17460	17456	- 4	1150	20079000	20074400	4600
	250 MM	10979	10907	- 71.5	1520	16688080	16578640	109440
	100 MM	119246	119217	- 29	580	69162680	69145860	16820
Total						**249531223**	**249521488**	**6317180.5**

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. भारत सरकार वित्त व कंपनी व्यवहार मंत्रालयाचे महसुली कर व संशोधन विभागाचे परिपत्रक क्र. 659/50/2002 दि. 06/09/2002 अन्वये मनुष्य व प्राण्यास पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा करण्यासाठी वापरलेल्या पाईप्स खरेदी केले तर त्यावर उत्पादन शुल्क/ केंद्रीय अबकारी कर माफ केलेला आहे.

एम.एस. पाईप्स व डी.आय. पाईप्स खरेदीचे एकुण रक्कम रु. 249521488/- मध्ये उत्पादन शुल्क/केंद्रीय अबकारी कर (Excise duty) समाविष्ट आहे. उत्पादन शुल्काचा प्रत्यक्षात दर 16.32 आहे. तरी खरेदीच्या एकुण रकमेवर म्हणजेच

$$\left(\frac{249521488 \times 16.32}{100} = 40721906 \right)$$ 16.32 दराने रक्कम रु. 40721906/-

कंत्राटदाराचे अंतीम देयकातुन कमी/कपात करणे आवश्यक होते. सदर रक्कम महानगरपापलिकेने वजाती न करता कंत्राटदारास पुर्णपणे देयक अदा केलेले असल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. 40721906/- (आर्थीक) मिळणा-या उत्पन्नाचे नुकसान झालेले आहे. तरी संबधीताकडुन रक्कम रु. 40721906/- वसुल करुन महानगरपालिका निधीत जमा करावे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये लेख परीक्षणासाठी अर्धसमास पत्र क्रमांक 153 दि. 24/09/2013 अन्वये मागविलेली माहिती संबधीत विभागाने दिलेली संयुक्तीक नसल्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र. अथवा मुळ परि. क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
153	24/09/2013	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक :- DAT - UEMF-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
77	सन 2011-12 मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने मनपा निधीतून केलेल्या शासकीय विमा निधीचे रकमांचा भरणा न करणे बाबत.

योजनेचा संकेतांक	योजनेचे नांव
--	महानगरपालिका निधी

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
04	सार्वजनिक बांधकाम	मनपा निधी	9 ब	1	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	16,48,951/-	--	--

महत्वाच्या आक्षेपाचा सारांश ः- कंत्रादाराने केलेल्या कामाचा शासकीय विमा न उतरविणे/शासकीय विम्याची रक्कम भरणा न करणे.

सविस्तर परिच्छेद ः

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सन 2011-12 मध्ये क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मनपा निधीतून बांधकामाची कामे सोबत जोडलेल्या यादीनुसार कामे पूर्ण केलेली आहेत. निवड महिन्याचे कामाची तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आलेल्या आहे.

नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई परिपत्रक क्रमांक जीईएन/1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-24/दि.3.11.2003 नुसार शासनाचा महसुल वाढविण्याचे दृष्टीने शासकीय विमा निधीकडे कंत्राटी कामाचा कंत्राटदाराने विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे विमा उतरविणे सक्तीचे आहे. परंतु कामांची तपासणी करतांना कंत्राटदाराने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविलेला दिसून आले. अन्य विमा कंपनीचा विमा स्विकारले जाणार नाही असे स्पष्ट निदेश असतांनाही शासकीय विमा उतरविलेला नाही. तरी उक्त शासन निर्णयान्वये अंदाजपत्रकीय रक्कमेचा 1 % दराने खालील प्रमाणे क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत केलेल्या कामाचे शासकीय विमा निधीची रक्कम कपात करून/वसुल करून शासन निधीत भरणा करावी.

क्षेत्रीय कार्यालय क्रमांक	पूर्ण केलेल्या कामांची रक्कम रूपये	शासकीय विमा 1 % दराने रक्कम रूपये
01	2,23,75,284/-	2,23,752/-
02	3,99,72,704/-	3,99,722/-
03	2,86,88,411/-	2,86,883/-
04	3,68,91,065/-	3,68,910/-
05	1,97,93,025/-	1,97,929/-
06	1,71,75,583/-	1,71,755/-
एकूण		**16,48,951/-**

एकूण रक्कम रूपये 16,48,951/- संबंधीताकडून वसुल करून शासन निधीत भरणा करणेत यावा.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 26 दि. 19.6.2013 नुसार संबंधीत बांधकाम विभागास निदर्शनास आणून देण्यात आले. संबंधीत विभागाने दिलेले व लेखा परीक्षणास प्राप्त झालेले दि.26.6.2013 चे अनुपालन संयुक्तीक नसल्याने लेखा परीक्षणाचे उपरोक्त अभिप्राय कायम ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
26	19.6.2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- UEM-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
78	सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत महिला व बालके यांचा विकास WWSP वर झालेल्या खर्चाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सुवर्ण जयंती रोजगार योजना

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC	सुवर्ण जंयती योजना		9 ब	13	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	8234000/-	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- सुवर्ण जंयती रोजगार याजना अतंर्गत महिला व बालके यांचा विकास या घटकातंर्गत अनुदान वाटप प्रस्तावातील अनियमितता आढळुन आल्या.

सविस्तर परीच्छेद :-

मनपाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे लेखा परीक्षण करताना असे दिसुन आले की, सुवर्ण जयंती रोजगार योजने अतंर्गत महिला व बालके यांचा विकास या घटका अतंर्गत एकुण 55 महिला बचत गटाना रक्कम रु. 8234000/- इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे.

सदर बचत गटाच्या कर्जाच्या प्रस्तावही तपासणी करता त्यात खालील प्रमाणे उणीवा आढळुन आल्या आहेत.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना 2009 च्या मार्गदर्शक सुचनानुसार सक्षम महिला बचत गटास सामुहीक व्यवसायासाठी राष्ट्रीयकृत आणि शेडयुल बँकाकडून रू. 9.00 लक्षापर्यंत

कर्ज मिळते. प्रत्येक गटाला प्रकल्प किमतीच्या 35% किंवा 3 लक्षापर्यंत अनुदान देय आहे. तसेच प्रकल्प किमतीच्या 5% एवढी रक्कम गटाचे बीजभांडवल असेल.

सन 2011-12 मध्ये अशा 55 एकुण महीला बचत गटांना रु. 8234000/- अनुदान वाटप करणेत आले आहे सदर महिला बचत गटाच्या प्रस्तावाची तपासणी करता त्यात खालील प्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या.

1) चांदबीबी महिला बचत गट मिल्लतनगर
   1) प्रस्तावा सोबत जागेचा भाडे पट्याबाबत करारनामा नाही रू.20/- चे स्टँपवर.
   2) प्रस्तावावर समुह संघटक, प्रकल्प संचालक यांच्या स्वाक्ष-या नाही.
   3) प्रपत्र क्रं. 2 वर बचत गटातील अ.क्रं.4 अतीया अहेमदा जफर खान याचे दारीद्रय रेषेचा क्रमांक नमदु नाही.
   4) बँकेचे नाहरकत प्रमाणपत्र नाही.
   5) कोटेशनवर दुकानदाराची स्वाक्षरी नाही.

2) वैभवलक्ष्मी महिला बचत गट
   1) बचत गटातील अ.क्रं.1 प्रेमला संभाजी होडाले अध्यक्ष यांचे दारीद्रय रेषा क्रं. नमुद नाही.
   2) जागेचा भाडेपट्याबाबत रू.20/- चे बॉडवर करारनामा नाही.
   3) अ.क्रं.7 रूक्मीनी नारायण महाजन व अ.क्रं.8 सुरेखा विठ्ठल पोलादवार यांची स्वाक्षरी नाही.

3) मुकरम महिला बचत गट
   1) बचत गटाच्या अध्यक्ष परवीन बेगम शे.मुक्तार यांचा दारीद्रय रेषेचा क्रं.नमुद नाही.
   2) सचीव नसरीन बेगम यांचा दारीद्रय रेषेचा क्रं. नमुद नाही.
   3) जागेचा भाडे पट्याबाबत रू.20/- चे स्टँपवर करारनामा नाही.
   4) कोटेशनवर दुकानदाराची स्वाक्षरी नाही.

4) चॉद सुलताना महिला बचत गट
   1) बँकेचे नाहरकत प्रमाणपत्र सोबत जोडले नाही.
   2) जागेचा भाडे पट्याबाबत रू.20/- चे स्टँपवर करारनामा नाही.
   3) बचत गटातील अ.क्रं.3 बानुबी शेख अहमद यांचे जोडलेल्या बीपीएल प्रमाणपत्रात नाव नाही

5) हामजा माजीद महिला बचत गट

1) बँकेचे नाहरकत प्रमाणपत्र सोबत जोडले नाही.

2) कोटेशनवर दुकानदाराची स्वाक्षरी नाही.

6) अजमेरी महिला बचत गट

1) जागेचा भाडे पट्याबाबत रू.20/- चे स्टँपवर करारनामा नाही.

2) कोटेशनवर दुकानदाराची स्वाक्षरी नाही.

7) बीबी फातेमा महिला बचत गट

1) अ.क्रं.4 बिस्मील्ला बी मोहमद शेख यांची बीपीएल यादीत बिस्मील्ला खलील शेख असे आहे. निवडणूक ओळखपत्रावर बिस्मील्ला मोहमद शेख असे आहे. बीपीएल प्रमाणपत्रावर क्रं. 8788 नमुद आहे. अर्जावर क्रं.8738 नमुद आहे.

2) खतीला बेगम मेहमुद खान याचे बीपीएल यादी क्रं.6752 मध्ये नाव नाही. बीपीएल यादीत शेख कुटुंब नमुद आहे.

3) अ.क्रं.2 सलीमा बेगम शेख गनी यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

8) पंचशील महिला बचत गट समतानगर

1) बचत गटातील सदस्य उज्वला राहुल डोंगरे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

2) हर्षलता यशवंत विणकरे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

3) पंचशिला दत्ता गरजे बीपीएल यादीत नाव नाही.

4) अ.क्रं.9 ज्योती बळीराम सोंडारे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

9) बाबासाहेब महिला बचत गट

अ.क्रं. 4 अर्चना पांडुरंग भोरणे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

10) वैशाली महिला बचत गट जयभीम नगर

1) अरूणाबाई सुवास निखाते यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

11) रमाबाई महिला बचत गट जयभीमनगर

1) सदस्यांचे ओळख प्रमाणपत्र फोटोसह झेरॉक्स प्रतीत आहे. मुळ प्रतीत नाही.

2) सदस्यांच्या ओळखपत्रावर समुह संघटक प्रकल्प संचालक यांच्या स्वाक्ष-या नाहीत.

3) चंद्रकलाबाई कामाजी पोवाडे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

4) मंहानंदाबाई गोंविदराव सोनपारखे यांचे बीपीएल यादीत नाव नाही.

12) जनसेवा महिला बचत गट उमर कॉलनी

जागेचा भाडे पट्याबाबत रू.20/- चे स्टँपवर करारनामा नाही.

खालील सदस्यांचे बीपीएल प्रमाणपत्र जोडले नाही.

1) रजीया बेगम भो.इस्माईल बीपीएल क्रं.4982
2) फातेमाबी मुनुमिया बीपीएल क्रं. 5117
3) शहिन बेगम मो.खालेदखा बीपीएल क्रं. 4998
4) शहनाज बेगम अ.गफ्फार बीपीएल क्रं. 4988
5) सलीमा बेगम नजीर मिया बीपीएल क्रं. 5083
6) नुरजहा बेगम मो.इसाक बीपीएल क्रं.5026
7) जुलेखा बेगम मन्सुरखा बीपीएल क्रं.5083
8) चमन बेगम मो नजीरोद्यीन बीपीएल क्रं. 5123
9) शहरबानो सिराजोद्यीन बीपीएल क्रं. 5172

13) चांदमिनार महिला बचत गट

1) बचतगटातील महिलाचे दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत जोडण्यात आले नाही.

1. वरील प्रमाणे त्रुटीची पुर्तता न करताच आवश्यक ते कागदपत्र सोबत जोडले नसतानाही सदर बचत गटाचे प्रस्ताव छाननी शिवाय बँकेकडे केस सादर केले याबाबत खुलासा करावा.

2. तसेच सबंधीत बचत गटाने प्रकल्प किमतीच्या 5 % एवढी रक्कम बँकेत भरणा केल्याचे दर्शविण्यात आले नाही. तरी सबंधीत बचत गटानी प्रकल्प किमतीच्या 5%रक्कम बँक भरणा केल्याची खात्री पटवावी.

3. सबंधीत अधिकारी यांनी सबंधीत बचत गटाचा व्यवसाय योग्य रित्या चालु असलेबाबत तपासणी अहवाल दिसन आला नाही.

4. संबधीत बचत गंटाचे ज्या उद्यीष्ठासाठी कर्ज मंजुर झाले त्याच व्यवसायासाठी त्याचा वापर करण्यात आला याबाबत सबंधीत बचत गटाचे उपयोगीता प्रमाणपत्र लेखा परीक्षणात दिसन आले नाही. त्यामुळे शासनाचे उद्यीष्ठ सफल झाल्याची खात्री पटत नाही.

5. सबंधीत बचत गटांनी कर्जाची परतफेड नियमीत करण्यात येत आहे याबाबत अभिलेखे दर्शविलेले नाहीत.

वरील अ.क्र. 1 ते 5 बाबींची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

वरील बाबी सबंधी लेखा परीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र. 130 दिनांक 28/08/2013 अन्वये कळवुनही सदर बाबीचे अनुपालन लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत सादर न केल्याने सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
130	28/08/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
79	अग्नीशमन विभागातील जमा रक्कम उशिरा भरणा करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-31	अग्नीशमन विभाग		9 ब	3	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- अग्नीशमन विभागातील जमा रकमेबाबत.

सविस्तर परीच्छेद :-

1. मनपाचे सन 2011-12 चे लेखापरीक्षणात अग्नीशमन विभागाचे तपासणीत अग्नीशमन विभागामध्ये जमा रकमेची तपासणी करता असे दिसुन आले की, पावतीअन्वये जमा झालेली रक्कम त्याचे दिवशी किंवा दुस-या दिवशी बँकेत भरणा करणे आवश्यक आहे. परंतु सोबतच्या तपशिलाप्रमाणे जमा रकमेचा विलंबाने भरणा केला आहे.

2. महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम 1965 चे कलम 57 (ब) व कलम 77 अन्वये सक्षम अधिका-याने आर्थीक बाबीवर नियत्रंण ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली दिसुन आलेली नाही. याबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

3. तसचे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसरंक्षक उपायायोजना अधिनियम 2006 च्या कलम 25 नुसार खर्च नागरी स्थानीक स्वराज्य संस्था यायंनी आग सुरक्षा निधी स्थापण करणे आवश्यक असुन सदर निधी या अधिनियमानुसार लागु केलेल्या शुल्काची रक्कम जमा करुन तो अग्नीशमन दलासाठी आवश्यक उपकरणे व यंत्र सामुग्रीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. याबाबत लेखा परीक्षण पथकाचे अर्धसमास

पत्र क्र. 70 दिनांक 24/7/2013 अन्वये कळवुनही लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत उत्तर प्राप्त न झाल्यामुळे सदर परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे विलंबाने रकमा मनपा खाती भरणे बाबत सबंधीतांचा खुलासा करावा व केलेल्या कार्यवाहीचा तपशिल लेखा परीक्षणास सादर करावा. व अनुपालन दर्शवावे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
70	24/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
80	वैद्यकीय अग्रीमाच्या समायोजना बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12	आरोग्य विभाग		9 ब	1	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	10000/-	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- वैद्यकीय अग्रीम समायोजन देयके लेखापरीक्षणास सादर केली नाहीत.

सविस्तर परीच्छेद :-

कार्यालयीन परीपत्रक क्र. आदेश क्र. 92 दि. 03/04/2006 अन्वये मा. आयुक्त यांचे आदेश क्र. आरोग्य विभाग औषधी भांडार, कार्यालयीन आदेश क्र. 6567/दि. 02/08/2006 नुसार मनपाच्या सार्वजनीक दवाखान्यासाठी तातडीच्या काळात व शल्य चिकीत्सक उपकरणे खरेदी व दुरुस्ती ट्रान्सपोर्ट हमाली इत्यादीसाठी मान्यता दिल्याने अग्रीम रु. 10000/- मंजुर केला असुन अग्रीम रु. 10000/- खर्च दर्शविला आहे. परंतु सदर अग्रीमाचे समायोजन देयके, मुळ प्रमाणके लेखा परीक्षणास दर्शविले नाही.

सदर बाबत लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 90 दिनांक 31/07/2013 अन्वये कळवुनही सदर अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाहीत. त्यामुळे सदर परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
90	31/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
81	कोंडवाडा अनामत, कोंडवाडा फीस व खुराकिच्या रक्कमा.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12	(कोंडवाडा) विभाग आरोग्य विभाग		9 ब	4	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :-

1. मनपा ठराव नसुार कोडवाडा अनामत वसुल न करणे .
2. जमा रक्कमा विलंबाने भरणा करणे बाबत.
3. जनावरे सोडतांना जनावर मालकाचे औळखपत्र न घेणे.
4. जमा रकमाचे लेखा परीक्षण अतंर्गत लेखा परीक्षक यांनी न करणे.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अंतर्गत आरोग्य विभागाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात कोंडवाडा विभागाचे जमेची तपासणी केली असता असे दिसुन आले की, मोकाट फिरणा-या जनावरावर नियंत्रण ठेवण्यासाठी व मालकांच्या मोकाट जनावरे सोडण्याच्या प्रवृत्तीला प्रतीबंध घालण्यासाठी कोंडवाडयात टाकण्यात आलेल्या जनावरावर आकारण्यात येणा-या कोंडवाडा फीस, खुराकी खर्च व तारण फीचे दरास मनपा ठराव क्रं.158 दि.27.11.2006 अन्वये

दि.30.6.2008 पासून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कोंडवाडा विभागाने संबंधीत जनावर मालकाकडून अनामत, कोंडवाडा फी व खुराकी वसुल केली आहे.

अ.क्र.	जनावराचा प्रकार	कोंडवाडा फीस दर	खुराकी खर्च प्रती दिन	अनामत प्रती जनवार दर
1.	हत्ती	500	200	1000
2.	उंट	500	200	1000
3.	म्हैस, घोडा, बैल व रेडा	100	50	500
4.	गाय	50	50	500
5.	वासरू	25	25	250
6.	गाढव	25	25	250
7.	डुकर	25	25	100
8.	शेळया, मेंढया, बोकड, पिल्ले	25	25	00

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) उपरोक्त ठरावानुसार गाढव मालकाकडून अनामत रू.250/- वसुल करणे बाबत नमुद असतांना सदर अनामत रक्कम संबंधीत मालकाकडून वसुल न करता फक्त कोंडवाडा फी रू.25/- व खुराकी रू.25/- प्रतीदिन वसुल केली आहे. तरी सन 2011-12 मध्ये किती गाढव कोंडवाडयात ठेवण्यात आले व त्याची प्रती गाढव प्रमाणे अनामत फी रू.250/- प्रमाणे आकारणी न करणे बाबत. खुलासा मागविण्यात आला असुन मा. उपआयुक्त यांच्या वायरलेस आदेशानुसार गाढव अनामन रहफ. 250/- वसुल करणे बंद करण्यात आले असे त्यांचे पत्र क्र. दिनांक 20/08/2013 अन्वये कळविले आहे. वरीष्ठांचे लेखी आदेश तसेच टिपणी पहावयास मिळाले नाही. याबाबत खुलासा करावा.

2) कोंडवाडयात जनावरे आल्यानंतर त्यांची आल्याची व सोडल्याची नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असुन तशी नोंदवही ठेवली नसल्याचे दिसुन आले. तरी नोंदवही न ठेवल्याने कोंडवाडयात ठेवलेली जनावरे कोंडवाडयात कधी आली व त्यांना कधी सोडण्यात आले याची तपासणी करता आली नाही. सरासरी कोंडवाडयात ठेवलेली

जनावरे एकच दिवस कोंडवाडयात ठेवल्याचे दर्शवुन एक दिवसाची कोंडवाडा फी व खुराकीची रक्क वसुल केली आहे. नोंदवही अभावी याची सत्यता पटत नाही. तरी नोंदवही न ठेवणे बाबत खुलासा करावा.

3) मोकाट जनावरे कोंडवाडयातून सोडतांना संबंधीत मालकाचे त्यांचेच मालकीचे असल्याबाबत पुरावा न घेताच जनावरे सोडण्याबाबत खुलासा करावा.

4) सोबतच्या विवरणाप्रमाणे कोंडवाडा फी च्या रक्कमा वसुल केल्याअसुन सदर जमा रक्कमा मनपा खात्यात विलंबाने भरणा केल्या आहेत. मनपा अधिनियम 1949 चे कलम 83 (1) अन्वये जमा रक्कमा मनपा निधीत ताबडतोब भरणा करणे आवश्यक आहे. विलंबाने रक्कम भरणा करणे बाबत संबंधतीताचा खुलासा घेण्यात यावा व अनुपालन दर्शवावे.

5) कोंडवाडा फी दैनिक वसुली किर्दवर संबंधीत कोंडवाडा निरीक्षक/संबंधीत अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. संबंधीत कोंडवाडयाच्या आर्थिक व्यवहारावर संबंधीत अधिका-याचे नियंत्रण नसल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहीता 1971 चे नियम 69 (3) प्रमाणे संकलन पुस्तीकेतील नोंदी वसुली निरीक्षक/संबंधीतत अधिकारी यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. याबाबत संबंधीत अधिका-याचा खुलासा घेऊन अनुपालन दर्शवावे.

6) सदर कोंडवाडा जमा रकमांचे मनपाचे अंतर्गत लेखा परीक्षण संबंधीत अधिकारी यांनी केलेंडर नसल्याचे दिसून येते. सदर कोंडवाडयाचे संबंधीत अधिकारी यांनी लेखा परीक्षण न करणे बाबत खुलासा करावा. महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 77 अन्वये सबंधीत अधिकारी यांनी आर्थिक बाबीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

पावती क्रं	दिनांक	रक्कम	जनावर मालकाचे नांव	भरणा रक्कम			विलंब
				चलन क्रं.	दिनांक	रक्कम	
1	2	3	4	5	6	7	8
33	8.2.2012	600	दिनशे यादव				
34	8.2.2012	50	दिपक कृष्णा				
35	9.2.2012	400	सुरेश जाधव				
36	10.2.2012	200	अनील माने				

37	10.2.2012	50	सुभाष माने				
38	10.2.2012	450	अशोक जाधव				
39	10.2.2012	300	रत्नाकर बेरळीकर				
40	11.2.2012	500	सुर्यभान जाधव				
41	18.2.2012	175	जयराम गोडबोले				
42	18.2.2012	400	अतुल माने				
43	18.2.2012	250	सुरेश जाधव				
44	20.2.2012	300	इंदीराबाई कांबळे				
45	20.2.2012	50	दिलीप जाधव	21	3.3.12	7025	
46	20.2.2012	100	प्रभाकर माने	पावती क्रं. 33 ते 63			
47	20.2.2012	150	दिपक माने				
48	20.2.2012	50	रमेश माने				
49	20.2.2012	50	शंकर जाधव				
50	20.2.2012	50	पप्पु जाधव				
51	20.2.2012	175	साईनाथ विभुते				
52	20.2.2012	175	इंदीराबाई कांबळे				
53	20.2.2012	200	पप्पु माने				
54	20.2.2012	250	सिताराम माने				
55	27.2.2012	200	मजीदखान पठाण				
56	27.2.2012	400	मो.अमजद मुस्ताखान				
57	28.2.2012	50	दिलीप माने				
58	28.2.2012	50	किशन माने				
59	28.2.2012	50	दिपक माने				
60	28.2.2012	600	पांडूरंग धोंडगे	21	3.3.12	7025	
61	28.2.2012	300	गजानन इनामी	बुक क्रं.215			
62	29.2.2012	100	हिरामन माने	पावती क्रं.33 ते 63			
63	29.2.2012	300	गौस खान महेबुबखान	प्रत्यक्ष रक्कम 6725 भरणा 7025 जादा रक्कम 300			
		6725					
64	1.3.2012	200	जयदीप जाधव	22	31.3.	5200	

					12		
65	1.3.2012	200	अखीद जाधव	बुक क्रं.215 पावती क्रं.34 ते 77 प्रत्यक्ष रक्कम 5150 भरणा 5200 जादा रक्कम 050			
66	1.3.2012	250	काशीराम माने				
67	1.3.2012	300	हरणाबाई गवळी				
68	1.3.2012	300	मीर उस्मान अली मीर				
69	1.3.2012	250	अमोल जाधव				
70	1.3.2012	1300	लुकेशसिंह चौधरी				
71	2.3.2012	350	दिलीप माने				
72	2.3.2012	300	सत्यनारायण यादव				
73	19.3.2012	300	तुजजेस यादव				
74	19.3.2012	350	जयराम गोडबोले				
75	19.3.2012	350	जयराम गोडबोले				
76	19.3.2012	600	सुरेश डंख				
77	19.3.2012	100	संतु माने				
		5150					
78	31.3.2012	50	मुरली माने	बुक क्रं.886 चलन क्रं.1 दि.16.4.12 भरणा रक्कम 100/-			
79	31.3.2012	50	अशोक माने				
		100					

वरील बाबी संबधी लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 108 दिनांक 8/8/13 अन्वये खुलासा मागविण्यात आला असुन त्यांचे पत्र दिनांक 20/08/2013 अन्वये अनुपालन सादर केले असुन समर्पक अनुपालन प्राप्त न झाल्याने सदर परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
108	8/8/13	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
82	मनपा अंतर्गत दवाखन्याच्या औषधी साठा नोंदवहीतील त्रुटी बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-12	आरोग्य विभाग		9 ब	4	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- औषधीसाठा नोंदवहित प्राप्त औषधाची नोंद न घेतल्याने झालेल्या नुकसानीबाबत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अंतर्गत खालील दवाखान्याची 2011-12 औषधीसाठा नोंदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे प्रत्यक्ष औषधीच्या नोंदी शिल्लकी पेक्षा कमी घेण्यात आल्या आहेत.

1) **<u>शिवाजीनगर मनपा दवाखाना</u>** ः-

दि.18.5.2011 रोजी साठानोंदवहीत 4 कफ मिक्सचर 4 बॉटल शिल्लक होती. दि.19.5.2011 रोजी 3 बॉटल खर्च दर्शविला असुन 1 बॉटल कफ मिक्सचर शिल्लक दर्शविणे आवश्यक होते. परंतु दि.19.5.2011 अखेर शिल्लक निरंक दर्शविली नाही. तरी 1 बॉटल कफ मिक्सचरची रक्कम संबंधीताकडून वसुल करावी व मनपा निधीत भरणा करावी.

2) साठा नोंदवहीनुसार दि.4.6.2011 रोजी 690 ॲमॉक्सीलीन कॅपसुल अँटीबायोटीक 690 शिल्लक होती. दि.7.6.2011 रोजी 50 कॅपसुल खर्च दर्शविल्या असुन दि.7.6.2011 अखेर 640 कॅपसुल शिल्लक दर्शवणि आवश्यक होते. 30 कॅपसुल साठा नोंदवहीत

कमी शिल्लक ओढली आहे. तरी सदर 30 कॅपसुलची किंमत संबंधीताकडून वसुल करावी.

3) दि.21.5.2011 रोजी 315 फयुराझोलीडम टॅबलेट शिल्लक होत्या. दि.23.5.2011 ला सुशि 315 ऐवजी 255 ओढली. 60 टॅबलेट शिल्लक कमी ओढली असुन सदर 60 टॅबलेची रक्कम संबंधीताकडून वसुल करावी.

4) बुक क्रं.54 पावती क्रं.28 अन्वये दि.5.3.2012 रोजी 3000 कॅलशियम लॅक्टेड टॅबलेट मागणी केली असुन मुख्य दवाखान्याकडून 3000 टॅबलेट पूरविण्यात आल्या आहेत. साठा नोंदवहीत 4075 टॅबलेट शिल्लक असतांना 3000 गोळयाची एवढया मोठया प्रमाणात मागणी करणे बाबत खुलासा करावा.

वरील प्रमाणे शिवाजीनगर मनपा दवाखान्यातील संबंधीत कर्मचा-याकडून कमी जमा औषधीची रक्कम आकारणी करून वसुल करावी व मनपा निधीत भरणा करून दर्शवावे. उपरोक्त त्रुटीची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे.

वरील बाबत लेखापरीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र. 92 दिनांक 31/07/2013 अन्वये खुलासा मागवुनही समर्पक खुलासा सादर केला नाही त्यामुळे सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
92	31/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
83	मनपाच्या जागा शैक्षणीक संस्थाना खेळाचे मैदानासाठी भाडयाने लिजवर देणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-13	मालमत्ता विभाग		9 ब	3	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	39522/-	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :-

शासन निर्णय महसुल आणि वनविभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि. 08/02/83 च्या परीपत्रकान्वये शैक्षणीक संस्थेस दिलेल्या जागेचे भाडे आकारणी करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

मनपा अतंर्गत मालमत्ता विभागाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात जागाभाडे वसुलीच्या संचीका तपासल्या असता असे दिसुन आले की, मनपाने खालील जागा महात्मा गांधी मिशन शिक्षण संस्थेस सर्वे न. 6/2 मौ. असदुल्लाबाद येथील 4 एकर 15 गुंठे जागा खेळाचे मैदानासाठी नाममात्र रु. 101/- प्रतीमहा प्रमाणे 13/11/90 पासुन 99 वर्षासाठी लिजवर भाडयाने दिली आहे.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

शासन निर्णय महाराष्ट्र शासन महसुल आणी वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक एलआरएफ /1088/71133/सीआर/3478/जी/दिनांक 08/02/1983 अन्वये

शैक्षणीक वापर जागेचे भाडे किमतीच्या 25% वर 8 % आणि खेळाचे मैदानाचे वापराच्या जागेचे भाडे किमतीच्या 10 % वर 8 % भाडे आकारणे बाबत तरतुदी आहे.

परंतु मनपाने महात्मा गांधी मिशन शिक्षण संस्थेस सर्वे न. 6/2 मौ. असदुल्लाबाद येथील 4 एकर 15 गुंठे जमीन 13/11/1990 पासुन 99 वर्षासाठी नाममात्र 101/- प्रतीमहा प्रमाणे भाडयाने दिल्या आहेत.

वरील शासन निर्णयानुसार सदर संस्थेकडुन प्रतीवर्ष 1882/- प्रमाणे 13/11/1990 पासुन 31/03/2012 पर्यंत रक्कम रु. 1882 X 21 = 39522/- सबंधीताकडुन वसुल करुन मनपा निधीत जमा करावे व अनुपालन दर्शवावे.

तसेच राष्ट्रीय शिक्षण समीती सचंलीत भारत विद्यालय यांना सर्वे न. 110 मौ. नांदेड येथील 0ण्75 हेक्टर जमीन 14/11/1983 पासुन 99 वर्षासाठी नाममात्र भाडे 100/- प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने दिलेली आहे. सदर सस्थेकडुन जमीन मुल्याच्या 10 % वर 8% प्रमाणे एकुण 28 वर्षाचे 31/03/2012 पर्यंत जमीनभाडे आकारण परीगणीत करुन वसुल करुन मनपा निधीत भरणा करावे व अनुपालन दर्शवावे .

वरील बाबत लेखा परीक्षण अंतीम दिनाकापर्यंत अनुपालन सादर न केल्याने सदर परीच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
173	08/10/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
84	मनपा च्या जागा संस्थाना भाडेपटयाने देणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-13	मालमत्ता विभाग		9 ब	3	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	1324659/-	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :-

शासन निर्णय महसुल आणी वन विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि.08/02/83 च्या परीपत्रकान्वये शैक्षणीक संस्थेस दिलेल्या जागेचे भाडे आकारणी न करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

1. मनपा अतंर्गत मालमत्ता विभागाचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात असे दिसुन आले की मनपाच्या खालील प्रमाणे जागा शैक्षणीक संस्थेस भाडयाने नाममात्र भाडयानुसार भाडयाने 99 वर्षासाठी व काही 30 वर्षसाठी लिजवर भाडयाने दिलेल्या आहेत सदर जागेचे भाडे भाडयाने दिल्यापासुन नाममात्र दराने आकारणी केली आहे.

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

2. शासन निर्णय महसुल व सन वनविभाग मंत्रालय, मुंबई यांचे परीपत्रक क्रमांक एलआरएफ 1088/71133/सीआर/3478/दि. 08/02/1983 अन्वये शैक्षणीक वापर जागेचे भाडे जमीनीच्या किमतीच्या 25% वर 8% आकारवायचे आहे. त्यानुसार सोबतच्या तक्त्यात दर्शविलेल्या जागेचे भाड वसुल केले नाही. तरी नियमानुसार तक्त्यात

दर्शविल्याप्रमाणे फैजुल उल्लुम शिक्षण संस्था यांचेकडुन दि. 01/10/98 पासुन रु. 72267/- प्रती वर्ष प्रमाणे 17 वर्षाचे रु. 1228539/- व महात्मा गांधी मिशन शिक्षण संस्था यांचेकडुन दिनांक 13/11/87 पासुन 4005/- प्रमाणे 24 वर्षाचे रु. 96120/- वुसल करुन मनापा निधीत भरणा करावी व अनुपालन दर्शवावे.

मनपा जमीनी शैक्षणीक संस्थेस भाडयाने लिजवर दिले बाबत.

अ.क्र.	शैक्षणीक संस्थेच नाव	जमीनीचा तपशील / व मुल्य	किती वर्षापासुन	मनपाने ठरविलेले भाडे	वसुल भाडे	नियमानुसार वसुल करावयाचे भाडे	दि. 31/03/12 अखेर थकीत रक्कम
1	2	3	4	5	6	7	8
1	फैजुल उल्लुम शिक्षण संस्था	सर्वे न. 52 मौ. नांदेड 120 X 90 फुट	3 वर्षासाठी दि. 06/02/74 पासुन तदनंतर 60 वर्षासाठी दि. 01/10/1994 पासुन	1/- प्रती माह	रु. 17/- नाममात्र	72267 X 17 = 1228539	1228539
2	महात्मा गांधी मिशन शिक्षण संस्था	सर्वे न. 4/2 व 6/2 मौ. असदुल्लाबाद 1 हे. 49 आर मुल्य 134400X 1049 = 200256	30 वर्षासाठी दि. 13/11/86 पासुन	100/- प्रती माह	2400/- नाममात्र	4005 X 24 = 96120	96120
	एकुण						1324659

3. तसचे खालील शैक्षणीक संस्थेकडुन नियमानुसार लिजवर भाडयाने दिलेल्या दिनांकापर्यंत वरील शासन निर्णयानुसार जमीन मुल्याच्या 25% पी 8% प्रमाणे आकारणी करुन रक्कम मनपा निधीत भरणा करावी खालील संस्थेचे जमीन मुल्य करारनामे लेखा परीक्षणास सादर न केल्याने मुल्याकंन किती होते मुल्याकंना नुसार आकारणी करता आली नाही तरी वरील प्रमाणे परीगणीत करुन रक्कम मनपा निधीत भरणा करावी.

अ.क्र.	संस्थेच नाव	एकर/हेक्टर	दिनांक
1	शारदा भवन एज्युकेशन सोसायटी	18.6 एकर	01/02/1963 पासुन 31/03/2012 पर्यंत
2	मदिना तुल उल्लुम	2 एकर	01/04/1996 पासुन 31/03/2012 पर्यंत
3	नॅशनल एज्युकेशन सो.	3 एकर	16/11/1990 पासुन 31/03/2012 पर्यंत
4	राष्ट्रीय शिक्षण समीती	0.75 हेक्टर	14/11/1983 पासुन 31/03/2012 पर्यंत

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
173	08/10/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
85	महानगरपालिका हद्दीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकिचे सुशृषाग्रहाची नोंदणी, नुतणीकरण फी वसुल न केल्याने झालेल्या नुकसानी बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC -12	आरोग्य विभाग		9 ब	2	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	--	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः म.न.पा. हद्दीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकीच्या शुश्रुषा गृहाची नोंदणी न केल्याने झालेल्या नुकसानीबाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महानगरपालिका हददीतील खाजगी व ट्रस्टच्या मालकिच्या सुशृषा गृहाची नोंदणी नस्तीची मागणी केली असता सदर नोंदवही लेखा परीक्षणास सादर करण्यात आली नाही. लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास क्रमांक 103 दिनांक 07/08/2013 नुसार सबंधीत विभागास विचारणा केली असता लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत उत्तर प्राप्त न झाल्यामुळे खालील आक्षेप अंतीम करण्यात येत आहेत.

2. मुंबई शुश्रुषा गृहे नोंदणी अधिनियम 1949 व त्यातील सुधारणा मधील नियम-5 अन्वये महानगरपालिका हददीत येणा-या खाजगी व ट्रस्टच्या मालकीच्या सर्व मुंबई शुश्रुषा गृहाची नोंदणी करणे बंधनकारक असुन तशा नोंदणी अथवा नुतणीकरण 3 वर्षासाठी वैध्य राहील अधिनियमाच्या परीच्छेद 3 अन्वये नोंदणी न करता मुंबई शुश्रुषा गृह

चालवता येत नाही. अशा तरतुदी आहेत. पुढे अधिनियमाच्या परीच्छेद 6 अन्वये तसेच शासन निर्णय आरोग्य विभाग दि.15.1.2006 अन्वये नोंदणी न करणा-या मुंबई शुश्रुषा गृहाच्या चालकास 6 महीने कारावास किंवा रू.10000/- दंड अथवा दोन्ही शिक्षा लादण्याच्या तरतुदी असुन मनपा हद्यीतील शुश्रुषा गृहाच्या नोंदणी करीता रू.4000/-, रू.5000/-, रू.10000/- आणि नुतणीकरणासाठी रू.300/-, रू.400/-, रू.800/- अशी फी ठरविली आहे. आरोग्य विभागातील शुश्रुषागृहे नोंदणी नोंदवही लेखापरीक्षणास सादर न केल्याने मनपा हददीतील किती शुश्रुषा गृहाची नोंदणी, नुतणीकरण करण्यात आले ? ज्यांचे नुतणीकरण करण्यात अथवा नोंदणी करण्यात आली आहे त्यांचेकडुन मनपा ठरावानुसार रक्कम आकारणी न केल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात आर्थीक नुकसान झालेले आहे. याबाबत लेखापरीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्रमांक 103 दिनांक 07/08/2013 अन्वये मनपा हद्दीतील असणा-या खाजगी दवाखाने यांची वर्षनिहाय संख्या व नोंदणी केलेल्या व नुतणीकरण केलेल्या दवाखान्याची वर्षनिहाय माहिती सन 15 फेब्रुवारी, 2006 च्या आरोग्य विभागाचे शासन निर्णयान्वये वसुलपात्र नोंदणी/नुतणीकरण फी ची सुधारीत दराने वसुली न करण्याची कारणे इत्यादी बाबत आरोग्य विभागास विचारणा केली असता आरोग्य विभागाकडुन कोणतेही उत्तर व तत्सबंधी कागदपत्रे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन दिले नाहित.

3. शासन निर्णय दिनांक 15 फेब्रुवारी, 2006 च्या शासन निर्णयातील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका हद्दीतील सर्व दवाखाने, नर्सींग होत यांचेकडुन सुधारीत दराप्रमाणे वसुली करुन लेखापरीक्षणास अवगत करावे.

वरील आक्षेपाबाबत कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
103	07/08/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः-NJK – SDPF-6101

9 – क

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा

अधिनियम – 1930

चे कलम 9 (क) – अपहार किंवा

लबाडीमुळे झालेली हानी

परिच्छेद क्रं.	शिर्षक
86	पाणीपट्टी वसुली विभागातील वसुली लिपीक मोंहमद अख्तर शेख महेमुद यांचेकडील पावती क्रमांक 1009 लेखा परीक्षणाने न दर्शविणेबाबत व न.नं. 50 ला जमा घेतलेली रक्कम अचुक भरणा न करणे.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
06	पाणी पुरवठा विभाग	--	9 क	3	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
156500/-			

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- पाणीपट्टी वसुली विभागातील बुक क्रमांक 1009 न दर्शविणेबाबत.

सविस्तर परीच्छेद ः-

नांदेड वाघाळा महानगरपालिका सन 2011-12 चे पाणीपट्टी विभागातील वसुलीच्या रकमांची तपासणी करीत असताना माहे मार्च ञ 2012 या निवड महिन्यातील झोन क्र. 3 मधील वसुली लिपीक श्री मोहमद अख्तर शेख महेमुद यांचे पावती बुक क्रमांक 1009 हे न.नं. 50 (रोखवही) वर पावती क्र. 1 ते 98 नोंदविलेले असुन रक्कम रुपये 156500/- चे पावतीपुस्तक व त्यामधील पावत्या पहावयास न मिळाल्याने प्रत्यक्ष किती रक्कम जमा झाली याची खात्री करता आली नाही. त्याचा तात्पुरता अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पावती क्रमांक 99 व 100 व्दारे किती रक्कम जमा झाली याची खात्री करता आली नाही व सदर 99 व 100 व्दारे वसुल केलेली रक्कम न.नं. 50 ला नोंदविली नसल्याने सदर पावती क्रमांक 99 व 100 व्दारे वसुल केलेल्या रकमेचा अपहार केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. मोहंमद अख्तर शेख महेमुद यांचा पुर्व इतिहास पहाता सदर पावती बुक क्रमांक 1009 व्दारे वसुल केलेली रक्कमही अचुकच असेल याबाबत सांशकता वाटते तसेच सदर बुकातील पावती क्रमांक 99 व 100 व्दारे वसुल केलेली रक्कम न.नं. 50 ला नोंदविली नसुन त्याचा अपहार केल्याचे दिसुन येते (पावतीबुक न दर्शविल्याने रक्कम नमुद करता येत नाही) याबाबत सक्षम प्राधिका-यांनी योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन लेखा परीक्षणास सादर करावे.
2. महाराष्ट्र नगर परिषद 1971 चे नियम 69 (3) प्रमाणे संकलन पुस्तीकेतील नोंद व बेरजा वसुली अधिक्षक, कर निरीक्षक यांनी तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.
3. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 47 प्रमाणे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांनी स्थाई समितीच्या आदेशाच्या अधीन लिपीक व कर्मचारी यांच्या कामकाजावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. पाणीपट्टी विभागाकडील वसुली विभागात नियंत्रण अभावी / दुर्लक्ष झाल्याने वसुली लिपीकास अशा प्रकारे अपहार करण्यास वाव मिळतो, याबाबत सुस्पष्ट कारणासहित स्पष्टीकरणे करावे.

सदर पावतीपुस्तक उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 171 दि. 04/10/2013 अन्वये मागणी केली असता सबंधीत विभागाने लेखापरीक्षणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध करुन न दिल्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे व रक्कम रु. 156500/- तात्पुरता अपहाराची शक्यता कायम ठेवण्यात येत आहे.

पावती पुस्तक लेखा परीक्षणास न दर्शविणे

अ.क्र.	वसुली लिपीकांचे नांव	झोन क्र.	पावती पुस्तक क्र.	पावती क्रमांक	दिनांक	प्रत्यक्ष बेरीज	
1	मोहंमद अख्तर शेख महेमुद	3	1009	1 ते 98	14.2.12 ते 06.03.12	156500	न.नं. 50 नुसार बेरीज प्रत्यक्ष पावती पुस्तक पहावयास मिळाले नाही.
2	मोहंमद अख्तर शेख महेमुद	3	1009	99 ते 100	दिनांक नाही	--	न.नं. 50 ला जमा रक्कम दर्शविली नाही.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
171	04/10/2013	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DAT - UEMF-5901 DAT – NJK -5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
87	पाणीपट्टीच्या कर वसुल रक्कमा भरणा न करणे व बेरीज कमी दर्शवुन अपहार करणे.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
06	पाणी पुरवठा विभाग	--	9 क	7	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	124538/-		

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- वसुल रकमांचा भरणा न करणे कमी दर्शविणे बाबत.

सविस्तर परीच्छेद ः-

नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे सन 2011-12 चे लेखा परीक्षणात पाणीपट्टी वसुलीच्या पावत्यांची रक्कमांची तपासणी केली असता पाणीपट्टी विभागातील वसुली लिपीकांनी वसुलीच्या रकमा खालील तपशीलाप्रमाणे वसुल केल्याअसुन प्रत्यक्ष भरणा करताना पुर्णपणे भरणा न करणे व काही पावत्यांची रक्कम कमी दर्शवुन भरणा न केल्याचे आढळुन आले आहे. सदर रक्कमा न.नं. 50 ला जमा घेतल्या नाहीत व चालानव्दारे भरणाही केलेल्या नाहीत. तसेच न.नं. 50 ला प्रत्यक्ष बेरजेपेक्षा कमी बेरीज दर्शवुन अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

खालील पावत्याअन्वये वसुल रक्कमा न.नं. 50 ला (रोखवहीत) जमा न घेतलेबाबत / चलानव्दारे न भरले बाबत.

अ.क्र.	वसुली लिपीकांचे नाव	झोन क्र.	पावती पुस्तक क्र.	पावती क्र.	दिनांक	पावतीची रक्कम	प्रत्यक्ष जमा रक्कम	कमीजमा रक्कम	नळधारकाचे नांव
1	मोहंमद	3	100	52	दिनांक	5000	--	5000	म. हनीफ म.

	अख्तर शेख महेमुद				नाही				इब्राहीम म. खाजा
		3	967	28	19.1.12	1500	--	1500	गंगाराम देवजी आलमखाने
		3	1054	86	24.3.12	1500	1000	500	स. जाफर स. मौलाना
		3	1108	10	27.3.12	2000	--	2000	माधव पुंजाजी दुधे
		3	1108	70 ते 100	दिनांक नाही	68760	--	68760	सन 2011-12 च्या न. नं.50 जमा नोंद नाही/चलनव्दारे भरणानाही
	एकुण कमी जमा							**77760**	
2	देविदास जोशी	2	0	26 ते 36	1.3.12	12250	12050	200	
		2	0	81 ते 90	6.3.12	13770	13750	20	
		2	1028	9	21.2.12	1000	500	500	सौ. शकुंतला किशोर
		2	1028	14	23.2.12	4475	2500	1975	महादेव बळीराम
		2	1028	38	2.3.12	4992	4952	40	संध्या माने
		2	1028	71	5.3.12	1500	1000	500	मित्रवंदा कनपदके
		2	1028	79	6.3.12	2250	2000	250	गजानन चरकवाड
		2	1070	64	17.3.12	1500	0	1500	शिवकांताबाई
		2	1109	65	30.3.12	6750	0	6750	वामनराव ननाजी दुमनवार
		2	1109	96	31.3.12	4500	0	4500	मनीषा दिगंबर रायबोले
		2	1109	99	31.3.12	750	0	750	काशीनाथ माधव कदम
	एकुण कमी जमा							16985	
3	ओमप्रकाश	4	0	7	28.7.1	8640	8540	100	

	पडुळ				1				
		4	0	18 व 19	31.1.12	4500	0	4500	
	एकुण कमी जमा							4600	
4	जितेंद्रसिंग	1	1112	83	30.3.12	3000	1500	1500	अन्नाराम सिताराम शहाणे
	एकुण कमी जमा							1500	
5	राजीव पाटिल	4	1101	43 ते 61	31.3.12	125196	124883	313	चलन क्र. 71 बुक क्र. 757 दि. 31.3.2011
	एकुण कमी जमा							313	
6	गुरुनामसिंग संधु	4	0	4	7.3.12	4500	4000	500	762/27 दि. 7.3.12
		4	1067	5 ते 9	10.3.12	8025	8000	25	762/28 दि. 10.3.12
		4	1067	12 ते 16	12.3.12	11800	10300	1500	762/30 दि. 13.3.12
		4	0	59 ते 63	28.3.12	8500	7750	750	762/42 दि. 28.3.12
		4	0	69 ते 87	31.3.12	24750	24000	750	762/44 दि. 31.3.12
	एकुण कमी जमा							3525	
7	रणधीर लोखंडे	2	0	99 ते 100 व 1 ते 4	19.3.12	18600	17100	1500	699/5 दि. 19.3.12
		2	0	5 ते 8	20.3.12	9750	8250	1500	699/6 दि. 20.3.12
	एकुण कमी जमा							3000	
	एकुणात एक कमी जमा							107683	

प्रत्यक्ष बेरजेपेक्षा कमी बेरीज दर्शवुन कमी रक्कम चलान ने भरणेबाबत.

अ.क्र.	वसुली लिपीकांचे नाव	झोन क्र.	पावती पुस्तक क्र.	पावती क्र.	दिनांक	पावतीची रक्कम	प्रत्यक्ष जमा रक्कम	कमीजमा रक्कम	नळधारकाचे नांव
1	मोहमंद अख्तर शेख महेमुद	3	1009	86 ते 100	6.3..2012	19500	22500	3000	601/13
		3	1054	63 ते 75	21.3.2012	16750	19750	3000	601/67
2	देवदिास जोशी	2	1028	40 ते 48	3.3.12	22375	22300	75	0
			1028	49 ते 73	4.3.12	18575	17500	1075	0
			1070	37 ते 44	15.3.12.	9250	9000	250	0
			1070	73 ते 79	22.3.12	12630	11130	1500	0
			1109	16 ते 22	27.3.12	11250	11000	250	0
			1109	23 ते 32	27.3.12	12650	12150	500	0
			1109	33 ते 43	30.3.12	18250	18000	250	0
			1109	44 ते 56	29.3.12.	82710	80460	2250	0
			1109	57 ते 63	30.3.12.	8875	6950	1925	0
			1109	64 ते 98	31.3.12	56980	55200	1780	0
								9855	0

3	बुंगई	2	0	57 ते 66	30.3.12	17500	16500	1000	
एकुण कमी जमा								16855	

एकुणात एकुण कमी जमा 107683+ 16855 = 124538

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. महाराष्ट्र नगर परिषद 1971 चे नियम 69 (3) प्रमाणे संकलन पुस्तीकेतील नोंद व बेरजा वसुली अधिक्षक, कर निरीक्षक यांनी तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

2. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 47 प्रमाणे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांनी स्थाई समितीच्या आदेशाच्या अधीन लिपीक व कर्मचारी यांच्या कामकाजावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. पाणीपट्टी विभागाकडील वसुली विभागात नियंत्रण अभावी / दुर्लक्ष झाल्याने वसुली लिपीकास अशा प्रकारे अपहार करण्यास वाव मिळतो, याबाबत सुस्पष्ट कारणासहित स्पष्टीकरणे करावे.
3. उपरोक्त नियमांचे पालन न केल्यामुळे वसुली लिपीकांनी वसुल रकमांचा भरणा न करणे, कमी भरणा करणे तसेच प्रत्यक्ष बेरजेपेक्षा कमी बेरीज दर्शवुन रुपये 124538/- रकमेचा अपहार केल्याचे दिसुन येते.

4. सदर अपहार हा निवड महिन्यातील असुन पुर्ण सन 2011-12 इतर महिन्या मध्येही अपहार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर वसुली लिपीक जेंव्हापासुन वसुली लिपीकाचे काम करीत आहे. त्या कालावधीपासुन अपहार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अपहार वर्ष सन 2011-12 ते मागील महानगरपालिका स्थापन झाली तेंव्हापासुन पाणीपट्टी वसुली विभागाची तपासणी करणे आवश्यक आहे.

5. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पाणीपट्टी विभागाने पाणीपट्टी मागणी नोंदवही (Demand Ragister) न ठेवल्याने वसुली लिपीकांनी थकबाकीमधील किती थकबाकी वसुलकेली व किती बाकी राहिली याबाबत कुठलाच बोध होत नाही. त्यामुळे थकबाकी (पाणीपट्टीची वसुल) रकमेतही अपहार असण्याची शक्यता नाकारता येत नाही.
6. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 55 प्रमाणे वसुल रक्कमा कमी जमा करुन अपहारा बाबत प्रशासकिय चौकशी करुन संबधीतांवर योग्य ती कार्यवाही

करावी.

7. महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 चे नियम 55 (2) प्रमाणे भविष्यकाळात संभाव्य बाबीची पुनरावृत्ती रोखण्यासाठी योग्य ती उपाययोजना करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावी.

सदर अपहाराबाबतची माहिती व अभिलेखे बाबत अर्धसमास पत्र क्र. 132 दि. 28/08/13, 157 दि. 26/09/13 160 दि. 30/09/2013, 161 दि. 30/09/2013, 162 दि. 30/09/2013 171 दि. 04/10/2013 अन्वये माहिती मागविली असता संबधीत वि भागाने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6(2) नुसार अभिलेखे लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना उपलब्ध करुन देण्यात आलेले नसल्यामुळे रक्क्म रुपये 124538/- संबधितांकडुन वसुल करुन लेखा परीक्षणास अनुपालन दर्शवावे व न दर्शविण्याचे कारण मिमांसेसह खुलासा करावा.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
132,157,160,161,162,171	28,8,26,9,30,9,4,10, 13	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक :- DAT - UEMF-5901
DAT – NJK -5601

9 – ड

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा

अधिनियम – 1930

चे कलम 9 (ड) – खालील परिच्छेद

परिच्छेद क्रं.	शिर्षक
88	रेखाकंनातील रस्ते व गटारीच्या कामाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
09	नगररचना विभाग		9 ड		

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...		-

महत्वाचा अक्षेपाचा सारांश :- 1. रेखाकंन / लेआऊटचे पुर्ण विकासभार भरुन घेवुन रस्ते व गटारी न करणे.

2. विकासभारची आकारणी सुधारीत दराने न करणे.

सविस्तर परीच्छेद :-

नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांचे सन 2011-12 चे लेखापरीक्षणास रस्ते व गटारीच्या बांधकामावर अभिप्राय नोंदविण्यासाठी विहित प्रपत्रात माहिती अर्धसमास पत्र क्र. 181/दि . 09/10/2013 अन्वये मागणी केली होती.

मनपाचे नगररचना विभागाकडुन तात्पुरते रेखाकंनास मंजुरीदिली जाते त्याआधारे जिल्हाधिकारी सदर जमिनीची अकृषीक उपयोगासाठी आदेश निगमीत करतात त्यानंतर अंतिम रेखाकंनातील रस्ते व गटारी यांचा विकास करणे हि सर्वस्वी विकासकाची जबाबदारी असुन त्यांनी रस्ते व गटारी, विद्युत काम इ. कामे करणे बांधकाम नियंत्रण नियमावली नुसार आवश्यक आहे. तथापी काही विकासक 3% पयर्वक्षेण चार्जेस भरुन रस्ते विकासीत करतात व काही एआरटिपी ॲक्ट 1966 कलम 124 **J** नुसार पुर्ण विकासभार मनपाकडुन रस्ते विकसीत करतात परंतु महानगरपालिका, नांदेड रेखाकंनातील भुखंडासाठी म. प्रा. व नगररचना अधिनियम 1966 कलम 124 च्यानुसार बांधकाम परवानगी मंजुरीचे विकास शुल्क रु. 40% प्रतीचौरस मिटर (विकसीत) कारणासाठी वसुल करण्यात येते. औद्योगीक व वानीज्य वापरासाठी अ.क्र. 60 /- प्र.चौ.मी. व 80 प्र. चौ. मी. आकरण्यात येतो असे अर्धसमाच्या अनुपालनात म्हटले आहे.

प्रत्यक्षात नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 124 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. टीपीएस/1810/52. सीआर/2118/10 दि. 27/12/2010 अन्वये विकासभार हा 1 मार्च, 2011 पासुन सुधारीत दराने वसुल करणे आवश्यक असताना लेखापरीक्षणास अशी कार्यवाही केली नसल्याचे आढळुन आले आहे.

विभागाने क्र. 18051/दि. 25/10/2013 अन्वये सादर केलेले अनुपालन लेखापरीक्षणास मान्य करतायेत नाही. तरी शासन निर्णय व नगररचना अधिनियम 1966 च्या तरतुदीनुसार अमलबंजावणी करण्यात यावी.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र. अथवा मुळ परि. क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
181	09/10/2013	01/04/2011	31/03/2012	000 43964

लेखा परीक्षकाचा संकेतांक - DAT PDMM – 6101

परिच्छेद क्रं.	शिर्षक
89	गौण खनिज/स्वामित्वधनाची रक्कम शासनखाती जमा करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
07			9 ड	05	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	-

महत्वाचा अक्षेपाचा सारांश :- गौण खनिज/स्वामित्वधनाची रक्कम शासनखाती जमा करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

1. महानगरपालिका, नांदेड यांचे सन 2011-12 च्या वर्षाचे लेखापरीक्षणात शासकिय कामावर वापरलेल्या गौण खनिज/ स्वामित्वधनाच्या संचिका, अभिलेख्याची मागणी अर्धसमास क्र.16 दि07/06/2013 अन्वये मागणी करण्यात आली असता संचिकेचे अभिलेख्यावरुन तपासणी केली असता खालील प्रमाणे रक्कमा जिल्हाधिकारी कार्यालयास जमा केल्याचे दिसुन येते.

मुख्यलेखाधिकारी, नांदेड वाघाळा शहर महापालिका, नांदेड यांचे जा.क्र./मुलेप/1712/011 दि. 23/02/2012 अन्वये सन 2011 व 2012 या आर्थीक वर्षातील गुत्तेदारीकडुन गौण खनिज / स्वामित्वधनाची कपात करण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	धनादेश क्र.	दिनांक	रक्कम
1	31432	13/02/2012	1295392
2	31424	10/01/2012	2671031
3	224808	05/01/2012	685330
4	224800	27/12/2011	825654
5	224819	06/02/2012	1165800

2. खालील बँकखाती गुत्तेदारीचे देयकामार्फत कपात करण्यात आलेली स्वामित्वधन/ गौणखनिज रक्कम जमा केल्याचे दिसुन येते.

अ.क्र.	बँकखाते क्र.	दिनांक	ठेकेदाराचे नाव	धनादेश क्र.	रक्कम

1	31801200000213	23/02/2012	सोहेल कन्ट्रक्श्ान	218791	2533
2	31801200000213	18/02/2012	जुल्फेकार अ. अब्दुल	254860	3150
3	31801200000213	18/02/2012	एस.एम. अहमद	254873	1337
4	318010200069359	13/02/2012	कामरीकर कन्ट्रक्श्ानस	254852	7200
5	318010200069359	13/02/2012	प्रविण कन्ट्रक्श्ान	254859	7400
6	318010200008353	09/02/2012	एन.एन. भालेराव	83693	31011
7	318010200015482	17/02/2012	एन.एन. भालेराव	211892	11200
8	62178105253	21/02/2012	श्री.सिराजी हंगळे	782811	185250

3. नांदेड वाघाळा मनपा यांचे जा.क्र./1908/31/03/12 अन्वये बँकखाते क्र. 318010200000213 रक्कम रु 1209799/- जमा करण्यात आली आहेत.

4. नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांचे पत्र क्र. 13/ दि. 26/04/2012 अन्वये रु. 104357/- चा भरणा मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना केल्याचे दिसुन येते.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. महसुल व वनविभाग शासन निर्णय क्र. गौणखनिज 10/1009/सीआर 309/ दि. 11/02/2010 नुसार रु. 70.68 घनमिटर दाराने गौण खनिज/स्वामित्वधनाची रक्कम गुत्तेदारांच्या देयकातुन वजाती करणे आवश्यक आहे. परंतु सन 2011-12 मध्ये झालेल्या कामाचे स्वामित्वधनाची रक्कम देयकानुसार बँकखाती व बँकखाती नुसार शासनखाती 0853 गौणखनिज या शासन लेखाशिर्षात भरणा केल्याचे दिसुन आले नाही.
2. मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास धनादेश जमा केल्या बाबत पोंचपावती पहावयास मिळाली नाही.
3. गौणखनिजाची सन 2011-12 मधील एकुण जमा रक्कम शासनखाती जमा केलेली रक्कम व जमा करावयाची शिल्लक रक्कम याबाबत खात्री पटत नाही.
4. गोणखनिजची रक्कम जमा केल्याचा बँक खात्याचा ताळमेळ घेतला असल्याचे दिसुन आले नाही. तरी नियमीतपणे ताळमेळ करणे आवश्यक आहे.

5. बँकखाते व पासबुक यांच्या रोखवहीशी ताळमेळ घेण्यात आलेला नाही, त्यामुळे सन 2010-11 ची सुरवातीची शिल्लक वर्षभरातील जमा व सन 2011-12 अखेरची शिल्लक पहावयास मिळाली नाही.

6.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र. अथवा मुळ परि. क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
16	07/06/13	01/04/2011	31/03/2012	000 43964

लेखा परीक्षकाचा संकेतांक - DAT PDMM – 6101

परिच्छेद क्रं.	शिर्षक
90	ई. गव्हर्नस, संगणक विषयक सेवा बाबतची अभिलेख/संचिका व प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
	इ. गव्हर्नस				

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
4654602/-	...	---	-

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- ई. गव्हर्नस – लखापरिक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.

सविस्तर परीच्छेद :-

नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांचे सन 211-12 चे लेखापरिक्षणात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 अन्वये अर्धसमास मागणी पत्र क्र. 16 दि. 07/06/13 अर्धसमास मागणीपत्र क्र. 99/ दि. 06/08/13 अन्वये मागणी करुन देखील लेखापरिक्षण पथकास, लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

सन 2011-12 चे वार्षीक लेख्यावरुन ई-गव्हर्नस अंतर्गत रु. 4654602/- खर्च झाल्याचे दिसुन येते, मागणी करुन देखील अभिलेखगे उपलब्ध करुन न देणे हि अत्यंत गंभीर बाबत होय, सोबतच्या विवरणपत्रानुसार/कामावर खर्च झाल्याचे दिसुन येते, तरी सदरच्या अनियमीततेबाबत योग्य तो खुलासा करवा. तो पावेतो सदरचा खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येतो.

Cash Book Experses Side for 01/Apr/2011 to 31/Mar/2012 For A/c No .						
Date	Paid To	Details	Head of A/c	Ch No	Amount	Gross
30/06/2011	Omkar Computers, Nanded	A3 Paper Prition death and birth section	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211649	45508	0
		Income Tax		211650	931	0
		Surcharge		211650	112	46551
30/06/2011	M/s Vastal Enterproses, Nanded	re Insallation & re wiring of 5 kVA on line UPS & batter bank	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211654	30550	0
		Income Tax		211655	625	0
		Surcharge		211655	75	31250
4/8/2011	Portal Infosys, Nanded	Rep to Pringer scan etc	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211656	47673	0
		Income Tax		211657	975	0
		Surcharge		211658	117	48765
25/08/2011	Dynamic Computers, Nanded	Data entry for property tax	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211659	58279	0
		Income Tax		211659	1192	0
		Surcharge		211660	143	59614
		Data entry for property tax		211661	43922	0
		Income Tax		211661	900	0

		Surcharge		254881	108	44930
13/09/2011	Minitak Systems (I) Pvt. Ltd, Nashik	Pur of Computer marital	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254882	34897	0
		Income Tax		254882	714	0
		Surcharge		254883	86	35697
27/09/2011	Atharv Enterproses, Nanded	USB keyboard Purs	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254884	20309	0
		Income Tax		254884	298	0
		Surcharge		254885	36	0
		VAT		254885	744	21387
27/09/2011	M/s IBM India Pvt. Ltd, Pune	Computer section Material pur	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254886	118965	118965
27/09/2011	M/s Fourthech Computer, Pune	Pur of antivirus & antis Pam	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254887	62712	0
		Income Tax		254888	1327	0
		Surcharge		254888	159	0
		VAT		254889	2170	66368
27/09/2011	M/s Kusumagaj Enterprises, nanded	Pmc pur	ई - गव्हर्नस संगणक	254890	391040	0
		Income Tax		254891	8000	0
		Surcharge		254891	960	400000

			विषयक सेवा			
20/10/2011	Portal Infosys, Nanded	E-Governance (Sec.) Computer Services Bill Paid	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	217350	166974	0
		Income Tax		217351	3416	0
		Surcharge		217351	410	170800
20/10/2011	Shri Sadashiv Pandirao Patange	E-Governance Computer Services	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	217358	32325	32325
		imb WIN SVR 2008r2STD1-4CPU		254895	36390	0
		Income Tax		254896	744	0
		Surcharge		254896	89	37223
15/12/2011	Sujata Computers Pvt, Ltd, Pune	Comp Sys Lenovo high end pc pur	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254897	710454	0
		Income Tax		254898	15279	0
		Surcharge		254898	1833	0
		VAT		254899	36379	763945
15/12/2011	Fountainhead Info solutions Pvt, Mumbai	Design, development install, implementation and support for application software for local Body Tax	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254900	392000	0
		Income Tax		254901	8000	400000
15/12/2011	Aakash Computers, Nanded	Birth & Dead Section	ई - गव्हर्नस	254902	235200	0
		Income Tax		254903	4800	240000

			संगणक विषयक सेवा			
15/12/2011	M/s Stencil Engineering Pvt Ltd, Mumbai	Civil & interior finessing work CFC & other CFC Avirat ned	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254904	745970	0
		Income Tax		254905	15580	0
		Surcharge		254905	1870	0
		VAT		254906	15580	779000
23/01/2012	Abhished Advertisers	Paper Bill E-Governance		254907	503566	503566
31/03/2012	ECIS Computers (India) Pvt, Ltd Nagpur	Purchase of Printer	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211721	43491	0
		Income Tax		211722	933	0
		VAT		211723	2221	46645
31/03/2012	M/s Stencil Engineering Pvt Ltd, Mumbai	Purchase of Printer	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	211724	707349	0
		Income Tax		211725	14736	0
		VAT		211726	14736	736821
31/03/2012	IT Care System Nanded	Laptop purchase bill paid	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	254910	30923	0
		Income Tax		254911	1662	0
		Surcharge		254911	665	33250

31/03/2012	IT Care System Nanded	Samsung Galaxy Note bill paid	ई - गव्हर्नस संगणक विषयक सेवा	244912	34875	0
		Income Tax		254913	1875	0
		Surcharge		244913	750	37500
Total					**4654602**	**4654602**

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र. अथवा मुळ परि. क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
16	07/06/13	01/04/2011	31/03/2012	00043964
99	06/08/13			

लेखा परीक्षकाचा संकेतांक - DAT PDMM - 6101

परिच्छेद क्रं.	शिर्षक
91	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सन 2011-12 मध्ये प्राप्त झालेला निधी, झालेला खर्च, मागील शिल्लक आनुदान व एकुण शिल्लक निधी बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
28	सुवर्ण जंयती	केंद्रशासन राज्यशासन	9 ड	--	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- निधी प्राप्त होऊन सुध्दा तो खर्च न करणे.

सविस्तर परीच्छेद :-

सन 2011-12 मध्ये नांदेड वाघाळा महापालिकेसाठी खालील प्रमाणे निधी शासनाकडुन प्राप्त झाला होता.

अ.क्र.	योजनेचे नाव	मागील शिल्लक आनुदान	इतर प्राप्त निधी (परत आलेला धनादेश)	प्राप्त आनुदान रक्कम	एकुण निधी	31/03/12 अखेर झालेला खर्च	31/03/12 अखेर शिल्लक निधी
1	शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (USEP)	56.71	3.76	27.52	87.99	87.99	निरंक
2	शहरी महिला स्वयंसहाय्यता						

	कार्यक्रम						
	UWSP	79.507	3.85	78.53	161.88	82.32	79.56
	Tand C	6.60	--	21.80	28.40	28.40	निरंक
3	शहरी गरिबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम (STEP-UP)	32.76	---	8.04	40.80	1.48	39.32
4	शहरी मजुरी रोजगार कार्यक्रम (UWEP)	101.31	--	निरंक	101.31	निरंक	101.31
5	मुलभुत सोईसुविधा	11.76	--	निरंक	11.76	1.21	10.55
6	शहरी समाज विकास नेटवर्क (UCDN)	39.38	--	3.19	43.17	निरंक	43.17
7	आस्थापना व इतर	6.29	--	2.00	08.29	00.59	07.70

शहरी स्वंयरोजगार कार्यक्रम (USEP) या अंतर्गत 56.71 लाख एवढी रक्कम 2011-12 मधील मागील शिल्लक मध्ये दिसुन आली त्यामुळे निधी प्राप्त होऊन सुध्दा तो त्याच वर्षामध्ये खर्च करण्यात आलेला नाही. शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम अंतर्गत 31/03/12 अखेर 79.56 लाख एवढा निधी शिल्लक असल्याचे दिसते निधी का शिल्लक राहीला या बाबतीत सबंधीत विभागाने कुठल्याही प्रकारे कारणे दिलेले नाहीत तसेच इतर योजने मध्ये ही 31/03/12 अखेर बराच निधी शिल्लक असल्याचे आनुपालन व्दारे दिसत आहे व ते खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**योजनेचे नाव**	**31/03/12 आखेर शिल्लक निधी इतर प्राप्त निधी**
1	शहरी महिला स्वयंसहायत्ता कार्यक्रम	79.56 लाख
2	शहरी गरिबांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम	39.32 लाख
3	शहरी मजुरी रोजगार कार्यक्रम	101.31 लाख

4	मुलभुत सोई सुविधा	10.55 लाख
5	शहरी समाज विकास नेटवर्क	43.17 लाख
6	आस्थापना व इतर	07.70 लाख
31/03/12 आखेर अखर्चित रक्कम		**281.61 लाख**

राज्यामधील नागरी भागामध्ये दरिद्रय रेषेखाली लोकांचे राहणीमान ऊंचावण्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या द्रष्टीने दि. 01/12/1997 पासुन केंद्र पुरस्कृत सुवर्ण जंयती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली आहे. ही योजना सर्व महापालिकेमध्ये राबविण्यात येत आहे. ही योजना स्थानिक कला व कौशल्य यांचे व्दारे नागरीभागातील बेरोजगार, अर्धबेरोजगार यांना प्रोत्साहीत करुन छोटे उदयोग, उत्पादने सेवा व व्यवसाय करण्यात मदत करते. नागरी भागातील दारीद्रय रेषेखालील कुंटुबातील महिलांसाठी व्यवसाय करण्यासाठी ही योजना विशेष प्रोत्साहन देते.

सन 2011-12 मध्ये दि. 31/03/12 रोजी प्राप्त झालेल्या निधी पैकी ब-याच मोठया प्रमाणावर नांदेड वाघाळा महापालिकेने निधी खर्चच केलेला नाही. हया बाबतीत कुठलीही कारणे महापालिकेने आपल्या आनुपालनातुन नमुद केलेली नाही त्यामुळे ही योजना राबविण्याबाबत महापालिकेची उदासीनताच दिसुन येत आहे. एकीकडे निधी असताना ती न खर्च करणे म्हणजे पात्र लाभार्थ्यांना विकासाच्या संधी उपलब्ध न करुन देणे होय.

उपरोक्त विषयाबाबत अर्धसमास पत्र क्र. 117 दि.21/08/13 नुसार सबंधीत विभागास निदर्शनास आणुन देण्यात आले सबंधीत विभागाचे दिलेले आनुपालन दि. 27/08/13 नुसार लेखापरीक्षणाचे उपरोक्त अभिप्राय कायम ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पर्यंत	ऑडीट संकेतांक
117	21/08/2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DATMLD-M 6901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
92	महाराष्ट्र मुन्सीपल अकाँटकोड 1971 कलम 57 नुसार 31/03/2012 अखेर सर्वशिक्षण अभियान व NPEGEL योजने अंतर्गत पासबुक व रोख वहीच्या अखेरच्या रकमेच्या ताळमेळ तपासणे.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सर्व शिक्षा अभियान

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
26	शिक्षण विभाग	राज्यशासन	9 ड		

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच NPEGEL च्या योजने अंतर्गत कँश बुक व बँक बुक न दाखवणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाअंतर्गत सर्वशिक्षण तथा NPEGEL या योजने अंतर्गत सन 2011-12 मधील झालेल्या खर्च संबंधीत योजनेची कँश बुक व बँक पास बुक तपासणीसाठी मागवले असता ते अद्याप पर्यंत अप्राप्त आहे. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येतात.

3. सन 2011-12 च्या महालेखापाल, नागपुर हयांच्या लेखापरीक्षणाच्या अहवालानुसार खालीलप्रमाणे सर्व वरील योजनेच्या 31/03/12 अखेर कँशबुक व पास बुक मधील रक्कमेमध्ये फरक येत आहे.

अ.क्र.	योजनेचे नाव	बँकेचे नाव	खाते क्र.	कॅशबुक प्रमाणे 31/03/12 अखेर शिल्लक रक्कम	पासबुक प्रमाणे 31/03/12 अखेर शिल्लक रक्कम	फरक
1	सर्व शिक्षण अभियान	एस.बी.आय. नांदेड	11265875323	12709581	25604606	12895025
2	NPEGEL	एस.बी.आय. नांदेड	11265875753	3017	128017	125000

सर्व शिक्षण अभियान अंतर्गत 2011-12 मधील 31/03/12 अखेर कॅश बुक व बँक पासबुक मध्ये रु. 12895025/- चा फरक येत आहे. तसचे NPEGEL अंतर्गत रुपये 125000/- चा फरक आहे असे अहवालात नमुद आहे. कँशबुक व पासबुक तपासणीसाठी न मिळाल्यामुळे संबंधीत विभागाने रक्कमेची ताळेमेळ केलेली आहे किंवा नाही हे कळत नाही तसेच 31/03/12 अखेर किती चेक दिल्यागेलेले आहेत व किती वटल्या गेले आहेत हे कळाले नाही. त्यामुळे फरक कशामुळे पडला आहे, व चेकच्या नोंदी घेतल्या आहेत किंवा नाही याचा बोध होत नाही.

उपरोक्त अनियमितेबाबत अर्ध समास पत्र क्र. 119/ दि. 22/08/13 नुसार माहिती मागविली असता ती अदयाप पर्यंत अप्राप्त आहे. त्यामुळे उपरोक्त अभिप्राय कायम ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पर्यंत	ऑडीट संकेतांक
119	22/08/2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DATMLD-M 6901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
93	सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन 2011-12 मध्ये झालेल्या खर्चा बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	सर्व शिक्षा अभियान

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
26	शिक्षण विभाग	राज्यशासन	9 ड		

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	...	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन 2011-12 मध्ये झालेल्या खर्चाची माहिती न देणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेला सन 2011-12 मधील सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत मिळालेल्या एकुण आनुदान व झालेल्या खर्चाबद्दलची माहिती अर्धसमास पत्र क्र. 121 दि. 22/08/13 नुसार सबंधीत शिक्षण विभागास विचारण्यात आली असता आजपावेतो माहती अप्राप्त आहे. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. शिक्षण विभागाने वरील माहिती न दिल्यामुळे सन 2011-12 मध्ये एकुण किती घटक निवडयात आली होती ते कळाले नाही तसेच एकुण प्राप्त निधी व झालेला खर्च किती आहे व खर्चाची टक्केवारी किती ही माहिती काढता आली नाही.

2. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत सन 2011-12 मधील एकुण किती उददीष्ट ठरवण्यात आली व प्रत्यक्षात किती साध्या झाली हे माहिती न दिल्यामुळे काढता आली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पर्यंत	ऑडीट संकेतांक
121	22/08/2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DATMLD-M 6901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
94	पाणी शुध्दीकरणासाठी रसायन खरेदी बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
06	पाणी पुरवठा विभाग	--	9 ड	3	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
7660648/-			

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- पाणी पुरवठा रसायन खरेरीच्यासाठा नोंदवही न दर्शविणे

सविस्तर परीच्छेद ः-

नांदेड वाघाळा महानगपालिका सन 2011-12 चे वार्षीकलेख्या नुसार पाणीपुरवठा विभागाने पाणी शुध्दीकरण रसायन खरेदीवर रक्कम रु. 7660648/- एवढा खर्च केलेला दिसुन येतो. सदर रसायन खरेदी (क्लोरीन गॅस, तुरटी ग्रेड-1 व ब्लीचींग पावडर) बाबतच्या संचिका साठा नोंदवही निविदा प्रक्रिया बाबतचे अभिलेख्यांची मागणी अर्धसमास पत्र क्र. 167-अ दि. 30/09/2012 अन्वये केली असता संबधीतांनी तुरटी ग्रेड-1 व क्लोरीन गॅसबाबतची फक्त संचिका उपलब्ध करुन दिल्या साठा नोंदवही तसेच ब्लीचींग पावडरबाबत संचिका साठा नोंदवही, निविदा प्रक्रिया कोणतेच अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत.

तुरटी ग्रेड -1 साठी E- Tendering निविदा मागविल्या असता 3 निविदा प्राप्त. सदर 3 निविदेपैकी BIS प्रमाणपत्र असलेल्या 2 निविदा प्राप्त. त्यातुन महाराष्ट्र केमीकल अँण्ड जनरल सप्लायर्स यांची निविदा स्थायी समिती ठराव क्र. 82 दि. 09/07/2010 अन्वये मान्य केली

करारनामा	दि. 13/08/2010
प्रशासकीय मान्यता	534/10 दि. 30/07/2010
प्रथम पुरवठा आदेश	534/10 दि. 30/07/2010
चाचणी अहवाल	566/11 दि. 01/03/2011 737/10 दि. 15/03/2011

1. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. जीबीएन 1992/538/प्र.क्र. 43/92/नावि-14 दि. 21/06/1993 नुसार तुरटी खरेदी अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन का करण्यात आली नाही ? महाराष्ट्र केमीकल सप्लायर्स नांदेड यांचे BIS प्रमाणपत्र रद्द केलेले असतानाही त्यांचेकडुन का तुरटी खरेदी केली ? यावरुन खरेदी केलेल्या नाही. शासनाचे आदेशाचे उल्लंघन करुन महानगरपालिकेने स्वतःचे मानकानुसार खरेदी केलेली दिसुन येते. करणासहित खुलासा करावा.

2. सदर तुरटी खरेदी पुरवठा बाबतचे आदेश व पुरवठा देयके संचिकेत दिसुन आली परंतु सदर तुरटीबाबतचे साठा रजिस्टर पहावयास न मिळाल्यामुळे मागील वर्षाचे किती शिल्लक, खरेदी किती व वर्षभरात किती वापर याची खात्री करता आली नाही. साठानोंदवही न दर्शविण्याचे प्रयोजन काय ? याबाबत समर्थनीय सादर करावे.

3. ब्लिचींग पावडर खरेदीची संचिका, साठा नोंदवही व इ. अनुषंगीक अभिलेखे न दर्शविल्यामुळे ब्लिचींग पावडर खरेदी केली किंवा नाही यासंबधी लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

उपरोक्त रसायनखरेदी सबंधीबाबतचे अभिलेखे माहिती सबंधीत विभागास अर्धसमासपत्र क्र. 167 अ दि. 30/09/2013 अन्वये माहिती मागविली असता सबंधीत विभागाने माहिती न दिल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत असुन रक्कम रु. 7660648/- एवढा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
167 अ	30/09/2013	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DAT - UEMF-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
95	सन 2011-12 मध्ये विकासभार व उपकर कमी दराने वसुल करणे बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	--

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
09	नगररचना विभाग	--		--	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
---	--		--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- नगररचना विभागाने विकसभार कमी दराने व उपकर वसुल न करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद ः-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सन 2011-12 मध्ये बांधकाम परवानगी देते वेळी नगररचना विकासभार कमी दराने व उपकर वसुल न केलेला लेखा परीक्षणास संचिकेवरुन निदर्शनास आले.

त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 124 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक TPS/1810/85-CR/2118/10 दि. 27/12/2010 अन्वये विकासभार हा 1 मार्च, 2011 पासुन सुधारीत वसुल न केल्याचे दिसुन येते. तरी सोबत जोडलेल्या निवड महिन्यातील विवरणपत्रातील दर्शविलेली वसुली करुन शासनास भरणा करणेत यावी.

2. इमारत व इतर कामगार अधिनियम 1996 तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंतर्गत इमारतीच्या बांधकामाच्या मुल्यावर 1% इतका

उपकर 1 जानेवारी 2008 पासुन वसुल करणे आवश्यक असताना वसुल केला नाही तरी सन 2011-12 मधील दिलेल्या बांधकाम परवाना चे बांधकाम मुल्यावर 1% उपकर वसुल करुन शासन निधीत भरणा करणेत यावा उपकर वसुल न केल्याने शासनाचे आर्थीक नुकसान झालेले आहे. या संदरर्भात शासनाच्या वसुलीच्या रकमा वसुल करण्यात जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यावर निर्णय घेण्यास विलंब लावलेबाबत जबाबदारी निश्चीत करुन सन 2008 ते 2012 या कालावधीतील एकुण बांधकाम परवाने दिलेले आहेत तेवढया इमारतीच्या बांधकामाच्या मुल्यावर 1% उपकर परिगणीत करुन होणारी रक्कम वसुल करुन शासनाकडे जमा करावी व तसे अनुपालन लेखा परीक्षण पथकास दर्शवावे.

सबंधीत विभागास अर्धसमास पत्र क्र. 204 दिनांक 14/10/2013 रोजी परवानेबाबत व उपरोक्त त्रुटीबाबत माहिती सादर करणेबाबत कळविले असताना सबंधीत विभागाने माहिती सादर न केल्यामुळे उपरोक्त आक्षेप कायम ठेवण्यात येतात.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
204	14/10/2013	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक :- DAT - UEMF-5901
DAT PDM –

परिच्छेद क्रं.	शिर्षक
96	महानगरपालिका नांदेड यांनी मा. सर्वोच्य न्यायालयाच्या निर्देशानुसार 1.00 लाख लोकसंख्येसाठी किमान 1 (एक) निवारागृह उभारणे या योजनेतील अनियमीतते बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	रत्यावरील मुला मुलींसाठी रात्रीचा निवारा उभारणे.

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
29	महिला बालकल्याण विभाग		9 ड	2	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
---	---	25000/-	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः-

रस्त्यावरील मुलामुलींसाठी रात्रीचा निवारा उभारणे योजनेत महिला बालकल्याण विभागाने केलेल्या अनियमिततेबाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

मा. सर्वोच्य न्यायालयाने रिट याचीका क्र. 196/2001 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – 2010/प्र.क्र. 45/नावि-20 मंत्रालय, मुंबई दि. 14 जुलै, 2011 अन्वये शहरी भागात बेघर व निराश्रीत लोकांसाठी रात्र निवारे सुरु करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 66 (36) मधील तरतुदीअन्वये देखील बेघर व निराश्रीत लोकांसाठी निवा-याची सोय करणे हे महानगरपालिकेच्या कर्तव्याचा एक भाग आहे.

नांदेड वाघाळा महानगरपालिकेने पहिल्यांदा वृत्तपत्रात जाहिर प्रगटन व ठराव क्र. 05 दि. 12/12/2010 अन्वये स्वयंसेवी प्रस्ताव मागीतले त्यानुसार 7 प्रस्ताव प्राप्त प्राप्त प्रस्ताव जाहिर प्रगटनातील अटीशर्तीनुसार नसल्याने पुन्हा दुबार जाहिर प्रगटन देवुन प्रस्ताव मागीतले त्यानुसार एकच प्रस्ताव प्राप्त झाला त्यामुळे तिस-यांदा जाहिरप्रगटन देवुन प्रस्ताव मागीतले त्यानुसार खालीलप्रमाणे 4 प्रस्ताव प्राप्त झाले असुन ते खालीलप्रमाणे आहेत.

1. विद्या अपंग बालकल्याण, लोहा
2. अदनान सेवाभावी शिक्षण इदगाह, नांदेड
3. अश्रफ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड
4. जयमाता ग्रामीण विकास शिक्षण संस्था, नांदेड

पैकी जयमाता ग्रामीण विकास शिक्षण संस्था, नांदेड यांनी एक वर्षासाठी शंभर लाभार्थ्यांना एकुण रु. 162300/- खर्च दर्शविण्यात आला ते 4 प्रस्तावामध्ये कमी असल्याने व पुन्हा वाटाघाटीत रु. 12000/- रक्कम कमी करुन रु.150300/- इतक्या रकमेत एक वर्षासाठी रात्रीचा निवारा चालविणेबाबत. मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. 11 दि. 19/11/2011 अनुषंगाने प्रतिमाह 20000/- प्रमाणे रु. 250000/- ची प्रशासकीय आर्थीक मंजुरी देण्यात आली.

परंतु उक्त संस्थेने जाहिर प्रगटनात नमुद केलेल्या तसेच उपरोक्त शासन निर्णय दि. 14 जुलै, 2011 मधील मार्गदर्शक तत्वानुसार रात्रीचा निवारा हि योजना चालविली नाही त्यात अनियमितता दिसुन आली. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. शासन निर्णय 14/07/2011 अन्वये रात्र निवा-यांची संख्या, ठिकाण, क्षमता निश्चीत करण्यासाठी महानगरपलिकेने आपल्या क्षेत्रातील बेघर व निराश्रीत व्यंक्तींचे व्यवस्थीत सर्वेक्षण करावे. असे असताना व्यवस्थीत सर्वेक्षण केलेले संचिकेवरुन दिसुन येत नाही.
2. शा. नि. 14/07/2011 तील परीपत्रक क्र. 05 मधील 5.4 व 5.5 नुसार मादक द्रव्य पदार्थ सेवन, धुम्रपान निषिध्द व तंबाखु मुक्त रात्रीचा निवारा असावा. असे असताना संचिकेतील टिपणी क्र. 91 नुसार रात्रीच्या निवा-यात पलंग तुटलेले व काही व्यक्ती मद्यप्राशान केल्याच्या तक्रारी आल्याचे दिसुन येते. संचालकांनी सदर बाबीसंबधी जवळच पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली नसल्याचेही संचिकेवरुन दिसुन येते. ही अतशिय गंभीरबाब असुन

मा. सर्वोच्य न्यायालयाचे निर्देश व शासनाचे निर्णयाची संबधीत संस्थेने केलेल्या पायमल्ली बाबत महानगरपलिकेने काय कार्यवाही केली यासंबधी समर्थनीय स्पष्टीकरणे देण्यात यावे सदर निवा-याबाबत तक्रारी असताना संबधीत संस्थेस 25000/- भाडे कसे अदा केले यासंबधी खुलासा करावा.

सबंधीत विभागास अर्धसमास प.क्र.63 दि.19/07/2013 अन्वये राबविण्यात आलेल्या योजनेसंबधी विचारणा केली असता संबधीत विभागाने प.क्र. 10122 दि. 20/08/2013 अन्वये सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे. सबब रक्कम रु. 25000/- तात्पुरते अमान्य करण्यात येत आहे.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
63	19/07/13	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DAT - UEMF-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
97	महिला बालकल्याण विभागाअंतर्गत सन 2011-12 मध्ये राबविण्यात आलेल्या योजनेवरील खर्चाच्या अनियमितते बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	निराश्रीत महिलांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालवित येणा-या आधारगृहात वस्तुंचा पुरवठा करणे.

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
29		महिला बालकल्याण विभाग	9 ड	2	75000/-

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
---	---	75000/-	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः-

योजना राबविणेसाठी प्रत्यक्ष केलेल्या तरतुदीपेक्षा कमी खर्च करणे व योजना राबविताना झालेल्या अनियमितते बाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक जीईएन – 1093/1198/नावि-14 दि. 01 जुलै, 1994 नुसार महिला बाल कल्याण योजनासाठी स्वतंत्र तरतुद दर्शविण्यात येते महिला बालकल्याण समितीने त्यांना नियत केलेल्या कामावर अर्थसंकल्पीय तरतुदीतुन खर्चाबाबत कार्यवाही करावी. उक्त शासन निर्णयातील परि. क्र. 4 नुसार प्रारंभी अनेक योजना एकावेळी सुरु करण्यापेक्षा नगरपालिका क्षेत्रातील सामान्यपणे सर्व बालकांना व महिलांना लाभ मिळेल अशा एक किंवा दोन योजनांपासुन प्रारंभ करावा, योजनेची रुपरेषा, आराखडा, तपशील, योजना कार्यान्वित करण्याची पध्दती लाभार्थ्याबाबत तपशील आवश्यक साधनसामुग्री

अंदाजीत अनावर्ती खर्च यासह योजनांचा अहवाल तयार करावा. यानुसार महिला बालकल्याण विभागाने कार्यवाही न केल्यामुळे उपरोक्त योजना राबविणेसाठी सन 2011-12 व अर्थसंकल्पात रक्कम रुपये 700000/- ची तरतुद केलेली असताना खर्च फक्त 75000/- एवढाच केलेला दिसुन येता तसेच उक्त योजनेअंतर्गत कोणते सामान मुलींसाठी स्वयंसेवी संस्थाना पुरविले याबाबत संचिकेत कोणतेही कागदपत्रे आढळुन आली नाहीत.

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. ज्युव्हेनाईल जस्टीस ॲक्ट 2000 नुसार काळजी व संरक्षणाची गरज 6 ते 18 वयोगटातील मुलींना असते. 18 वर्षावरील मुलींना बालगृहात ठेवता येत नाही म्हणुन स्वयंसेवा संस्थामार्फत त्यांची व्यवस्था / पुरर्वसन करणेसाठी फीस सामान व वस्तुचा पुरवठा करणेकरीता संबधीत विभागाने मुलींना वस्तीगृहात रहाणेकरीता वार्षीक फी रु.15000/- प्रमाणे 5 निराधार मुलींचे एकुण रु. 75000/- अधिक्षक मिनाक्षी महिला मंडळ सुमन बालगृह, नांदेड दिलेले आहे. पंरतु मुलींना वेगवेगळया संस्थेत उदा. कस्तुरबा बालगृह, अमरावती, Backward Class Girls Hostel, solapur पाठविलेले आहेत सबंधीत संस्थेला पुर्णपणे रक्कम दिलेली दिसुन येते याबाबत खुलासा करावा. सदर मुलींची निवड करतांना 18 वर्षावरील होत्या यासबंधीचे जन्मतारीखेचे प्रमाणपत्र पहावयास मिळाले नाही.

2. सन 2011-12 मध्ये आर्थीक तरतुद रु.700000/- असताना रु. 75000/- सन 2011-12 मध्ये खर्च केलेला असुन उर्वरीत 625000/- रकमेचे बाबत काय कार्यवाही केली ? अनुदान निर्धारण केली आहे काय ? किंवा अखर्चीत निधी शासनास परत केला काय ? याबाबत स्पष्टीकरण करावे.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 63 दि. 19/07/2013 निर्गमीत करण्यात आले असता प्राप्त खुलासा संयुक्तीक नाही. करीता आक्षेप कायम ठेवण्यात येत असुन रक्कम रु. 75000/- तात्पुरती अमान्य् करण्यात येते.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
63	19/07/13	01/04/2011	31/03/2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- DAT - UEMF-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
98	श्री नारायण आठवले लिपीक यांना देण्यात आलेल्या अग्रीमाचे रुपये 87000/- समायोजन न केले बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
--	--

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
14	यांत्रीकी विभाग	--	9 ड	01	87000/-

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	87000/-	--	--

महत्वाचा अक्षेपाचा सारांश ः- यांत्रीकी विभागातंर्गत देण्यात आलेल्या अग्रीमाची रक्कम रु 87000/- हि प्रदीर्घ कालावधीपासुन समायोजन न करता प्रंलबीत ठेवले बाबत.

सविस्तर परिच्छेद ः-

(प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम या तपशिलासह)

महानगरपालिका नांदेड अंतर्गत यांत्रीकी विभागाचे लेखा परीक्षण करतांना यांत्रीकी विभागाचे पत्र क्र. यांत्रीकी/वि/351/दि. 31/12/2011 नुसार श्री नारायण आठवले यांना दिलेल्या अग्रीम रु. 87000/- बाबत समायोजनाचा तपशिल मागविण्यात आला होता. परंतु सदर विभागाने लेखा परीक्षणास दिलेल्या उत्तरात अग्रीम सचिंका सापडत नसल्याने समायोजन करण्यात आले नाही

असे उत्तरात नमुद केले आहे. सदर दिलेले उत्तर समर्थनीय नसल्याने लेखापरिक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत अवैध नळ तपासणी पथकाकरीता 05 जीप मार्केट रेट नुसार किरायाने घेतल्या बाबत. श्री आठवले यांना अग्रीम रु. 87000/- देण्यात आलेला आहे तथापी सदर अग्रीमाचे समयोजन लेखा परिक्षणाचे अंतीम तारखेपर्यंत झालेले नाही. त्यामुळे प्राप्त अग्रीमातुन करणेत आलेल्या खर्चाची तपासणी करुन झालेल्या खर्चाची सत्यता पडताळता आली नाही, तरी सदर बाबत सबंधिताकडुन अग्रीमाची रक्कम वसुल करुन मनापा निधीत जमा करण्यात यावी.

उपरोक्त आक्षेपाची पुर्तता करुन अनुपालन लेखा परिक्षणास सादर करावे.

संदर्भ क्र. अर्धसमास ज्ञापन क्र. अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षण वर्षापर्यंत	ऑडीट संकेतांक
56	17/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- UEM-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
99	नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका झोन क्र. 2 मधील मालमत्ता कराच्या वसुलीतील अनियमितता व पावती पुस्तकेसाठा नोंदवही व इतर नोंदवहया बाबत.

योजनेचा संकेतांक	योजनेचे नांव
--	

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
11	कर निर्धारण व संकलन	--	9 ड	5	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--	--	--	--

महत्वाच्या आक्षेपाचा सारांश ः- कराच्या वसुलीतील अनियमितता व नोंदवहया न ठेवणे.

सविस्तर परिच्छेद ः-

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सन 2011-2012 या वित्तीय वर्षाच्या झोन क्र. 02 मधील मालमत्ता कर, पावती पुस्तके व इतर अभिलेखे नोंदवहयाची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या.

1) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक शहरे अधिनियम 1965 चे कलम 126 व 127 नुसार करामध्ये सवलत देताना महानगरपालिकेचे आर्थीक हित साधलेले नाही उक्त नियमाचे कलम 322 नुसार नगरपरीषदेने मंजुर केलेल्या उपविधितील तरतुदीप्रमाणे कराची वसुली करणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यावाही न झाल्याने महानगरपालिकेस मोठया उत्पन्नापासुन वंचीत राहावे लागले असुन आर्थीक नुकसान झालेले आहे.

2) सन 2011-12 च्या मागणी नोंदवहया पुर्णपणे उपलब्ध झालेल्या नाहित उपलब्ध नोंदवहीवरुन (वसुलीची) मागणीची तपासणी केली असता थकबाकीसह कराच्या मागणीची नोंद वही. तसेच कराची वसुली करताना शास्ती / दंडाची रक्कमेची वसुली न करता थकबाकी म्हणुन रक्कम नमुद केलेली आहे.
(उदाहरणार्थ खालीलप्रमाणे)

अ.क्र.	नांव	घरक्रमांक	थकबाकी	चालु	एकुण
1	2	3	4	5	6
1	जमील अहमद मुर्ताजाखान	1-21-707	1009/-	114/-	1123/-
2	चांदराव पुंडलिकराव कोल्हे	1-21-715	2493/-	255/-	2748/-
3	खाजा खान खालीलखान	1-21-728	2647/-	-	2647/-
4	जमालबी महंमद मुसा	1-21-730	2021/-	47/-	2668/-
5	आयशी बेगम	1-21-791	1908/-	401/-	2309/-
6	सविता बालीजी पाटिल	1-14-66	245/-	336/-	581/-
7	पिराजी गायकवाड	1-14-353	5421/-	544/-	5965/-
8	प्रदिप कुलकर्णी	1-14-365	1621/-	29/-	1650/-
9	ग्यानोबा कसबे	1-14-377	3128/-	-	3128/-
10	म. युसुफ मो. हुसेन	1-14-382	5422/-	1037/-	6459/-
11	ग्यानोबा सोनोजी यनगरे	1-14-452	3024/-	366/-	3390/-
12	नरसुबाई मुदखेडकर	1-14-466	3903/-	342/-	4245/-

1) मागील थकबाकी हि दंडाची रक्कम वसुल न करता चालु वर्षातील रक्कम वसुल करुन दंडाची रक्कम थकबाकी म्हणुन दाखविण्याचे प्रयोजन काय ?

2) पावती पुस्तक क्र. 6145 व पावती क्र. 1 ते 10 पर्यंतची दि. 02-03-2012 ची वसुली रु. 500/- विलंबाने दि. 05-03-2012 रोजी भरणा केलेली आहे विलंबाबात काय कार्यवाही केली कारणा सहित स्पष्टीकरण देण्यात यावे.

3) मोकळा भुखंडबाबत नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे कृषीक व अकृषीक बाबत खात्री करता आली नाही, तरी कृषीकच वसुली किती व अकृषीकची किती याबाबत खात्री पटवावी.

4) नविन मालमत्ता व कराची वाढ/घट नोंदवही नमुना नं. 46 ठेवलेली नसल्याने सन 2011-12 या वित्तीय वर्षात करदात्यांच्या संख्येत झालेली वाढ/घट व त्यानुसार आकारणीत झालेली वाढ/घट पडताळता झालेली नाही.

5) थकित करदात्यांना आकारणी केलेली नोटीस फी, वॉरंट तसेच दंड रकमांची नमुना क्र. 05 मध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

उपरोक्त अनियमितता बाबत अर्थसमास पत्र क्रमांक 12 दिनांक 30.05.2013 नुसार संबधीत क्षेत्रीय कार्यालय क्र. 02 यांचे निदर्शनास आणुन देण्यात आले. त्याबाबत दिनांक 01.07.2013 प्राप्त अनुपालन संयुक्तीक नसल्याने उपरोक्त आक्षेप लेखा परिक्षणात कायम ठेवण्यात येतात.

अर्धसमास	दिनांक	लेखापरीक्षण	लेखापरीक्षण	ऑडीट संकेतांक

ज्ञापन क्रमांक		वर्ष – पासून	वर्षापर्यंत	
12	30.05.2013	20.11.2012	2011-12	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- UEM-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
100	नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका झोन क्रं.5 मधील मालमत्ता कर/पाणीपट्टी व पावती पुस्तके लेख्यांमधील अनियमतते बाबत.

योजनेचा संकेतांक	योजनेचे नांव
--	--

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
11	कर निर्धारण व संकलन	--	9 ड	9	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
--		--	--

महत्वाच्या आक्षेपाचा सारांश ः- कराच्या वसुलीतील अनियमितता व पावती पुस्तके साठा नोंदवही न दर्शविणे बाबत.

सविस्तर परिच्छेद ः

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सन 2011-12 या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणात झोन क्रं.5 मधील मालमत्ता कर, पाणीपट्टी इत्यादी कर वसुलीबाबतच्या व पावतीपुस्तक साठा नोंदवही अभिलेख्यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे उणीवा आढळून आल्या.

1) पाणीपट्टीच्या मागणी व मालमत्ता कर मागणी नोंदवहया प्रमाणीत केलेल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 8 नुसार लेखापुस्तके, नोंदपुस्तके, मजबूत बांधणीची त्यातील पाने क्रामांकित व नगरपरिषदेच्या सामायीक मोहरीने शिक्कामोर्तब केलेली असावीत. तथापि तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं.207 दि.4.2.2006 नुसारच कराची आकारणी होत आहे. असे लेख्यांवरून दिसून येते. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 124 नुसार दर चार वर्षांनी मालमत्ता कराचे निर्धारण नव्याने केलेले दिसून आले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे दरवर्षी फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

3) थकबाकीच्या रकमा वसुल करतांना त्यांची वर्गवारी न करता मालमत्ता कर म्हणून एकत्रीत जमा घेतल्या आहेत. त्यामुळे त्यामध्ये समाविष्ट शिक्षणकर, रोजगार हमी कर इत्यादी शासन वसुलीच्या रकमेचा भरणा झाला आहे किंवा नाही याची खात्री करता आली नाही अशा शासकीय परिगणीत करून शासनास भरणा कराव्यात.

4) झोन क्रं.5 मधील खालील मोठया रकमा थकबाकीदारांकडे रू.13,38,355/- बाकी आहे. सदर एवढी मोठी रक्कम त्यांचेकडे बाकी असतांना वसुलीबाबतची कोणतीच कार्यवाही केलेली दिसून येत नाही. इतर थकबाकीदारांबाबत ही काहीच कार्यवाही केलेली नसल्याने महानगरपालिकेचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. तरी वसुलीबाबत उचित कार्यवाही करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवणे बाबत सक्षम प्राधिका-यांनी प्रयत्न करावेत.

अ.क्र.	मालमत्ता क्रमांक	मालमत्ताधारकाचे नांव	थकबाकी रक्कम रू.
1.	10-2-117	अ.करीम अ.सलीम	45309/-
2.	10-3-15	दत्ता महादजी इंगेवाड	40236/-
3.	10-3-45	संभाजी माणिक इंगेवाड	42933/-
4.	10-3-87	साहेबराव रामजी इंगेवाड	54594/-
5.	10-3-160	बाबा दत्तराम घोगरे	43531/-
6.	10-3-551	बालाजी माणिकराव पेदेवाड	111050/-
7.	10-4-42	गोविंदराव तावजी गिरडे	41513/-
8.	11-2-133/1	गंगाराम छोटूलाल भातवाले	40562/-
9.	11-2-134	छोटूलाल भूरेलाल भातवाले	77432/-
10.	11-2-136	--//--	48687/-
11.	11-2-276	संभाजी पवार	67500/-
12.	11-6-1020	शिवाजी विद्यालय सिडको	725008/-
एकूण			**13,38,355/-**

5) मोकळया भूखंडाबाबत नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे कृषीक व अकृषीक बाबत खात्री करता आली नाही. तसेच क्षेत्रीय कार्यालय क्रं.5 अंतर्गत मोकळया भूखंडाची थकबाकी सोबत संलग्न केलेल्या मालमत्ताधारकांचे यादीनुसार रक्कम रू.24,46,186/- इतके असुन वसुलीबाबत अतिशय उदासीनता यावरून दिसून येते. वसुलीसंबंधीत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) कोरे पावती पुस्तके, परवाना पुस्तके/नमुने यांची नोंदसाठा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम 9 नमुना क्रं.9

नुसार साठा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे किती कोरे (पावती पुस्तके/नमुने) याची खात्री करता आली नाही. साठा नोंदवही विहीत नमुन्यात ठेऊन सक्षम प्राधिका-यांनी तपासून प्रमाणीत करून यापुढे ठेवण्यात यावे.

7) थकीत करदात्यांना आकारणी केलेली नोटीस फी, वॉरंट फी तसेच दंड रकमांची नमुना क्रं.51 मध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच सदर रकमांची वसुलीबाबतचा व थकबाकीबाबतचा स्वतंत्र तपशील ठेवण्यात आलेला नाही.

8) झोन क्रं.5 ची एकूण मागणी, संकलन व थकबाकी इत्यादीचा गोषवारा महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 76 नुसार मागणी पुस्तकात नोंदविलेला नाही.

9) नविन मालमत्ता (बांधकामवाढ) कराची वाढ/घट नोंदवही नमुना नंबर 46 ठेवलेली नसल्याने सन 2011-12 या वित्तीय वर्षात करदात्यांच्या संख्येत झालेली वाढ/घट व त्यानुसार आकारणीत झालेली वाढ/घट लेखा परीक्षणास पडताळता आली नाही.

उपरोक्त अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्रं.11 दि.29.5.2013 नुसार संबंधीत क्षेत्रीय कार्यालय क्रं.5 यांचे निदर्शनास आणून देण्यात आले बाबत दि.11.6.2013 प्राप्त खुलासा संयुक्तीक नसल्याने लेखा परीक्षणाचे वरील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
11	29.5.2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- UEM-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
101	नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका झोन क्रं.4 मधील मालमत्ता कराच्या वसुलीतील अनियमितता व पावती पुस्तके साठा नोंदवही व इतर नोंदवहया बाबत.

योजनेचा संकेतांक	योजनेचे नांव
--	--

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
11	कर निर्धारण व संकलन	--	9 ड	8	--

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
		--	--

महत्वाच्या आक्षेपाचा सारांश ः- कराच्या वसुलीतील अनियमितता मालमत्ता कराची रक्कम विलंबाने भरणा नोंदवहया न ठेवणे.

सविस्तर परिच्छेद ः

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सन 2011-12 या वित्तीय वर्षाच्या झोन क्रमांक 4 मधील मालमत्ताकर, पावती पुस्तके व इतर अभिलेखे, नोंदवहयांची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या.

1) सन 2011-12 या वर्षातील मालमत्ता व इतर कराचे वसुलीची तपासणी करतांना माहे जून, 2011 पर्यंत वसुली करण्यात आलेली नाही. एकूण 11 वसुली लिपीकांकडून माहे एप्रिल, 2011 ते जून, 2011 या कालावधीत कोणते काम देण्यात आले ? उक्त कालावधीत वसुली न करण्याचे प्रयोजन काय ?

2) क्षेत्रीय कार्यालय क्रं.4 यांनी पावती पुस्तक साठा नोंदवही ठेवलेली नाही व अर्धसमास पत्र क्रं.18 दि.26.6.2013 चे अनुपालन सादर केलेले असून त्यात कराची पावती पुस्तके प्राप्त 90 वाटप 90 शिल्लक निरंक तसेच जनरल पावती पुस्तके प्राप्त 30 वाटप 30 शिल्लक निरंक दर्शविली आहे.

परंतु भांडार विभागाकडून क्षेत्रीय कार्यालय क्रमांक 4 वजीराबादला खालील प्रमाणे पुस्तके देण्यात आलेली आहे.

1) मालमत्ता कर पावती बुके सन 2011-12

अ.क्रं.	पावती बुके घेऊन जाणा-या कर्मचा-याचे नांव	दिनांक	बुक क्रमांक	संख्या
1.	व्ही. एस. गोडबोले	17.11.2011	7034 ते 7053	20 बुक
2.	--//--	16.12.2011	7079 ते 7088	10 बुक
3.	--//--	27.12.2012	7339 ते 7358	20 बुक
एकूण				**50 बुक**

2) जनरल पावती बुके सन 2011-12

1.	व्ही. एस. गोडबोले	4.5.2011	6166 ते 6170	05 बुक
2.	--//--	15.6.2011	6245 ते 6254	10 बुक
3.	--//--	17.11.2011	6643 ते 6652	10 बुक
एकूण				**25 बुक**

भांडार विभागाकडून मालमत्ता कराची सन 2011-12 मध्ये 50 बुके आणली तर अनुपालनात 90 बुके प्राप्त म्हटले आहे. 40 बुके मागील वर्षीचे होते काय ?

तसेच जनरलपावती बुके 25 भांडार विभागाने 2011-12 मध्ये दिली व अनुपालनात 30 बुके प्राप्त जास्तीचे 5 बुके मागील वर्षीचे होते काय ?

जास्तीचे 40 व 5 बुकांबाबत साठा नोंदवही न ठेवल्यामुळे खात्री करता आली नाही. त्याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटवावी.

3) मालमत्ता कर वसुल केलेल्या रकमेचा रू.4167/- चा कमी भरणा केलेला होता. दि.25.6.2013 चे प्राप्त अनुपालनाद्वारे सदर रक्कम चलान क्रमांक 68 ते 73/1482 दि.15.5.2013 अन्वये रू.4167/- चा भरणा करण्यात आलेला आहे. लेखा परीक्षणात सदर रक्कम रू.4167/- कमी भरणा केल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर भरणा करणेत आल्याचे दिसून येते. दि.3.3.2012 व दि.13.3.2012 रोजी वसुली म्हणजे 1 वर्ष 2 महिने विलंबाने भरणा केली. याबाबत स्पष्टीकरण

करावे. इतक्या दिवस रक्कम न भरण्याचे प्रयोजन काय ? लेखा परीक्षणाने निदर्शनास आणून दिले नसते तर सदर रक्कम भरणा केली नसती असे यावरून स्पष्ट होते.

4) मालमत्ता कर मागणी नोंदवही व इतर नोंदवहया प्रमाणीत केल्या नाहीत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 8 नुसार लेखापुस्तके, नोंदपुस्तके मजबूत बांधणीची त्यातील पाने क्रमांकित व मनपा सामायीक मोहरीने शिक्कामोर्तब केलेली असावीत तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) क्षेत्रीय कार्यालय क्रं.4 मध्ये सोबत संलग्न केलेल्या यादीनुसार रू.50,000/- वरील थकबाकी असलेल्यांकडे एकूण रक्कम रू.39,80,250/- एवढी रक्कम मालमत्ता कराची थकबाकी असलेली दिसून येते. याबबात कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवणिचे दृष्टीने सदर थकबाकीदारांकडून वसुलीसंबंधी उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

दि.31.3.2012 अखेर क्षेत्रीय कार्यालय क्रं.4 मध्ये एकूण शिल्लक थकबाकी रू.1,33,55,388/- दिसून येते. खूप मोठया प्रमाणात थकबाकी असल्याने यासंबंधी उचित कार्यवाही करून वसुलीचे प्रमाण वाढविण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

6) क्षेत्रीय कार्यालय क्रं.4 वजीराबाद अंतर्गत सोबत जोडलेल्या यादीनुसार मालमत्ता जप्त केलेली आहे. यादीमधील अ.क्रं.3 व 5 वगळता इतर जप्त केलेली मालमत्तेबाबत पुढे काय कार्यवाही केली एकूण रक्कम रू.14,16,426/- मालमत्तेचा लिलाव केला काय ? लिलाव केला असल्यास सदर रक्कम महानगरपालिका निधीत जमा केली काय ? याबाबत समर्थनीय स्पष्टीकरण देण्यात यावे.

7) थकीत करदात्यांना आकारणी केलेली नोटीस फी, वॉरंट फी तसेच दंड रकमांची नमुना क्रं.51 मध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

8) नविन मालमत्ता व कराची वाढ/घट नोंदवही नमुना नं.46 ठेवलेली नसल्याने सन 2011-12 या वित्तीय वर्षात करदात्यांच्या संख्येत झालेली वाढ/घट व त्यानुसार आकारणीत झालेली वाढ/घट पडताळता आली नाही.

उपरोक्त अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 19 दि.7.6.2013 नुसार संबंधीत क्षेत्रीय कार्यालय क्रं.4 यांचे निदर्शनास आणून देण्यात आले, त्याबाबत दि.25.6.2013 प्राप्त अनुपालन/खुलासा संयुक्तीक नसल्याने उपरोक्त आक्षेप लेखा परीक्षणात कायम ठेवण्यात येतात.

अर्धसमास ज्ञापन क्रमांक	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
18	7.6.2013	1.4.2011	31.3.2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः- UEM-5901

परिच्छेद क्रं.	शिर्षक
102	भाडेतत्वावरील खर्चाबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-14	यांत्रीकी विभाग				

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :-

1. अनुज्ञेय वाहना व्यतीरक्त इतर वाहने वापरावयास देणे बाबत.
2. अनुज्ञेय रकमेपेक्षा जादा खर्च करणे बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

महानगरपालिका, नांदेड चे सन 2011-12 च्या यांत्रीकी वि भागाचे लेखा परीक्षणात दर्शविलेल्या अभिलेख्यावरुन असे दिसुन आले की, मनपाने खालील प्रमाणे एकुण 29 वाहने पदाधिकारी व अधिकारी यांना वापरावयासाठी भाडेतत्वावर घेतलेली असुन त्यावर खालील प्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

अ. क्रं.	वाहन क्रमांक/ वाहनचा प्रकार	वाहन वापरनारे अधिकारी/विभाग	वर्षातील एकुण खर्च रक्कम
1.	एम.एच.-26- व्ही-3611 इंडीका	उपायुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे	150949/-
2.	एम.एच.-26-2704 इंडीका	मा.उपायुक्त सौ.विद्या गायकवाड	45600/-

3.	एम.एच.-26- व्ही-2851 इंडीका	मा.उपायुक्त बीएसयुपी श्री सुरेश कळसकर	85631/-
4.	एम.एच.-26- व्ही-612 इंडीका	उपअभियंता (सा.बा.वि.)श्री नरवाडे	115246/-
5.	एम.एच.-26- एल-811 इंडीका	मा.कार्यकारी अभियंता श्री वाहने	13419/-
6.	एमएच-24-एफ-0062 टा.सुमो	मा.उपद्रव्य शोध पथक	184256/-
7.	एम.एच.-26- व्ही-4393 इंडीका	का.अभियंता (रोडस, जेएनएनयुआरएम)	128640/-
8.	एमएच-26- व्ही-5899 टा.सुमो	मा.उपायुक्त (महसुल)	168009/-
9.	एमएच-24- व्ही-1659 टा.सुमो	गुंठेवारी विभाग वसुली पथक श्री सोनसळे	15200/-
10.	एमएच-38-1674 टा.सुमो	गुंठेवारी विभाग वसुली पथक	99495/-
11.	एम.एच.-26- व्ही-4007 टाटासुमो	गुंठेवारी विभाग वसुली पथक	30007/-
12.	एमएच-26-क्यु-2728 टा.सुमो	गुंठेवारी विभाग वसुली पथक	83868/-
13.	एम.एच.-26-व्ही-190 इंडीका	श्री कलीम परवेज (बीएसयुपी,जेएनएनयुआरएम)	123680/-
14.	एम.एच.-04-सीई-7348 इंडीका	जनसंपर्क अधिकारी श्री सुमेध पांडे	86727/-
15.	एम.एच.-26-एच-1232 छोटा हत्ती	श्वान निर्बीजीकरण	8000/-
16.	एम.एच.-26-व्ही-2393 इंडीका	शाखा अभियंता	99340/-
17.	एम.एच.-26-व्ही-1020 इंडीका	मा.कार्यकारी अभियंता श्री भोंगे (जेएनएनयुआरएम)	186240/-
18.	एम.एच.-26-व्ही-1659 इंडीका	मा.का.अभियंता पा.पु.श्री गच्चेसर	99360/-
19.	एम.एच.-26-व्ही-3624 इंडीका	नगर रचनाकार	99360/-
20.	एम.एच.-26-एल-2401 इंडीका	सहा.आयुक्त (जेएनएनयुआरएम) श्री अनिल माचेवाड	142144/-
21.	एम.एच.-02-एके-8199 इंडीका	मा.का.अभियंता श्री बाशेट्टी	121879/-
22.	एम.एच.-26-बीक्यु-5952 इंडीका	मा.का.अभियंता जनीमल श्री एस.डी. जाधव	41280/-
23.	एम.एच.-26-व्ही-3825 इंडीका	मा.उपसभापती म.बा.क.स.सौ.आनेवार गंगासागर	35300/-
24.	एम.एच.-24-ए-8560 इंडीका	का.अभियंता (बीएसयुपी) श्री सुग्रीव अंधारे	43200/-

25.	एम.एच.-26-व्ही-6245 इंडीका	मा.शहर अभियंता श्री गिरीष कदम	14400/-
26.	एम.एच.-01-डीएमआर-7816 इंडीका	मा.सभापती म.बा.क.समिती	118991/-
27.	एम.एच.-26-एस-1020 इंडीका	मा.का.अभियंता श्री जोशीसर	186240/-
28.	एम.एच.-26-व्ही-2449 इंडीका	मा.का.अभियंता पा.पु.श्री भागानगरे	119200/-
29.	एम.एच.-26-एस-659 इंडीका	मा.का.अभियंता श्री शास्त्री	160430/-
एकूण			**2763600/-**

यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) मनपा, नांदेड यांचे पत्र क्रं.नांवाशमनपा/यांत्रिकी/कावी/223/दि.28.9.2011 अन्वये पदाधिकारी यांना वाहन वापराचे धोरण निश्चीत केले आहे.

खालील कर्मचारी / अधिकारी यांयना अनुज्ञेय असलेल्या वाहनाऐवजी इतर वाहेन वापरावयास दिलेली आहेत.

1) मनपा का.अभियंता, बीएसयुपी, सहा.संचालक, शहर अभियंता, का.अिभयंता पा.पु. का.अभियंता जेएनएनयुआरएम यांना मनपाचे वाहन किंवा 4.00 लक्ष पर्यंतची कार वापरास अनुज्ञेय असलेचे नमुद आहे. परंतु प्रत्यक्ष, कार्यकारी अभियंता इंडीका कार वापरावयास दिल्याचे दिसते.

2) उपद्रव शोध पथक यांना वरील आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गतच्या उपद्रव शोध पथकाचे कामी एक किरायाची ट्रॅक्टर ट्रॉली अनुज्ञेय असुन त्यांना एम.एच-24-एफ-0062 टाटासुमो हे वाहन वापरावयास दिले आहे. याबाबत खुलासा करावा.

3) सहा.आयुक्त क्षेत्रीय कार्यालया 1 ते 6 यांना प्रतीमहा रू.5000/- डिझेलसाठी अनुज्ञेय राहतील असे नमुद आहे. सहा.आयुक्त (जेएनएनयुआरएम) श्री अनिल माचेवाड यांचे वाहनावर वर्षभरात रू.142144/- इतका खर्च झाला आहे. जादा खर्चाबाबत खुलासा करावा. व अनुज्ञेय रकमेपेक्षा (त्या कालावधीतील डिझेलचे दर X 5000) जादा खर्चाची रक्कम सबंधीताकडुन वसुल करुन मनपा निधीत भरणा करावी.

वरील प्रमाणे अ.क्रं. 1 ते 3 बाबीचा खुलासा करावा व अधिकारी/पदाधिकारी यांनी वाहन वापराबाबतचे शासन आदेश दर्शविणेत यावेत.

वरील बाबींचा खुलासा लेखा परीक्षण पथकाचे अर्धसमास पत्र क्र. 68 दिनांक 24/07/2013 अन्वये मागवुनही लेखापरीक्षण कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येतो.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
68	24/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक

103	अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांच्या सेवापुस्तक पडताळणी व इतर अनियमितते बाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC-31	अग्नीशमन विभाग		9 ड	6	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	---	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :-

1. सेवापुस्तकातील उणीवाबाबत.
2. फायरमन पदासाठी आवश्यक प्रशिक्षण पुर्ण न केलेल्या कर्मचा-यांना वेतनवाढी देणे बाबत.
3. आणीबाणी व अग्नीशमन सेवेतील कर्मचा-यांचा विमा न उतरणे बाबत.
4. अपातकालीन प्रसंगी आवश्यक गणवेश पुरविणे बाबत. इ.

सविस्तर परीच्छेद :-

अग्नीशमन विभागाचे लेखा परीक्षणात अग्नीशमन विभागातील कर्मचा-यांचे सेवा पुस्तकाची पडताळणी केली असता त्यात खालील उणीवा आढळुन आल्या.

1) मनपातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांची सेवा पुस्तके आस्थापना विभागात संबंधीत अधिका-याच्या सुरक्षेत ठेवणे आवश्यक असुन व त्यात आस्थापना विभागाने सर्व नोंदी घेणे आवश्यक असतांना कोणत्या प्राधिकारान्वये अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे सेवा पुस्तके अग्निशमन विभागात कशी ठेवण्यात आली याबाबत खुलासा करावा.

खालील कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासणी असता त्यात खालील प्रमाणे उणीवा आढळुन आल्या.

अ.	कर्मचारी/अधिकारी	आढळुन आलेला अनियमितता

क्रं.	नांव	
1.	श्री संजय ढेंगळे, वाहन चालक	1) दि.9.5.07 नंतर वार्षीक वेतनवाढच्या नोंदी नाहीत. 2) 6 व्या वेतन आयोगाची वेतन निश्चीती केली नाही.
2.	श्री नागोराव तुरे, वाहन चालक	1) दि.20.12.07 नंतरच्या वेतनवाढ मंजुरीची नोंद नाही. 2) 6 व्या वेतन आयोगाची वेतन निश्चीती केली नाही.
3.	श्री मोतीराम मुरमुरे, फायरमन सेवा प्रवेश दि.21.12.89	1) शा.नि.न.प्र. संचालनालय शासकीय परीवन सेवा इमारत क्रं.नप्रस/ अग्निशमन/ सेवा/2005/ प्र.क्र.314/9/दि.25.405 मधील परी-14 नुसार मनपाने कर्म विमा उतरविला नाही. तशी नोंद सेवा पुस्तकात नाही. 2) दि.4.11.08 नंतर वेतन वाढीची नोंद नाही. 3) फायरमनसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण पूर्ण केलेबाबत. सेवा पुस्तकात नोंद नाही. 4) नियमीत कर्मचा-यांना दर पाच वर्षानी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. 5) MS-CIT परीक्षा उतीर्ण आसलेबाबत सेवा पुस्तकात नोंद नाही.
4.	श्री सुरेश येमेकर, जकात जवान सेवा प्रवेश दि.8.1.02	1) दि.8.1.09 नतंरच्या वेतन वाढीची नोंद नाही. 2) नामनिर्देशन, कुनिवे, भनिनि मृनिसे,उपदान,गोवियो इत्यादी जोडले नाही.
5.	श्री शेख जलील पुरूष मजुर से.प्र.दि.10.12.09 दि.4.11.91 रोजी फायरमन पदावर पदोन्नती	1) दि.4.11.08 नंतरच्या वेतन वाढीची नोंद नाही. 2) फायरमन पदासाठी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्याची नोंद नाही. 3) दर पाच वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचेकडील उजळणी प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेले नाही. 4) MS-CIT परीक्षा उतीर्ण आसलेबाबत सेवा

		पुस्तकात नोंद नाही.
6.	श्री निरज माशनवार टेलीफोन ऑपरेटर से.प्र.दि.29.6.06	1) टेलीफोन ऑपरेटर कोर्स पूर्ण केल्याची नोंद नाही. 2) MS-CIT परीक्षा उतीर्ण आसलेबाबत सेवा पुस्तकात नोंद नाही. 3) गोवियो, कुनिवे, भनिनि, मृकिसे, उपदान इत्यादी नामनिर्देशन जोडले नाही.
7.	श्री विक्रम पंडीत , पुरूष मजुर से.प्र.दि.28.3.11	1) दि.28.3.11 नंतर वेतनवाढीची नोंद नाही. 2) गोवियो, कुनिवे, भनिनि, भनिनि, मृविसे, उपदान ई.नामनिर्देशन पत्र जोडले नाही.
8.	श्री राजु जोंधळे, पुरूष मजुर से.प्र.दि.13.5.94	1) दि.7.7.07 नंतर वेतनवाढीची नोंद नाही. 2) नामनिर्देशन जोडले नाही.
9.	श्री मारोती बुरूडे, से.प्र.दि.29.3.11	1) दि.29.3.11 नंतर वेतन वाढरीची नोंद नाही. 2) नामनिर्देशन जोडले नाही.
10.	श्री मो.साजीद अ.खमर, पुरूष मजुर से.प्र.दि.28.3.11	1) दि.28.3.11 नंतर वेतन वाढरीची नोंद नाही. 2) नामनिर्देशन जोडले नाही.
11.	श्री सुरेश पंडीत, सफाई कामगार से.प्र.दि.26.4.2000	1) दि.26.4.08 नंतर वेतन वाढरीची नोंद नाही. 2) नामनिर्देशन जोडले नाही.
12.	श्री दशरथ शिंदे से.प्र.दि.30.8.87	1) नामनिर्देशन जोडले नाही.
13.	श्री साहेबराव जोंधळे, फायरमन	1) नामनिर्देशन जोडले नाही. 2) फायरमनसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण पूर्ण केल्याची नोंद नाही. 3) दर पाच वर्षांनी राज्य अग्नशिमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठयक्रम पूर्ण केला नाही. 4) MS-CIT परीक्षा उतीर्ण असलेबाबत सेवा पुस्तकात नोंद नाही.

उपरोक्त अ.क्रं.3,5 व 13 वरील कर्मचा-यांना फायरमन पदावर नियुक्त केलेले असुन फायरमन पदासाठी आवश्यक असलेले सांताक्रुंझ, मुंबई येथे अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत आयोजित करण्यात आलेले तीन महिन्याचे

प्रशिक्षण संचालनालयाचे स्थाई निर्देश क्र.23 क्रं.नप्रस-2003/प्र.क्रं.250/04/4/दि.19.10.2004 अन्वये अंतर्गत भरती केलेले कर्मचारी यशस्विरित्या प्रशिक्षण पूर्ण करतील त्यानांच अग्निशमन विभागातील नियुक्ती देता येईल. जे कर्मचारी वरील प्रशिक्षण पूर्ण करू शकणार नाहीत. त्यांना आपल्या मुळ पदावरच ठेवण्यात येईल असे असतांना एक कर्मचारी (फयरमन) वगळता कार्यरत एकाही कर्मचा-यांनी सदर प्रशिक्षण पूर्ण केले नसतांना त्यांना पुढील वेतनवाढी मंजुर कशा करण्यात आल्या याबाबत खुलासा करावा.

2) शासन निर्णय न.प्र.प्रशासन संचालनालय शासकीय परीवहन सेवा इमारत मुंबई क्रं.नप्रस/अग्निशमन सेवा/2005/प्र.क्र.314/9/दि.25 एप्रील, 2005 मधील परी-19 अन्वये कार्यरत अग्निशमन कर्मचा-साठी राज्य अग्निशमन सल्लागार यांचे मार्फत दर पाच वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांनी विहीत केलेले उजळणी पाठयक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. जे अग्निशमन कर्मचारी सदर प्रशिक्षण पूर्ण करणार नाहीत त्यांच्या वेतनवाढ प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत रोखुन ठेवावयाच्या आहेत. अशी कार्यवाही मनपाने केली नाही. याबाबत खुलासा करावा.

3) न.प.प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्रं.नप्रस/अग्निशमन सेवा/2005/प्र.क्रं.314/दि.25.4.2005 मधील परी-14 नुसार अग्निशमन व आणीबाणी सेवेतील कर्मचारी कर्तव्य करीत असतांना त्यांच्या जिवीतास धोका असण्याचा अधिक संभव असल्याने अशा कर्मचा-यास मनपा मार्फत विमा उतरवणि आवश्यक आहे. असा विमा उतरविण्यात आला नाही. कर्तव्य करीत असतांना त्यांच्या जिवीतास धोका झाल्यास जबाबदारी कोण घेईल याबाबत खुलासा करावा.

4) वरील शासन निर्णयामधील परी-क्र.20 नुसार मदतनिस यांनासुध्दा प्रशिक्षणास पाठवावयाचे आहे. हे मदतनीस कोणत्याही विभागात काम करीत असतील तरी आपत्कालीन प्रसंगी हे कर्मचारी अग्निशमन विभागासाठी उपलब्ध करण्यात यावेत. त्यामुळे या कर्मचा-यांना प्रशिक्षीत करून ठेवावयाचे आहे. परंतु मनपाने अशा मदतनीस यांना प्रशिक्षणस पाठविले नाही. याबाबत खुलासा करावा.

5) वर्ग – 3 मधील सर्व कर्मचा-यांना एमएससीआयटी (संगणक) परीक्षा बधंनकारक असुन जे कर्मचारी 31/12/2007 नंतर सदर परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत त्यांच्या वेतनवाढी रोखुन ठेवावयाच्या आहेत. तसेच ज्या कर्मचा-यानी वयाची 50 वर्ष पुर्ण केली त्या दिनाकांपासुन सदर कर्मचा-यास सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळणे बाबत सबंधीताने अर्ज सादर केल्यास आदेश काढणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही केली नाही तसेच जे कर्मचारी सदर परीक्षा उत्तीर्ण नाहीत त्यांच्या वेतनवाढी

रोखुन धरल्या नाहीत याबाबत खुलासा करावा व कार्यवाही करुन अनुपालन धरल्या नाहीत याबाबत खुलासा करावा व कार्यवाही करुन आनुपालन दर्शवावे.

6) वरील शासन निर्णयानुसार प्रशिक्षीत कर्मचा-यांना वर्षातुन एकदा एक बॉयलर सुट देण्यात यावा. या प्रशिक्षण घेतलेल्या मदतनीस कर्मचा-यांना त्यांच्या विहीत केलेल्या वेतनाव्यतीरिक्त वर्दीचेवेळी तसेच महीन्यातून एकदा कवायत व प्रशिक्षणासाठी बोलविणेत यावे व त्यांना गृहरक्षदलास विहीत केलेल्या दराने भत्ता देणे बाबत तरतुद आहे. तरी विहीत कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.

वरील प्रमाणे अ.क्र 1 ते 6 बाबीची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे.

वरील बाबत लेखा परीक्षण पथकाने अर्धसमास पत्र क्र. 79 दिनांक 29/07/2013 अन्वये खुलासा मागविला असता लेखा परीक्षणाच्या अंतीम दिनांकापर्यंत उत्तर प्राप्त न झाल्याने सदर परीच्छेद कायम करण्यात येत आहे.

संदर्भ क्रमांक/अर्धसमास ज्ञापन क्रमांक/अथवा मुळ परीच्छेद क्र.	दिनांक	लेखापरीक्षण वर्ष – पासून	लेखापरीक्षक वर्ष – पासून	ऑडीट संकेतांक
79	29/07/2013	2011	2012	00043964

लेखा परीक्षकाचा संकेतांक ः DAT-F-NJK-5601

परिच्छेद क्रं.	शिर्षक
104	पाणीपट्टी वसुली व डिमांड नांदवहीतील नोंदीबाबत.

योजना संकेतांक	योजनेचे नाव
	पाणीपुरवठा

शाखा संकेतांक	लेखाशिर्ष	निधीचा स्त्रोत	कलम	एकूण अनियमितता	गुंतलेली रक्कम
MC	कोडवाडा विभाग आरोग्य विभाग		9 ड	13	

आक्षेपाधिन रक्कम	वसुलपात्र रक्कम	तात्पुरती अमान्य रक्कम	अंतिम अमान्य रक्कम
	78902067/-	---	--

महात्वाचा अक्षेपाचा सारांश :- 1. पाणीपटटीच्या मागणी नोंदवहया ठेवल्या नाहीत.
2. पाणीपट्टीचे अभिलेखे सुरक्षेत न ठेवणे बाबत.
3. वसुलीची टक्केवारी फारच कमी असल्याने वसुलीचे प्रमाण वाढविले बाबत.

सविस्तर परीच्छेद :-

1. महानगर पालिका नांदेड यांचे सन 2011-12 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पाणीपुरवठा अंतर्गत पाणीपट्टीची जमेची तपासणी करता असे दिसुन आले की, मनपा अतंर्गत एकुण 6 झोन असुन या 6 झोन अंतर्गत एकंदर 45 वसुली लिपीक असुन सदर 45 वसुली लिपीका मार्फत पाणीपट्टी वसुली करण्यात येते. सदर वसुली लिपीकाकडील पाणीपट्टीची तपासणी करता पाणपट्टीच्या मागणी नोंदवहया ठेवलेल्या नाहीत त्यांमुळे नळधारकांची मागील बाकी किती होती, वसुल केलेली रक्कम व मागणी यांची खात्री करता आली नाही. याबाबत खुलासा करावा.

